

सुधीर कारखानीस

# फुलोरा

लघुकथा संग्रह

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# फुलोरा

## लघुकथा संग्रह

सुधीर कारखानीस

# फुलोरा


## लेखक: सुधीर कारखानीस

ए 902 एकता मेडोज

सिद्धार्थ नगर, मागाठणे

बोरीवली ईस्ट, मुंबई 400066

मोबाइल 9223298186

ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com


## मुखपृष्ठ- सुधीर कारखानीस


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन :

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय :

# सुधीर कारखानीस




शिक्षण व अनुभव
शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर
एंजिनीरिंग ग्रॅज्युएट पुना एंजिनीरिंग कॉलेज, पुणे, महाराष्ट्र
पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव
टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

लेखन
अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित
मराठी लघुकथा संग्रह “प्रतिबिंब”, “तरंग” व “गगन भरारी” प्रकाशित
स्टोरी मिरर मध्ये नियमित ललित कथा लेखन
लघुकथामध्ये शहरी शिक्षित मध्यम वर्गाच्या जीवनाचे आणि तसेच विदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनचर्येचेही दर्शन श्री सुधीर कारखानीस यांनी त्यांच्या खुमासदार आणि मनोरंजक शैलीत केलेले आढळून येते.

# अर्पणपत्रिका

पी जी वुडहासच्या विस्मयकारक साहित्याची
तोंडओळख करून देणाऱ्या,
अखंड प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या
आणि सतत सुयोग्य मार्गदर्शन
करणाऱ्या
कै. श्री भाईसाहेब (आर जी गुप्ते-
भूतपूर्व पुणे डिव्हिजनल कमिशनर)
याना सादर समर्पण.

# लेखकाचे मनोगत




पी जी वुडहाउस हा माझा अत्यंत आवडता लेखक. वुडहाउसने निर्माण केलेल्या पात्रांमधे, “ॲंगलर्स रेस्ट” या पब मधे बसून मनोरंजक गोष्टी सांगणारं पात्र म्हणजे मिस्टर मुलिनर. वुडहाउसने निर्माण केलेल्या बर्टी वूस्टर, जीव्हज, लॉर्ड एम्सवर्थ वगैरे पात्रांइतके मुलिनर हे पात्र गाजलेले नसले तरी, या पात्राच्या तोंडून वेगवेगळ्या सुरस कथा सांगण्याची वुडहाउसची लकब फारच वाखाणण्या सारखी आहे. वुडहाउसच्या या लकबीवर आधारित पण जरा वेगळ्या तऱ्हेने शाम काका हे पात्र तयार केलेले आहे. मात्र शाम काका, हे या कथांच्या केंद्र स्थळी नाहीत आणि कथांमधेही नाहीत, पण त्यांच्या अस्तित्वाशिवाय कथा सुरूही होत नाही.

या कथा संग्रहात सहा लघुकथा आहेत. प्रत्येक कथेतील पात्र योजना वेगळी, हाताळलेले विषय वेगळे, कथा-स्थान वेगळे, पण त्या सर्वांमधला एकमेव दुवा म्हणजे अंकल सॅम, उर्फ शाम काका. शाम काकांच्या निकटवर्तीय लोकांच्या जीवनात उद्भवलेली संकटे, अकस्मात आलेली आणिबाणीची परिस्थिती आणि या सर्वांमुळे चक्रव्यूहात सापडलेल्या योध्याप्रमाणे झालेली त्या लोकांची अवस्था

पाहिली की शाम काकांना पूर्वी कधीतरी घडलेल्या त्या सदृश्य नाट्यमय प्रसंगांची आठवण होते, एक कथा (गोष्ट) सांगितली जाते आणि त्या भूतकालीन आठवणीतूनच वर्तमान काळातील बिकट समस्येला सामोरे जाण्याचा मार्ग मिळू शकतो. या सर्व कथा काल्पनिक आहेतच, पण तरीही त्या प्रकर्षाने जाणीव करून देतात की या जगात कोणीही अद्वितीय ( युनिक ) नाही आणि इतिहासासारखा दुसरा उत्तम मार्गदर्शक नाही. संकटमय कात्रीत सापडलेल्या कोणाही एकट्या मनुष्याकडे पूर्वानुभवाचे भक्कम पाठबळ असणे शक्य नसते. अशा वेळी शाम काकांसारखे विशाल अनुभवाचे खंदकच समाजाचे मार्गदर्शक आणि पर्यायाने तारक बनतात, संकटग्रस्ताला वाट दाखवतात.

…सुधीर कारखानीस

# प्रस्तावना

जेव्हा श्री. सुधीर कारखानीस यांनी आम्हाला त्यांच्या नवीन पुस्तकाची प्रस्तावना लिहायची विनंती केली, तेव्हा सुरुवातीला आम्ही थोडेसे हरवून गेलो होतो. पण नंतर, एक कुशल अभियंता ते एक प्रभावी लेखक बनण्यापर्यंत त्यांनी केलेली उत्कृष्ट वाटचाल पाहता, आम्हाला हा आमचा बहुमान वाटला.

आमच्या दृष्टीने सुधीर (म्हणजेच आमच्यासाठी सुधीर दादा) हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व, जे चर्चेत कोणताही विषय सहजतेने मांडू शकतात.

आमचे वडील, दिवंगत श्री राजाराम गुप्ते आय ए एस अधिकारी होते आणि त्यांच्या सिव्हिल सर्व्हिसेसमधील अनुभवासह, १९७०-२००० च्या काळातील बहुतांश समस्याना आणि विषयांना ते सामोरे गेले होते. त्यांना वाचनाची अत्यंत आवड होती. त्यांची सर्वात आवडती पुस्तके म्हणजे पी जी वुडहाऊस यांच्या कादंबऱ्या, ज्या आम्ही आजपर्यंत प्रेमाने जतन केल्या आहेत. त्या कादंबऱ्या वाचताना अनेकवेळा ते जोरजोरात हसल्याचे आम्हाला आठवते.

सुधीरदादा आणि आमचे वडील तासनतास पी.जी. वुडहाऊस आणि त्यांच्या कादंबऱ्यांबद्दल बोलत असत. त्यांच्या अनेक चर्चा सत्रांचे आणि वादविवादांचे आम्ही साक्षीदार आहोत. त्यामुळे या पुस्तकाचे पी.जी. वुडहाऊस यांच्या कथा सांगण्याच्या शैलीपासून आणि त्यांच्या पात्रांपैकी एक, मिस्टर मुलिनरपासून प्रेरित असणे ही आमच्या साठी एक आनंदाची बाब आहे.

'फुलोरा' हे पुस्तक म्हणजे मध्यवर्ती पात्र शाम काका यांच्याभोवती फिरणाऱ्या कथांचा मनमोहक संग्रह आहे. लेखकाने शाम काकांची ओळख एक उल्लेखनीय व्यक्तिमत्व म्हणून करून दिली आहे. ते कथेच्या केंद्रस्थानी कधीच

a

नसतात, पण त्यांची उपस्थिती प्रत्येक कथनात महत्त्वाची असते. २१ व्या शतकातील समस्या, जीवनातील गुंतागुंत आणि पात्रांसमोरील विविध आव्हानांशी संबंधित भिन्न विषय यांचे कथन लेखकाने विनोद व शाम काकांची अंतर्दृष्टी एकत्र गुंफून प्रत्येक कथेत अतिशय कौशल्याने आणि भावूकपणे केले आहे.

"डाव मांडला" या पहिल्या कथेतील रवी आणि नीलिमाला व्हायरल गुंडगिरीचा करावा लागलेला सामना, "कल्लोळ भावनांचा" या कथेत अविनाश, कार्यालयीन राजकारणास कसा बळी पडला आणि ज्यामुळे त्याचे करिअर आणि वैयक्तिक जीवन जवळजवळ नष्ट झाले हे वाचतांना श्याम काका सर्व वाचकांना त्यांच्या रोजच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास मदत करतात. पुढील कथांमध्ये रेडकर आणि भालचंद्र, त्यांची स्वप्ने साकार करण्याची जबाबदारी देवावर सोपवतात. मुकुंदराव आणि निर्मलाताईंची, परदेशात राहण्याची इच्छा असलेल्या त्यांच्या पाश्चात्य मुलांना स्वीकारण्याची धडपड आपल्यापैकी अनेकांच्या हृदयाला स्पर्श करून जाते. सेवानिवृत्त वर्गमित्रांच्या पुनर्मिलनाच्या नियोजनातील विविध पैलू आणि अडथळे तसेच मालतीने तिचे लग्न वाचवण्यासाठी वापरलेली युक्ती खूप मजेदार आणि आनंददायक आहेत.

या सर्व कथांमधून प्रतीत झालेले धडे सर्व वयोगटातील आणि सामाजिक स्तरातील लोकांना नक्कीच मार्गदर्शन करतील. सुधीर दादांच्या प्रभावी लेखन शैलीतून पी.जी. वुडहाऊस यांची विविध पात्रे २१ व्या शतकात प्रकट होऊन आपल्या भेटीला लवकरच येवोत हीच सदिच्छा!

पूर्णिमा आणि धनंजय गुप्ते

सहाय्य:- स्वाती गुप्ते

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | उपोद्घात | १ |
| २ | डाव मांडला | ४ |
| ३ | कल्लोळ भावनांचा | २६ |
| ४ | देवाक कळजी रे | ४१ |
| ५ | उशिरा का होईंना | ५४ |
| ६ | सम्मेलन | ७० |
| ७ | मदनबाणांचे कुंपण | ८४ |
| ८ | उपसंहार | ९१ |

# उपोद्घात

ओरिओ क्लब ची मेंबरशिप मिळणे ही मामुली गोष्ट नाही. दक्षिण मुंबईत राहणारे बरेच सुखवस्तू मुंबईकर कुलाब्याला समुद्रालागत असलेल्या या क्लबचे मेंबर आहेतच पण त्याचबरोबर, बरेच आजी आणि माजी सरकारी ऑफिसर, वरच्या दर्जाचे पोलिस अधिकारी, रिटायर्ड आर्मी नेव्ही ओफिसरही मेंबर आहेत. अंकल सॅम उर्फ शाम काका हे असेच एक जुने मेंबर. क्लबचे सर्व नवे जुने मेंबर शाम काकांना ओळखत असत. शाम काका होते रिटायर्ड आर्मी ऑफिसर. भारतीय लष्करातून मेजर च्या हुद्दयावरून कित्येक वर्षापूर्वी शाम काका रिटायर झाले होते. रिटायरमेंटनंतर कुलाब्याला अफगाण चर्चच्या जवळ असलेल्या आपल्या वडीलोपार्जित बंगल्यात त्यांनी आपले वास्तव्य केले होते आणि रोज संध्याकाळी सात ते नऊ क्लबमध्ये येण्याचा त्यांचा कित्येक वर्षांपासूनचा परिपाठ होता०

संध्याकाळी सातच्या ठोक्याला क्लबला आल्याबरोबर बिलियर्ड रूममधे जायचं, चाललेला खेळ पहायचा, जमलं तर एखादा गेम खेळायचा आणि नंतर मात्र सरळ परमिट रूमकडे पाय वळवायचे असा त्यांचा शिरस्ता असे.

मेजर सॅम, अर्थत् शाम काका बार रूम मधे त्यांच्या आवडत्या जागेवर बसले की त्यांच्या समोर त्यांच्या आवडत्या पेयाचा ग्लास आणि स्नॅक्सची प्लेट आणून ठेवली जात असे. लगेच थोड्या वेळात बार रूम मधे येणारा जवळजवळ प्रत्येक मेंबर आपापल्या पध्दतीने त्याना जवळून किंवा लांबून हॅलो करित असे. टेबलावर गराडा पडायचा तो मुख्यत्त्वे तरूण पोरांचा. नवे नवे अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कॅडर मधले राज्य स्तरावरचे ऑफिसर, नवे पोलीस ऑफिसर, आर्म्ड फोर्सेसचे तरूण

a

ऑफिसर वगैरे मंडळी आपापला ग्लास घेऊन येत असत आणि खुर्ची ओढून ठिय्या मारून बसत असत. आणि त्याला तसंच कारणही असायचं. शाम काकांची प्रदीर्घ आर्मी सर्विस, त्यांचा जग प्रवास आणि रिटायरमेंट नंतर केलेलं सामाजिक कार्य यामुळे त्यांच्याकडे चविष्ट कथांचा अमर्याद साठा असायचा. जीवनात येणाऱ्या छोट्या मोठ्या समस्यानी गांगरून गेलेल्या, चक्रव्यूहासारखं तिथल्या तिथे फिरत राहणाऱ्या तरूण मंडळीना त्यांच्या स्वत:च्या समस्यांवर या कथांच्या फुलोऱ्या मधून बऱ्याचदा मार्ग सापडायचा, दिशा मिळायची. त्यामुळे घरच्या थोर-वडिलांपेक्षाही या मंडळीना शाम काकांचा आधार जास्त महत्त्वाचा वाटत असे.

या रोज जमणाऱ्या मंडळींपैकी बऱ्याच जणांना शाम काका आता नावाने ओळखायला लागले होते आणि एखाद्या दिवशी त्यापैकी कोणी दिसला नाही तर त्याच्याबद्दल विचारपूस करायचे.

आजही बरीच मंडळी शाम काकांच्या टेबलाभोवती जमली होती. काही जण खुर्च्या ओढून, आपापले ग्लास घेऊन बसले होते. जे थोडे उभे होते, ते एक्स्ट्रा टेबल जोडायला वेटरला सांगत होते.

"अरे अनिल, गेले दोन तीन दिवस गप्प गप्पच आहेस तू ! कुणाच्या प्रेमात वगैरे तर तोंडघशी पडला नाहीस ना तू?" साताऱ्याहून मुंबईला दोन महिन्यापूर्वी पोस्टिंग झालेल्या तरूण आय ए एस ऑफिसर अनिल काटकरला उद्देशून शामकाका म्हणाले. आणि असं विचारायला कारणही सबळ होतं. एरवी अनिलच्या आरडा ओरड्याने, गडगडाटी हसण्याने बार रूम दणाणून निघत असे, आणि म्हणूनच त्याचे शांत बसणे अपवादात्मक वाटत होते.

अनिल काटकर शुष्क पणे जरासा हसला. "शाम काका, कसलं प्रेम आणि कसलं काय? कुर्ल्याला एके ठिकाणचं बेकायदेशीर काम बंद करायची ऑर्डर काढू

a

नये म्हणून एक व्यापारी धमकावतोय मला. काही अश्लील फोटोंवर माझा चेहरा त्याने मॉर्फ केलाय आणि ते फोटो व्हायरल करू म्हणतोय.”

“अरे , घाबरू नकोस. अशा तऱ्हेने ब्लॅकमेलिंगचे प्रयत्न खूपदा होतात. अशा वेळी नरमाईचं धोरण न घेता,चढाईचा पवित्रा घ्यायचा असतो. विचार करून मार्ग शोधायचा असतो. आता रवीचीच गोष्ट पहा ना.” शाम काका म्हणाले.

“गोष्ट” हा शब्द ऐकल्यावर सर्वांनी कान टवकारले. आपापले ग्लास भरून घेउन सर्व जण परत शाम काकांजवळ आले आणि गोष्ट ऐकायला बसले.

शाम काका गोष्ट सांगू लागले….

# १

# डाव मांडला

शाम काकांनी ग्लास उचलला . एका दमातच निम्मा केला आणि ते सांगू लागले.

....शुक्रवारची रात्र होती ती. रवी आणि निलिमाचं ठाकुर विलेज कांदीवली मधलं घर.

जेवणं आटोपली होती, रात्रीचा साडे नऊचा सुमार, म्हणजे तसं म्हटलं तर नेहमीची झोपण्याची वेळ झालेली नव्हती. पण आजची गोष्ट वेगळी होती. सकाळी लवकर उठून रवीला सेमिनारला जायचं होतं .

“उद्या लवकर उठायचंय. नवी मुंबईला जायचंय मला सेमिनारला आणि पहिलं सेशन माझंच आहे”. रवि कोचावरुन उठता उठता निलिमाला म्हणाला.

निलिमा वाट्सअपमधुन डोकं वर काढायला तयार नव्हती. “तू जा झोप. इथे आमचं इंटरेस्टिंग चॅट चाललंय. तेवढं संपलं की येईन मी झोपायला.” निलिमाने रविची बोळवण केली.

जरा तणतणच रविने बाथरुमचं दार आपटलं.

निलिमाचा हा व्हॉटसअप ग्रुप तसा नवीनच होता. निलिमा म्हणजे निलू, आणि तिच्या बरोबर सुलू, शुभा, विद्या. असा चार मैत्रिणींचा हा ग्रुप. रविला एवढी तुटक तुटक इन्फ़ॉर्मेशन मिळाली होती की या चौघींचा नाशिकच्या शाळेत आठवी नववीत असताना ग्रुप बनला होता. शाळेत जरा कुप्रसिध्दच असावा,

खट्याळपणामुळे. नंतर दोघींच्या वडिलांच्या नाशिकहून बदल्या झाल्या आणि ग्रुप कायमचा मोडला. त्यानंतर खूप वर्षांनी, म्हणजे सुमारे दोन वर्षापूर्वी परत चौघीजणी ऑन लाईन भेटल्या होत्या आणि चॅटिंग ग्रुप जमला होता.

रविच्या दार आपटण्याचा परिणाम बहुतेक झाला असावा. निलूने चॅटिंग आवरतं घेतलं आणि मग थोड्याच वेळात घरातले दिवे मालवले गेले. झोपाझोप झाली.

.........

दुसऱ्या दिवशी दोघेही नेहमीपेक्षा तासभर लवकरच उठले. रविला नवी मुंबईत सेमिनारला नऊ वाजेपर्यंत पोहोचायचं होतं. टाय, सूट वगैरे जामानिमा करून ब्रेकफास्ट टेबलवर सकाळी सात वाजता रवि हजर झाला.

टोस्ट ला बटर लावता लावता निलिमाने विचारलं, “काय विषय आहे तुझ्या सेशनचा आजच्या सेमिनार मधे?”

रवि हसला. “प्रदुषणरहित आणि सुरक्षित कामासाठी कामगारांची कार्यकर्तव्ये.” रवि म्हणाला. “विषय वेगळा वाटतोय पण खरं म्हणजे ओल्ड वाइन इन न्यू बॉटल चा प्रकार आहे. रिफायनरीच्या अनुषंगानेच बोलणार मी. पण आजचे भाग घेणारे प्रतिनिधी विशेषकरून ह्युमन रिलेशन मॅनेजर आहेत ठिकठिकाणचे. जास्त तांत्रिक बोललं तर डोक्यावरून जाईल त्यांच्या आणि मग झोपून जातील सगळे”.

निलिमाने हसून रविला दाद दिली.

रविचे आणि निलीमाचे व्यवसाय अतिशय वेगळे. कामाची ठिकाणं वेगळी. पण निलिमा नेहमी रविकडे त्याच्या रिफायनरीच्या कामाबद्दल विचारपूस करत असे आणि रवि निलिमाकडे तिच्या फिजिओ थेरापिच्या कामाबद्दल आस्थेने चौकशी करत असे. दोघांमधे त्यानी कधीच कुठल्याही प्रकारचा आडपडदा ठेवला नव्हता,

कोणतंही सिक्रेट ठेवलं नव्हतं आणि याच गुरुकिल्लीमुळे की काय, त्या घरात सौख्य, शांतता नांदत होते.

सेमिनारच्या आयोजकांनी, मराठे साहेबांनी पाठवलेली टॅक्सी आली आणि साडेसात पर्यंत रवि निघाला. कांदिवलीहून नवी मुंबई ला जायला सकाळच्या वेळी सव्वा दीड तास तरी लागतोच. नऊ वाजेपर्यंत रवि पोहोचला, मराठे साहेबांनी यथोचित स्वागत केलं आणि इतरांशी ओळख करून दिली.

सेमिनार छानच झाला.

कामगारांच्या सुरक्षेबद्दल आणि प्रदुषणापासून मुक्तता करण्याबद्दलची चर्चा खूपच रंगली आणि अखेरीस संध्याकाळी सहा वाजता सेमिनारची सांगता झाली. आयोजक मराठे साहेब रविजवळ आले. “थॅंक्स देशपांडे, फारच रंगवलीत चर्चा तुम्ही. या विषयात तुम्ही तज्ञ आहात याबद्दल शंकाच नाही.” मराठे म्हणाले.

मराठेंच्या मागे एक तिशीच्या आसपास वयाची महिला उभी होती. रविने सेशन चालू असताना मागच्या बाजूला तिला बसलेली पाहिली होती, मात्र प्रश्नोत्तरात तिने फारसा भाग घेतला नव्हता.

“या मिसेस मशाळकर. ह्युमन रिसोर्स कन्सल्टन्ट आहेत या गुजरात मधे. आपल्या कार्यक्रमासाठी मुद्दाम आल्यात. इथे बोरीवली वेस्टला त्यांच्या नातेवाईकांकडे उतरल्यात.”

“नाईस टु मीट यू सर. माय प्लेझर” मिसेस मशाळकर म्हणाल्या. “सर तुमचं सेशन फार छान झालं. टेक्निकल कुशलता, व्यापारी नफा आणि सुरक्षित कार्य पध्दती यात तुम्ही सुंदर समन्वय दाखवलात”.

रविने मान कलती करून कॉम्प्लिमेंट्स स्वीकारले.

"सर मी टॅक्सी बोलावली आहे माझ्यासाठी. तुम्ही माझ्याबरोबर येऊ शकता, सर. मलाही कंपनी होईल. मला बोरीवली वेस्टला जायचंय. त्याच्या आधी मी कांदिवलीला तुम्हाला तुमच्या घरी सोडून पुढे जाईन.

"ठीक आहे", रवि म्हणाला. अडीच तासाचा, कंटाळवाण्या ट्रॅफिक मधून करायचा प्रवास समोर उभा होता.

मराठेंचा निरोप घेऊन दोघे खाली उतरले. साडे सहा वाजत आले होते. काळोख पडला होता आणि रिमझिम पाऊसही सुरु झाला होता. मिसेस मशाळकरानी बोलावलेली टॅक्सी आली होती. रविने कोट काढला, पुढच्या सीटवर टाकला, टाय सैल केली, दोघंही टॅक्सी मधे बसले.

नवी मुंबई च्या विस्तृत रस्त्यांवरून टॅक्सी हायवेच्या दिशेने धावू लागली. दुतर्फा दुकानेही लखलखलेली होती पण पावसामुळे गर्दी विरळच होती.

"हायवेला लागण्यापूर्वी काही स्नॅक्स कुठे मिळतायत का बघायला पाहिजे. लंच होऊन झाले पाच सहा तास आणि मुंबई अजून दोन अडीच तास लांब आहे. भुकेचे संदेश येतायत पोटातून. आत्ता दुर्लक्षित केले तर ॲसिडिटी व्हायची !" मशाळकर मॅडम म्हणाल्या.

रविला बोलायचं होतं, "पण त्यात आणि वीस पंचवीस मिनिटं जातील नं!"

पण तो नाही बोलला.

रविने ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितलं. समोरच दिसलेल्या उडप्याच्या हॉटेल मधे तिघांसाठी मेदुवडा डाळवडा इडली चटणी पार्सलची ऑर्डर दिली. निलिमाला फोन करून सांगितलं की ट्रॅफिक फार आहे, पोहोचायला साडे आठ नऊ वाजतील.

पार्सलं तयार होऊन, बिल चुकतं करून परत गाडीत येऊन बसेपर्यंत वीस मिनिटं गेलीच होती. पाऊस पडत होता. ड्रायव्हरचं इडली वड्याचं पुडकं त्याच्या

हातात देऊन रविने एक पुडकं मशाळकर मॅडमच्या हातात दिलं. गरम गरम वड्यांच्या खमंग वासाने मॅडमना खुश केलं. रविला थँक्स देऊन त्यांनी लगबगीने पुडकं उघडलं आणि पदार्थांचा मस्त समाचार घ्यायला सुरुवात केली.

ड्रायव्हरचा जठराग्नी शांत व्हायला आणखी दहा मिनिटं द्यायला लागली आणि मग धो धो पडणाऱ्या पावसात टॅक्सी एकदाची हायवेला लागली.

कधी रिमझिम, कधी मुसळधार पडणाऱ्या पावसात वाहनांची वाहतूक अगदी संथ चालली होती. पुडक्यांमधले पदार्थ संपल्यावर रिकामी वेष्टनं मशाळकर मॅडमनी खिडकीची काच खाली करून बिनदिक्कत बाहेर टाकून दिली, टिश्शू पेपरला हात पुसले.

"थँक यू रवि सर. यू आर माय लाईफ सेव्हर. आता कसं सगळं शांत वाटतंय. कसलीही अनिश्चितता मला नाही सहन होत सर, टेन्शन येतं. मग थंडीच भरायला लागते मला, अगदी हुडहुडी. आणि मग निपचित पडून रहावसं वाटतं." मशाळकर मॅडम म्हणाल्या. "सेमिनार संपल्यावर मराठेंनी हाय टी ठेवायला पाहिजे होता नाही का? काहीच सोय केली नाही त्यानी. सेमीनार संपला, आता घरी जा. आपल्या सारख्या लांबून आलेल्या लोकांची, निदान तुमच्या सारख्या व्ही आय पी ची सोय तरी नीट बघायला नको?".

रवि या सगळ्याच मतप्रदर्शनाशी सहमत नव्हता पण भिडस्तपणे त्याने मान डोलावली.

रविने मोबाईल हातात घेतला आणि व्हाटस्अप वरचे मेसेज पाहू लागला. सेमिनारवर मतप्रदर्शनं यायला लागली होती. सर्वांनीच रविची अगदी तोंड भरून स्तुती केली होती. रवि खुष झाला. त्याची छाती सव्वा इंच फुगली. हा सेमिनार तर जिंकला, आता आपण जग जिंकू अशा भावनेने मनोमन सुखावला.

मशाळकर मॅडमनी पर्स उघडून लिपस्टिक बाहेर काढली. छोट्या आरशात बघून, "आय ॲम ए मेस, आय ॲम ए मेस", म्हणत लिपस्टिक टच अप केली, पफ काढून तोंडावरून फिरवला, एक लहान स्प्रे काढून अंगावर शिंतोडे उडवले आणि मग परत सर्व साहित्य पर्स मधे ठेवून दिलं.

"ही मोठी टॅक्सी मिळाली म्हणून बरं झालं. नाही तर अगदीच कलकत्याची अंधारकोठडी झाली असती." मशाळकर मॅडम म्हणाल्या.

रवि हसला.

एरवी रविने ही तुलना कशी चुकीची आहे हे हिरीरीने दाखवून दिलं असतं, पण आताच्या त्याच्या उल्हसित मूड मधे तो कुठल्याही विनोदाला किंवा विनोदाच्या प्रयत्नाला दाद द्यायला तयार होता.

गप्पांचे फुटाणे तडतडू लागले. विनोदी प्रसंगांच्या आठवणी बाहेर निघू लागल्या. एक मजेचं, आनंदाचं वातावरण गाडीत पसरून राहिलं. एक तास असाच गेला. कोणत्याही प्रकारचे वैयक्तिक स्वरूपाचे विषय, विवादास्पद विषय बोलण्यात नाही आले.

रविने घड्याळात पाहिलं. आठ वाजत आले होते. पाऊस थांबला होता पण विजांचा कडकडाट आता सुरु झाला होता. रविने बाहेर पाहिलं. टॅक्सी इस्टर्न एक्सप्रेस हायवेवर होती, विक्रोळी जोगेश्वरी लिंक रोडचं वळण जवळ आलं होतं.

टॅक्सी लिंक रोडला वळली आणि एकदमच थांबली.

"काय झालं ड्रायव्हर, गाडी का थांबवली?" रविने विचारलं.

"काही समजत नाही. इंजिनच अचानक बंद पडलयं." ड्रायव्हर म्हणाला. "त्या समोरच्या शेडमधे कोणी मेकॅनिक आहे का पहातो", असे म्हणून ड्रायव्हर छत्री उघडत गाडीबाहेर उतरला.

a

पाच सात मिनिटं अशीच गेली. बाहेर काळोख. हलकासा रिमझिम पाऊस. मधुनच होणारा विजांचा लखलखाट, बाजूच्या डबक्यातल्या बेडकांचं ओरडणं, हायवेच्या ट्रॅफिकचा घरघरणारा आवाज, सगळंच विचित्र कॉम्बिनेशन.

रविला बोलणं सुचेना की व्हॉटसअपकडे बघणं सुचेना.

एवढ्यात मशाळकर मॅडम कुजबूजल्या. "सर, प्लीज हेल्प मी, आय ॲम व्हेरी टेन्स. मला अनईझी वाटतंय".

रविने मॅडमकडे पाहिलं. मॅडम थरथरत होत्या. "सर मला थंडी वाजतेय, तुमचा कोट देता का प्लीज?"

"जरूर, थांबा एक मिनिट." रवि म्हणाला.

कोट पुढच्या पॅसेंजर सीटवर होता. रवि कोट उचलून घ्यायला डावीकडे पुढे वाकला. तेवढ्यात मॅडम थरथर कापत उजवीकडे रविच्या बाजूला सरकल्या आणि त्यानी रविचा डावा हात पकडला.

"सर फार थंडी वाजतेय, काहीतरी करा", मशाळकर मॅडम विव्हळल्या. रविला धड उठता येईना की बसता येईना. तो डावीकडे वळला आणि आपले डावे - उजवे हात मशाळकर मॅडमच्या भोवती लपेटून रविने त्याना आपल्या कवेत घेतले. थरथरणाऱ्या मशाळकर मॅडमना थोपटून थोपटून रवि शांत करु लागला. उब आणि दिलासा मिळाल्याने की काय, मशाळकर मॅडम हळूहळू शांत झाल्या.

बाहेर विजांचा लखलखाट चालूच होता. ड्रायव्हर, मेकॅनिक कोणाचीही चाहूल लागत नव्हती. दोन चार मिनिटं अशीच गेली. रविला बिलगून त्याच्या खांद्यावर डोकं ठेऊन त्याच्या मिठीत डोळे बंद करून मशाळकर मॅडम शांत पहुडल्या होत्या.

सावकाश पणे रवि बाजूला झाला. मशाळकर मॅडमचे डोके त्याने मागे टेकले, पुढे वाकून आपला कोट पुढच्या सीटवरून उचलला आणि मशाळकर

मॅडमच्या अंगावर घातला. रवि कोट जरा सारखा करत होता तेवढ्यात बाहेर माणसांची चाहूल लागली. ड्रायव्हर मेकॅनिकला घेऊन आलेला दिसला.

गाडीचं बॉनेट उघडून मेकॅनिकने काही तरी खाटखूट केली. मग ड्रायव्हर गाडीत त्याच्या सीटवर येऊन बसला आणि मेकॅनिकच्या आदेशां प्रमाणे त्याने स्टार्टर मारला. गाडी स्टार्ट झाली. ड्रायव्हरने मेकॅनिकला पैसे दिले. तो निघून गेला. ड्रायव्हरने गाडी सुरु केली. गाडी मार्गाला लागली.

दिवसभरचा सेमिनारचा ताण, रात्रीच्या गर्द काळोखात, पावसात, संथ चालणाऱ्या ट्रॅफिक मधला तासन् तास चाललेला प्रवास आणि नंतर हा सगळा प्रकार. रवि अगदी थकून गेला होता. मागे डोकं टेकल्या टेकल्या रविला एकदम गाढ झोप लागली.

“सर, सर, उठा. घर आलं तुमचं. उतरताय नं?” मशाळकर मॅडम रविला हलवून उठवत होत्या.

रवि खडबडून जागा झाला. टॅक्सी रविच्या कांदिवलीच्या सोसायटीच्या पोर्च मधे उभी होती.

रविने बॅग उचलली. त्याने टॅक्सीचं दार उघडायला हँडलवर हात ठेवला.

“हा तुमचा कोट, सर”. रविचा कोट त्याच्या हातात देत मशाळकर मॅडम म्हणाल्या. “आणि थँक्यू सर.”

रवि कसाबसा टॅक्सीतून उतरला. “थँक्यू, व्हेरी मच. गुड नाईट .” असं तोंडातल्या तोंडात पुटपुटत, रविने एक हात जेमतेम हलवल्यासारखं केलं आणि तो लिफ्ट कडे वळला.

रवि वर पोहोचला. निलिमाने दार उघडलं. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. रविने बॅग एकीकडे टाकली, कोट टाय दुसरीकडे टाकले, बूट मोजे काढले आणि सरळ बाथरुममधे गेला.

a

रवि स्वच्छ होऊन बाहेर आल्यावर निलिमाने त्याला विचारलं, “रवि, जेवतोस नं?”

“अं, नको”, रवि म्हणाला. “झोप फार आली आहे . दमायला झालंय. इट वॉज ए लॉन्ग डे. जेवण नको. झोपतो मी आता.”

बेडरूम मधे जाऊन रवि झोपुन गेला.

निलिमाची सुध्दा फिजिओथेरापीची दोन मोठी सेशन्स झाली होती. तिनेही थोडं जेवून घेतलं आणि आवराआवरी करून, मोबाईल सेटस् चार्जिंगला लाऊन, पाठोपाठ तीही झोपायला गेली.

पोटात कावळे ओरडायला लागल्याने रात्री दोन अडीचला रविला जाग आली. चार पाच तास चांगली झोप झाली होती. किचनमधे जाऊन रविने स्नॅक्सची सोय बघितली. एका डिशमधे बिस्किटे, टोस्ट आणि एक गरम दुधाचा ग्लास घेऊन रवि बाहेर आला आणि डायनिंग टेबलवर बसून आरामात सगळं रिचवलं. अंतरात्मा शांत केला.

रविने चार्जरवरुन आपला मोबाईल काढला, व्हॉटसअप उघडलं. सेमिनार बद्दल आणखी काही कौतुकाचे अभिप्राय येत होते. सगळे नवे मेसेज रविने वाचले. चूळ भरून, ब्रश करुन रवि परत झोपायला गेला. रात्रीचे तीन वाजले होते. अंगावर पांघरूण घेउन रवि निद्रा देवीची आराधना करू लागला. सेमिनारचे विचार मनात येऊ लागले. मराठेंनी करुन दिलेली ओळख, सेशन्स संपल्यावर उत्स्फूर्तपणे झालेला टाळ्यांचा गजर, व्हॅलिडेक्टरी सेशनमधे चीफ गेस्टनी केलेलं कौतुक, सगळ्या आठवणी परत परत चघळूनही त्यांचा मधाळपणा कमी होत नव्हता.

विचारांची गाडी सेमिनारच्या समारोपावर आणि परतीच्या प्रवासावर येऊन ठेपली.

मराठेंचा निरोप घेऊन निघाल्यावर तो काळोख्या, पावसाळी रात्रीतला टॅक्सीचा प्रवास, टॅक्सीचं बंद पडणं, मशाळकर मॅडमचं अचानक उपटलेलं आजारपण, ... सगळं सगळं रविला आठवलं आणि मग मात्र रविचा आनंदी, समाधानी, रिलॅक्स्ड मूड पूर्ण नाहीसा झाला. एक प्रकारच्या अस्वस्थतेने, अनामिक हुरहुरीने त्याला ग्रासलं. रवि बराच वेळ विविध विचारचक्रांत एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर तळमळत होता. पहाटे पहाटे त्याचा डोळा लागला.

रविवारची सकाळ झाली होती. रविला उठायला जरा उशीर झाला. निलिमा आधीच उठली होती. टेबलावर रिकामी बशी आणि दुधाचा रिकामा ग्लास तिने पाहिला होता. निलिमा चहाच्या तयारीला लागली.

रवि उठून बाहेर आला. निलिमाने दिलेला गरम चहाचा कप त्याने तोंडाला लावला. एक कप चहा पोटात गेल्यावर रविला तरतरीत आली. कालच्या परतीच्या प्रवासाबद्दलची बेचैनी काढून टाकण्यासाठी निलिमाशी चर्चा करणं त्याला आवश्यक वाटलं. आणि मग कुठलाही आडपडदा न ठेवता घडलेला सर्व प्रकार रविने निलिमाला सांगून टाकला. त्याला स्वतःला जरी त्यामुळे हलकं वाटायला लागलं तरी त्या प्रसंगातले बोचरे कंगोरे त्याला टोचतच राहिले.

निलिमाने शांतपणे सर्व ऐकून घेतलं. अगदी तोंडावरची माशीही न हलवता ऐकून घेतलं.

“रवि, या मशाळकर बाईला तू आधी कधी भेटला होतास का ? नाही, म्हणजे, तुझ्या कामाच्या संदर्भात, दुसऱ्या कुठल्या सेमिनार मधे किंवा .... एखाद्या पार्टीमधे?” निलिमाने विचारलं.

रवि चमकला. दोन कप गरम चहा प्यायल्यानंतर तो पूर्ण सावध होता. निलिमा बारिक डोळे करून त्याच्याकडे पहात होती.

a

“नाही बुवा, अजिबात नाही “. रविने निर्व्याज चेहऱ्याने खरं तेच सांगितलं. “मराठेंनी सेमिनार संपल्यावर ओळख करून दिली, तीच पहिली भेट.”

“मग रवि, तू झोपलेला असतानाही सोसायटीच्या बी विंगच्या पोर्च मधे कसं तिने तुला बरोबर आणुन सोडलं? एवढा अ‍ॅक्युरेट पत्ता तिला कधी आणि कोणी सांगितला?” निलिमाने विचारलं.

“सेमिनारच्या पत्रकात मिळाला असेल पत्ता”. रविने गुळमुळीत उत्तर दिलं.

निलिमा विचार करत होती.

“आपल्या फिजिओ थेरापि व्यवसायात आपण आपल्याला प्रमाणा बाहेर जास्त गुंतवून तर घेतलं नाही ना?

रविमधे आणि आपल्या मधे, दोघात आडपडदा आपण कधीच ठेवला नव्हता, असं आपण समजतो, पण ते खरं आहे का?

रविने सांगितलेली गोष्ट म्हणजे पूर्ण सत्य असेल की अर्ध सत्य आहे ? पण जर अर्ध सत्य असेल तर पूर्ण सत्य काय आहे?

आपण एवढा कौटुंबिक सुरक्षिततेचा टेंभा मिरवतो, आपल्याकडे इन्शुरन्स आहे, दारावर व्हिडिओ मॉनिटर आहे, मोलकरणीचा पोलिस क्लिअरन्स आहे, पण अभेद्य कौटुंबिक सुरक्षा कवच द्यायला हे पुरेसं आहे का ?”

थोड्या वेळाने निलिमाने स्वतःला सावरलं. विचारांचा रोख, विचारांचा ओघ आवरता घेतला.

दिवसभराची कामं सुरू झाली. मनात विचारचक्रं चालूच होती.

दुपारी जेवताना निलिमा रविला म्हणाली,

“रवि, दोन शक्यता आहेत? एक तर मशाळकर बाईचं दुखणं जेन्युईन असेल किंवा ते एक ढोंग असेल. जर जेन्युईन असेल तर तिला मदत केल्याबद्दल आभार

मानायला ती तुला फोन करेल. जर ढोंग असेल, काही सेट अप चा प्रयत्न असेल तर पुढच्या मागणीसाठी ती तुला फोन करेलच. दोन्ही शक्यता संभवतात. आपल्याला तूर्त काहीच करायचं नाही. फोनची वाट बघायची. फोन नाहीच आला तर शिकलेला धडा ध्यानात ठेवायचा. भविष्यात सावध रहायचं."

किल्मिषं झटकली गेली. मनं साफ झाली. येईल त्या संकटाचा सामना करायला एकजूटीने मोर्चे बांधणी झाली.

सोमवारी रवि ऑफिसला गेला. सकाळी मीटिंग्जच्या वेळी त्याने मोबाईल ऑफ ठेवला. मात्र दुपारी मोबाईल अगदी आवर्जून ऑन ठेवला आणि दर वेळी बेल वाजली की तो ताबडतोब फोन उचलून घेत असे.

दुपारी तीन वाजता एका "अज्ञात नंबरवरून" फोन आला. मोटर कार इन्शुरन्स बद्दल मार्केटिंगचा फोन होता. "आमच्या ॲडमिन डिपार्टमेंटशी बोला". असे सांगून रविने फोन बंद केला.

अर्ध्या तासांने परत दुसराच "अज्ञात नंबर". यावेळी ज्ञाती संवर्धन मंडळाच्या कडून. देणगी देण्यासाठी.

"नंतर बघु" असं म्हणून रविने फोन बंद केला.

सोमवारची दुपार, संध्याकाळ पार पडली.

मंगळवारी दुपारी दोन वाजता 'अज्ञात नंबरवरून'

फोन आला.

"सर, मी बोलतेय, ओळखलं का?" मशाळकर मॅडमचा आवाज. "सर काल आपल्या ज्ञाती संवर्धन मंडळाच्या मुलीनी तुम्हाला फोन केला होता, देणगी बद्दल. सर आपलं ज्ञाती संवर्धन मंडळ होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी निधी जमवतंय. तुमच्या कडून मोठी अपेक्षा आहे सर".

"मॅडम नंतर बघू, कामात आहे मी सध्या". संभाषण लवकर संपवण्यासाठी रवि बोलला.

a

"बरं, ते राहु द्या सर," मशाळकर मॅडम म्हणाल्या, "परवाच्या सेमिनार चे काही फोटो आहेत माझ्याकडे. तुमच्याकडे मोबाईल वर पहायला पाठवते मी. तुमचा फोटो छानच आलाय सर. तुम्ही बघुन घ्या आणि तुमच्या कडुन क्लिअर असेल तर आपण मराठेना पाठवू, नाही तर तुम्हीही तुमच्या फेसबुक पेजवर पोस्ट करु शकाल. संध्याकाळ पर्यंत पाठवते मी सर. मग उद्या बोलू. आणि सर, ते ज्ञाती संवर्धन मंडळाच्या देणगीचंही लक्षात ठेवलं तर बरं होईल. ठेवू मी फोन? गुड डे सर."

रविने सुटकेचा सुस्कारा सोडला. किती आर्जवपूर्वक बोलत होत्या मशाळकर मॅडम. निलिमालाही त्याने फोन करून कळवलं की मशाळकर मॅडमच्या मनात काही काळंबेरं दिसत नाही आहे. तिच्या मंडळाला हजार एक रुपयांची देणगी देऊन टाकू. खूष होईल बिचारी.

"हं", निलिमा म्हणाली आणि तिने फोन खाली ठेवला.

संध्याकाळचे सात वाजले होते. रवि नुकताच घरी आला होता. निलिमा त्याच्या एक दीड तास आधी. दोघंही हॉल मधे बसले होते. चहा घेत होते. दिवसभराच्या गप्पा गोष्टी चालल्या होत्या. रविच्या मते मशाळकर मॅडम आता इतिहास जमा झाल्या होत्या आणि चहाच्या कपातलं वादळ आता शांत झालं, असं समजायला पाहिजे होतं.

बाजूच्या टेबलावर ठेवलेल्या रविच्या मोबाईल मधून टिंग टिंग आवाज यायला लागले.

"कोणीतरी फोटो लावतोय वाटतं." रवि म्हणाला.

काही मिनिटातच आवाज थांबले. रविने हात लांब करून मोबाईल उचलला.

"अज्ञात नंबर?" अज्ञात नंबरने पाठवलेल्या व्हाटस्अप मेसेज बरोबर फोटोग्राफ संलग्न केले होते. जास्त विचार न करता रविने फोटोग्राफ उघडले.

सहा फोटो होते. बॉम्बशेल.

एका फोटोत रवि कोणा अज्ञात महिलेला कवेत घेऊन बसलेला दिसत होता. तर दुसऱ्या फोटोत रवि अज्ञात महिलेला हळुवारपणे थोपटताना दिसत होता. एका फोटोत सेमिनारचं पत्रक सहज समोर ठेवलेलं, जणू प्रसंगाचे ठिकाण व वेळ समजण्यासाठी. सर्व फोटोत रविचा चेहरा ओळखू येण्याइतपत स्पष्ट दिसत होता पण महिलेचा चेहरा रविच्या बाहूंमागे नाहीतर खांद्यामागे बऱ्याच प्रमाणात लपलेला होता.

रवि जसा एक एक फोटो पहात गेला तसा त्याचा चेहरा भकास होत गेला. शेवटी रविच्या हातातून मोबाईल गळून पडला.

निलिमाने मोबाईल उचलला. निर्विकार चेहऱ्याने एक एक करून फोटो पाहिले. मोबाईल खाली ठेवून दिला.

निलिमा विचार करू लागली. फोटो तर आलेत, आता पुढे काय ?

रवि विचार करण्याच्या परिस्थितीत नव्हता.

“हा एक पध्दतशीरपणे रचलेला व्युह आहे यात शंकाच नाही, रवि. ही डावाची सुरुवात आहे. आपल्याला या खेळात शिकार केलेलं आहे आणि शिकारी मचाणावर बसलेला आहे. आपल्याला त्याला पाडायचंय खाली रवि, हिंमत सोडून कसं चालेल?” निलिमा म्हणाली.

रवि डोळे बंद करून मान मागे टाकून जीव गेल्यासारखा पडला होता. मान हलवून निलिमाला साथ द्यायचीही त्याला शक्ती नव्हती.

रवि उठला. सरळ बेडरूम मधे जाऊन झोपला. निलिमाने परत मोबाईल हातात घेतला. सगळे फोटो परत ती बारकाईने पाहू लागली. रविचे असले फोटो पहाण्याची तिला सवय नव्हती. कष्टाने तिने मन शांत ठेवलं. रविवर कोणी तरी

निशाणा साधला आहे आणि आपल्याला त्याची ढाल बनायचं आहे एवढंच मर्यादित साध्य तिने समोर ठेवलं.

त्या फोटोंमधे निलिमाला काहीतरी खटकत होतं. टॅक्सीच्या मागच्या सीटवर चाललेल्या या प्रकाराचे फोटो टॅक्सीच्या खिडकीतून कोणी तरी काढले होते. रविला जो विजांचा लखलखाट वाटला तो थोडा बहुत कॅमेराचा फ्लॅशही असू शकेल. फोटो घ्यायचं काम ड्रायव्हरशिवाय दुसरं कोण करणार! फोटो थोड्या फार प्रमाणात एडिट केल्यासारखेही वाटत होते, जेणेकरून चेहऱ्यांवरचे अंधार -उजेड कृत्रिम पणे कमी जास्त केल्यासारखे वाटत होते. नीट निरखून पाहिलं तर बरीच विसंगती नजरेला येत होती, पण निरखून पहात बसणार कोण! हे फोटो जर सोशल मिडियावर गेले तर वरवर पाहूनच लोकांनी आपापली निकालपत्र जाहीर पणे दिली असती.

निलिमाने ते फोटो परत एकदा निरखून पाहिले आणि मशाळकर मॅडममधे तिला जरा ओळखीचा भास झाला. शंका तर आली आहे, आता उद्या पुढे बघू असे म्हणत निलिमाने रविचा मोबाईल बाजूला ठेवला.

आठच वाजले होते. स्वतःच्या मोबाईल वर निलिमाने व्हाटस्अप उघडलं. तिचा फेवरिट चॅटींग ग्रुप आधीच हजर होता. गप्पा मारत होता. सुलू आणि विद्याच्या दागिन्यांबद्दल, विशेषकरून डायमंड नेकलेस बद्दल गप्पा चालल्या होत्या.

“हा आपला प्रांत नाही,” असे म्हणून निलिमाने त्यांचा निरोप घेतला.

निलिमाने जेवणाची तयारी केली. रविला उठवलं. दोघंही जेवायला बसले. रवि मान खाली घालून जेवण चिवडत होता. आपल्या बिन खरकट्या डाव्या हाताने रविच्या हातावर थोपटत निलिमा रविला म्हणाली, “जेव रवि, धीर धर जरा”.

“कसला धीर धरायचा? “ रवि निरुत्साहाने म्हणाला. “हे फोटो सोशल मिडियावर आले तर तोंड दाखवायला जागा रहाणार नाही. रिफायनरीतून काढून

टाकतील, क्लबची मेंबरशिप जाईल, कोणी मित्र जवळ करणार नाहीत. काय वीस पंचवीस हजार त्या मॅडम मागतील ते देऊन टाकावं झालं".

"निघेल काही मार्ग, उद्या बघू." निलिमा म्हणाली.

"नाहीतर असं वाटतं मला," रवि बोलत होता, "एक पैसाही देऊ नये तिला. मुंबई सोडू या. जुन्नरला आपला किशाभाऊ राहतो, माझा आते भाऊ, त्याच्याबरोबर शेती करावी. ट्रॅक्टर घ्यायचा, सगळं शेत मेकनाइज करायचं. रूरल लाइफ एन्जॉय करायचं."

निलिमाच्या डोळ्यांसमोर दुपारची, शेतात भाजी भाकरी घेऊन जाण्याची ड्यूटी उभी राहिली आणि अंगावर शहारे आले. गावात रहायला गेल्यावर फिजिओथेरापी प्रॅक्टिसला फारसा वाव नसणार हेही तिच्या लक्षात आले.

अशाच खिन्न, विचित्र वातावरणात जेवणं झाली. थोडा वेळ टी व्ही समोर बसून रवि झोपायला गेला. मेसेजेस पाहून, दिवसभराच्या कामाचे रिपोर्ट फाईल करून निलिमाही झोपायला गेली.

दुसऱ्या दिवशी दुपारी ज्ञाती संवर्धन मंडळाकडून फोन आला. त्यादिवसाच्याच मुलीचा आवाज. "थँक्यू व्हेरी मच सर, मंडळाला पाच लाखांची देणगी देऊन प्रमोटर होण्याचं कबूल केल्या बद्दल."

"काय, मी, मी,... एवढी रक्कम!".रवि चाचरत म्हणाला.

"हो सर, रक्कम मोठी आहे, मोठ्या मनाने तुम्ही पाच लाख द्यायचं कबूल केलंय म्हणूनच थँक्स." मंडळाची मुलगी निर्लज्जपणे तोंडभर हसून म्हणाली. "आणि सर, शनिवार पर्यंत चेक तयार ठेवायला जमेल नं? शनिवारी लंचला दुपारी एक वाजता बोरिवली च्या स्टार परेड रेस्टॉरंटमधे आमच्या मॅडम भेटतील तुम्हाला. त्यावेळी तुम्ही चेक द्यायचाय सर, त्याना."

वयाच्या पस्तिशीत पाच लाख रुपये ही मोठी रक्कम वाटणं स्वाभाविक होतं, आणि एवढी रक्कम कुणाला फुकाफुकी देण्याच्या विचाराने रवि निराश होऊन गेला.”

जुन्नरला किशाभाऊला रविने फोन लावला. रविला एकदमच मुद्दयाला हात घालता येइना. इकडचं तिकडचं काहीतरी बोलून रविने फोन खाली ठेवला.

संध्याकाळी घरी गेल्यावर निलिमाला त्या पाच लाखांच्या मागणीबद्दल रविने सांगितलं. निलिमाने शांतपणे सगळं ऐकून घेतलं.

“रवि, हे प्रकरण पाच लाखांनी मिटणार नाही. ती बया जन्मभर तुला छळत राहिल, पैसे उकळत राहिल. तू भेट तिला शनिवारी रेस्टॉरंट मधे, चेक आणलाय, जेवण झाल्यावर देतो म्हणून सांग. बघुया आपण, मला एक उपाय सुचतोय. शनिवारीच कळेल तुला”. निलिमा म्हणाली.

हिला काय उपाय सुचलाय ते रविच्या लक्षात येईना. पोलिसात जाण्यात काही अर्थ नव्हता, कारण ज्ञाती संवर्धन मंडळ नावाची पोकळ का होईना, संस्था असणार हे नक्कीच आणि रविने राजीखुषीने संस्थेचा प्रमोटर होण्याचं कबूल केलंय हे त्यांचं म्हणणंही खोडून काढणं अवघड होतं.

उरलेला आठवडा रखडत रखडत चालला होता. ऑफिसमध्ये, क्लब मध्ये प्रत्येकाशी बोलताना, हास्य विनोद करताना रविच्या मनात विचार येत होते, की उद्या हे फोटो व्हायरल झाले तर माझ्याबरोबर ही माणसं अशीच वागतील का? हास्य विनोद करतील का? जुन्नरला गेलो तरी हे सगळं प्रकरण आपल्या पाठोपाठ तिथेही येईल काय ! की तिथेही आपण दुरुन येताना दिसलो तरी लोक मुलीबाळींना लपवून ठेवतील? या नाचक्कीपासून दूर पळायला जगाच्या पाठीवर कुठे जागा असेल का !

तिकडे निलिमानेही आपली चक्रं फिरवायला सुरुवात केली होती. नाशिकला बरेच टेलिफोन कॉलस् करुन, जुन्या मैत्रीला, जुन्या ओळखींना उजाळा

देत बरीच मोलाची माहिती तिने मिळवली होती आणि जुन्नरला जाण्याचा पर्याय राबवावा लागणार नाही, इतपत आता तिला आत्मविश्वास आला होता.

शनिवार आला. रवि दुपारी बरोबर एक वाजता स्टार परेड रेस्टॉरंट मधे पोहोचला. मशाळकर मॅडम आधीच येऊन एका बाजूच्या निवांत टेबलवर बसल्या होत्या. वरकरणी हसत रवि मॅडमच्या समोर बसला.

“या सर, आणलात चेक ?” मॅडमनी मुद्यालाच हात घातला.

“आणलाय चेक मॅडम. पण जेवून तर घेऊ या. अशा हॉटेलमधे आलोच आहोत तर बसू या अमळ”. रवि म्हणाला.

मॅडम अनिच्छेने बसल्या. ऑर्डर दिली. पंधरा मिनिटानी वेटरने सर्विस सुरू केली.

फारसं काही बोलण्यासारखं नव्हतं, न बोलता दोघंही जेऊ लागले.

“हॅलो सुलू” आवाज आला. मशाळकर मॅडमनी आवाजाच्या दिशेने वर पाहिलं. रविनेही वर पाहिलं. निलिमा टेबलाजवळच उभी होती. जरा वेगळी, जुन्या पद्धतीची केशरचना तिने केली होती.

मशाळकर मॅडमनी पाच दहा सेकंद निलिमाकडे रोखून बघितलं आणि त्याना ओळख पटली.

“कोण निलू ! किती वर्षांनंतर भेटतोय आपण! तश्शीच्या तश्शीच राहिली आहेस की गं!” मशाळकर मॅडम उद्गारल्या.

“कमालीचा योगायोग, इथे असं अचानक भेट होण्याचा. किती वर्षांनंतर असं समोरा समोर भेटतोय, किती गोष्टी कॅचअप करायच्यात आपल्याला. आणि चॅटींग करताना तू सांगितलं नाहीस मला, की तू बोरिवलीत राहतेस म्हणून”. निलिमा म्हणाली.

"नो, नो, जस्ट व्हिजिटिंग. बिझनेस मीटिंग आहे ही". मशाळकर मॅडम म्हणाल्या. मनात विचारचक्र फिरत होती, आता या निलूला कटवायचं कसं!

"जेवण संपलेलं दिसतंय. डेसर्टसाठी मला जॉइन व्हायला आवडेल". निलिमा म्हणाली.

मशाळकर मॅडमनी विरोध दर्शवायला तोंड उघडलं, तेवढ्यात निलिमा म्हणाली, "काय रे रवि, चालेल नं, मग सरक जरा तिकडे".

मशाळकर मॅडमकडे वळून निलिमा म्हणाली, "समजलं का सुलू, मी मिसेस रवि. ही कसली बिझनेस मीटिंग आहे, ते सगळं मला माहिती आहे."

मशाळकर मॅडमना थोडा धक्का बसला पण लगेच त्यांनी आपल्याला सावरलं.

"माहिती आहे नं, निलू, मग मला काही बोलायला नको. रवि सर, तुमचा मंडळाच्या प्रमोटरशिपचा चेक द्या आणि ही मीटिंग संपवूया." मशाळकर मॅडम म्हणाल्या.

"सुलू, चेक वगैरे काही आणला नाही रविने". निलिमा म्हणाली.

"अस्सं मग तुम्ही चुकीचा पर्याय निवडलाय. या मार्गाने गेलात तर रवि सरांचाच नाही, तर अख्ख्या कुटुंबाचा विनाश आहे". मशाळकर मॅडम रागाने म्हणाल्या.

"विनाश कोणाचा आहे ते नंतर पाहू सुलु. एक जुनी गोष्ट सांगते तुला. ऐक जरा". निलिमा म्हणाली. "पंधरा वर्षांपूर्वी नाशिकच्या एम एच स्कूलच्या ऑफिसमध्ये रामभाऊ कुलकर्णी नावाचे क्लार्क होते. महिन्याच्या पहिल्या आठवड्यातला शुक्रवार सर्व वर्गांचा फी भरण्याचा दिवस असायचा. जमा केलेली फी सगळे क्लास टीचर रामभाऊंकडे आणून द्यायचे. अशाच एका फी भरणा शुक्रवारी असं घडलं की, या भरणा केलेल्या रकमेतले एक हजार रुपये नाहीसे झाले. रामभाऊ म्हणाले चोरी झाली, पण पुरावा काहीच नव्हता. शाळेने चौकशी समिती

नेमली. चौकशीत माहिती बाहेर आली की मधल्या सुट्टीत कूलरचं गार पाणी पिण्याच्या निमित्ताने सुलभा रेगे नावाची विद्यार्थिनी ऑफिसमध्ये आली होती.

"चौकशी समिती सुलभा रेगेची जबानी घेऊ शकली नाही कारण दुसऱ्याच दिवशी आपल्या आजारी आत्याकडे सुलभा धारवाडला निघून गेली आणि नंतर शाळेला उन्हाळ्याची सुट्टी लागली. चौकशी समितीला जास्त वेळ दिला गेला नाही. रामभाऊंवर पैसे लंपास केल्याचा आळ आला. शरमेने रामभाऊनी आत्महत्या केली. त्यांची बायको तापाने वारली. मुलगा मुकुंद वाईट मार्गाला लागला. त्याने बरेच वाईट उद्योग केले. नंतर स्मग्लिंगमधे त्याने खूप पैसा मिळवला. माझे वडील पोलिसात होते. त्यांच्या मध्यस्थीने नंतर ॲम्नेस्टी स्कीममध्ये सरकारला शरण गेला. थोडी सजा भोगून बाहेर आला आणि नंतर हॉटेल व्यवसायात शिरला. आणि सुलू, हे आपण बसलोय ते हॉटेलही मुकुंद दादाचंच आहे.

"उन्हाळयाच्या सुट्टीनंतर सुलभा रेगे परत नाशिकला आलीच नाही. ती आत्याकडे धारवाडलाच राहिली, आणि बरंका रवि, तीच सुलभा रेगे उर्फ सुलू आत्ता आपल्यासमोर मशाळकर मॅडम म्हणून बसली आहे. रामभाऊंच्या आत्महत्येनंतर ती चोरीची केस नाशिक पोलिसांकडे गेली. वरवर चौकशी झाली. एक हजार रुपयांचा अपहार कदाचित पोलिसाना क्षुल्लक वाटला असेल. शाळेच्या चौकशी समितीने सहा महिन्यांनंतर आपला अहवाल दिला. त्यात त्यांनी लिहिलं होतं की परिस्थिजन्य पुराव्यावरुन सुलभा रेगेला पैशांचा अपहार करण्याची संधी होती. रामभाऊंच्या कुटुंबीयांची आणि त्याना ओळखणाऱ्या जवळच्या मित्रांची तर सुलभा रेगे दोषी असल्याबद्दल खात्रीच आहे. रेगे कुटुंब धारवाडलाच स्थलांतरित झालं. त्यामुळे कोणाचाही त्यांच्याशी संपर्क राहिला नाही. पण मुकुंद दादा अजुनही सुलभा रेगेच्या शोधात आहे, कारण त्याच्या कुटुंबाची वाताहत व्हायला सुलभाच कारणीभूत आहे, असं तो समजतो. इथले सगळे गुंड हाताशी आहेत त्याच्या."

a

निलिमाने इकडे तिकडे पाहिलं आणि उभ्या असलेल्या वेटर ला जवळ बोलावलं. आपला मोबाईल त्याच्या हातात देत ती म्हणाली, "अहो जरा ग्रुप फोटो घ्या आमचा". आणि वेटरने त्या त्रिकुटाचा पटकन फोटो घेऊन टाकला. वेटर ला "थँक्यू" म्हणून निलिमाने आपला मोबाईल परत घेतला.

"सुलू, टॅक्सी मध्ये घेतलेल्या फोटोंमधे तू तुझा चेहरा चांगल्यापैकी लपवला होतास . पण तुझी ही त्रिकोणी कानाची पाळी मला ओळखीची वाटली आणि कानावरुन दोन केसांच्या बटा सोडायची तुझी जुनी स्टाईल. तुझी ओळख पटायला त्यामुळे अवघड गेलं नाही मला. आमची शिकार करू पहाणारा शिकारी कोण आहे, हा डाव कोणी मांडलेला आहे, हे समजायला हवं होतं मला. त्या पंधरा वर्षांपूर्वीच्या चोरीबद्दल पुराव्यानिशी माहिती मी आत्ता तुझ्या या फोटोसकट जर मुकुंददादाला दिली तर तू बोरिवलीतून बाहेर जिवंत जाऊ शकणार नाहीस". निलिमा म्हणाली.

मशाळकर मॅडम उर्फ सुलूचा चेहरा पांढरा फटक पडला होता.

"निलू, रवि सर तुझे मिस्टर आहेत हे माहिती नव्हतं मला. आय ॲम व्हेरी सॉरी. नको सांगू तू काही मुकुंद दादाना. मी सरांचे सगळे फोटो डिलीट करते. विश्वास ठेव माझ्यावर." मशाळकर मॅडम म्हणाल्या.

"सुलू, तुझा मोबाईल ठेवून घेणार आहे मी. आणखी कुठेही रविचे फोटो असतील तर ते डिलीट झाले पाहिजेत. आणि हे लोकांना फसवायचे, कचाट्यात पकडायचे उद्योग ताबडतोब थांबले पाहिजेत. अशा कुठल्याही कारस्थानात तुझा हात असल्याचं माझ्या कानावर जरी आलं तरी ताबडतोब तुझा फोटो मुकुंद दादाकडे जाईल. लक्षात ठेव आता तू शिकारी नाहीस, स्वतः उभारलेल्या पिंजऱ्यात तूच अडकली आहेस. आणि हो, आजच्या या जेवणाचं बिल तूच द्यायचं आहेस.

सुलू उर्फ मशाळकर मॅडमने लवकरच तिथून पाय काढता घेतला.

घटना इतक्या वेगाने घडत गेल्या की संकट आता टळलंय, यावर रविचा प्रथम विश्वासच बसेना. न राहवून निलिमाचा हात रविने घट्ट हातात धरला. जीवनातला तोच एक त्याचा एकमेव भक्कम आधार होता.

“नाशिकहून एवढी सलग बित्तंबातमी कशी मिळवलीस तू दोन दिवसात?” रविने आश्चर्याने निलिमाला विचारले.

“कॉन्टॅक्टस्”. निलिमा म्हणाली. “अरे, जुन्नरला जसा तुझा किशाभाऊ आहे नं, तशी माझी नाशिकला काशीताई आहे.”

आणि दोन आठवड्यांनंतर प्रथमच दोघंही खळखळून हसले. अगदी खळखळून हसले.

शाम काकांनी गोष्ट संपवली आणि ते अनिल काटकरला म्हणाले , “अनिल घाबरू नकोस, जरा धीर धर, खटपट कर. हात पाय गाळून बसू नकोस. नक्कीच तू या भोवऱ्यातून बाहेर पडशील”

——-X——

# २

# कल्लोळ भावनांचा

शाम काका बोलत होते,

“जीवनातल्या साध्या सुध्या कठीण प्रसंगांना, संकटांना तोंड देणे तेवढे कठीण नसतं. प्रतिस्पर्ध्याच्या योजनेला शह प्रती-योजनेने देता येतो हे तर आपण पाहिलंच. निलीमाने, रवीच्या पत्नीने असा काही मार्ग काढला की रवी काटकर जिंकला.

“पण नेहमीच हे काही सहज शक्य होत नाही. एखाद्याने सूड बुद्धीने किंवा विचारपूर्वक रचलेले कारस्थान बेसावध माणसाला पूर्ण नेस्तनबुत करू शकते. अशा परिस्थितीत काय करावं, तर हार न मानता थोडीशी माघार घेवून मग आपले मोर्चे पुन्हा बांधण्याची अवश्यकता असते. कधी कधी कारस्थानी माणसाची वाट सोडून आपला दूसरा स्वतंत्र मार्ग घ्यावा लागतो. .....

“....अविनाशवर असाच दुर्धर प्रसंग आला होता त्याची गोष्ट ऐकण्यासारखी आहे”

गोष्ट म्हटल्यावर सगळेच सरसावून बसले. शाम काकांनी आपल्या रिकाम्या ग्लासला हात लावला. त्यासारशी दोन तरुण ऑफिसर उठले, एकाने बारजवळ जावून ग्लास भरून आणला , दुसऱ्याने पकोड्यांची प्लेट मागवली. शाम काका खुष झाले. त्यांनी अविनाशची गोष्ट सांगायला सुरुवात केली.

“....रात्री आठचा समय. अविनाशचा चेंबूरमधला फ्लॅट.

अविनाश बिछान्यावर पडला होता, मनोमन तगमगत होता. अविनाशला संध्याकाळी अचानकच पडलेल्या मानसिक आघाताने पूर्ण नेस्तनाबूत केलं होतं. पावसाने झोडपलेल्या पॅसिफिक महासागरातल्या एखाद्या छोट्याश्या बेटाप्रमाणे त्याची स्थिति झाली होती. मनाला, बुद्धीला पूर्णपणे गुरफटून टाकणाऱ्या किर्र काळोखी बुरख्याखाली ते अविनाश नावाचं बेट थरथरत होतं. भावनांचा कल्लोळ सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे घोघावत होता, मनात चक्री वादळ निर्माण करत होता. मानसिक वेदनांचा पाऊस बेटाला झोडपत होता. आपत्तीनी थैमान घातलं होतं॰ अविनाश नावाचं ते बेट असहाय झालं होतं. निमूटपणे हा भावनांचा कल्लोळ सहन करत होतं.

मनाच्या अशा तगमगीतच अविनाशचा डोळा लागला. पाचच मिनिटं का होईना, झोप घेतल्यानंतर मनातली वादळं बऱ्याच प्रमाणात शमली. आविनाशच्या मनाला शांतपणे विचार कण्याची क्षमता आली. संध्याकाळी ओफिसमध्ये अकस्मात घडलेल्या दुर्दैवी घटनांचा तो संगतवार विचार करू लागला.

घडलं होतं ते असं,

अविनाश आणि निर्मला जोशी साहेबांच्या ओफिस कडे निघाले होते.

लिफ्ट पाचव्या मजल्यावर पोहोचली आणि लिफ्टची दारे पुरती उघडण्याची वाटही निर्मलाने पहिली नव्हती. रडत रडत हुंदके देत ती लिफ्टच्या बाहेर पडली आणि जोशी साहेबांच्या केबीन कडे धावू लागली. अविनाशही लिफ्टच्या बाहेर आला होता आणि अचंब्याने आ वासून निर्मलाच्या हुंदके देत रडत लगबगीने चालणाऱ्या, धावणाऱ्या आकृतीकडे पाहतच राहिला होता. असहाय तरुणीचं अन्यायाला बळी पडलेल्या अबलेचं निर्मलाने धारण केलेलं हे रूप आविनाशला नवीनच होतं. सावकाश पाऊले टाकत आविनाशही जोशी साहेबांच्या केबिनकडे चालू लागला.

a

जोशी साहेबांच्या सेक्रेटरीने आविनाशला आत आलेल पहिलं आणि समोरच्या खुर्चीकडे निर्देश केला. आविनाशने खुर्ची ओढली आणि तो बसला. आतमधून, जोशी साहेबांच्या केबिन मधून अस्पष्ट आवाज येत होते. निर्मला हुंदके देत देत जोशी साहेबांना काही तरी सांगत होती. शब्द अगदीच अस्पष्ट असल्यामुळे जोशी साहेबांना ती काय अतिरंजित कहाणी सांगत असेल ते समजण शक्य नव्हतं.

अविनाशला त्याच्या भोवती जमलेल्या अशुभ छाया आधीच भेडसाऊ लागल्या होत्या, येणाऱ्या अनामिक संकटाची चाहूल तशी लागली होती पण डोंगरा एवढ्या प्रलय लाटेची मात्र कल्पना तो करू शकला नव्हता।

दहा एक मिनिटा नंतर निर्मला बाहेर आली. सेक्रेटरी ने दिलेला टिश्यु तिने रडक्या चेहेऱ्यानेच स्वीकारला आणि तिथलीच एक खुर्ची ओढून ती जमिनीकडे पाहत डोळे पुसत बसली. हुंदके आता थांबले होते.

जोशी साहेबांनी अविनाशला आत बोलावलं. अविनाशच्या पुढ्यात जोशी साहेबांनी एक काही मजकूर लिहिलेला कागद सरकवला. निर्मलाच्या हस्ताक्षरात लिहिलेली अविनाश च्या विरुध्द तक्रार होती ती. "बंद लिफ्ट मध्ये विनय भंगाचा प्रयत्न, लैंगिक छळ" असे अविनाशच्या गलिच्छ वागणुकीचे आरोप त्यात केले होते. खाली सही, निर्मला चंदा.

जोशी साहेबांनी अविनाशचा हात थोपटला. सहानुभूतिपूर्वक शब्दात त्यांनी अविनाशला समजाऊन सांगितलं की अशी लेखी तक्रार बरोबरीने काम करणाऱ्या महिलेकडून येणे ही गंभीर बाब आहे आणि या बाबतीत अविनाशला ते काही मदत करू शकतील असे वाटत नाही. जोशी साहेबांनी फोन उचलला आणि पटापट निर्णय घ्यायला सुरुवात केली.

अविनाशच्या हातात सोपवलेलं बँक व्यवसाय समन्वय प्रकल्पाचं काम पूर्ण थांबवलं. निर्मलाला तिच्या कन्सलटिंग इंजिनीअरिंग फर्म कडून परत बोलवण्याची विनंती केली आणि नंतर ते अविनाशकडे वळले.

a

अशा गंभीर आरोपानंतर काहीतरी उचित पाऊले उचलणे त्यांना भागच होते. अविनाशला जोशी साहेब म्हणाले, की हे आरोप शंभर टक्के खोटे असूही शकतील, पण त्यांची शाहनिशा करण्यात आणि त्यांची चिकित्सा करत बसण्यात त्यांना फारसा अर्थ दिसत नव्हता. प्रकरण जास्तच चिघळत गेलं असतं आणि शेवटी निकालाचं पारडं महिला तक्रारदाराच्याच बाजूने झुकतं असा अनुभव होता. जोशी साहेबांच्या मते, या क्षणीच काही तडजोडीचा मार्ग काढणे जास्त श्रेयस्कर दिसत होते.

तडजोड ! आरोपांमध्ये सत्याचा लवलेश नसताना तडजोड ! अविनाशचा विश्वासच बसेना. जगात न्याय व्यवस्था राहिलीच नाही काय या विचाराने त्याची मती गुंग झाली.

जोशी साहेबांनी अविनाश पुढे दोन पर्याय ठेवले. पहिला पर्याय असा की अविनाशने तक्रारदाराशी तडजोड करावी आणि कंपनीच्या दुसऱ्या विभागात बदली स्वीकारावी. दूसरा पर्याय म्हणजे कुठल्याही अटीविना नोकरीतून मुक्तता.

जोशी साहेबांची कचखाऊ सहानुभूती अविनाशला तिरस्कृत वाटली. पहिला पर्याय अस्वीकारणीय वाटला.

अविनाशने तडका फडकी तिथल्या तिथे राजीनामा दिला आणि तो बाहेर पडला. राजीनाम्या मुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा अविनाशने विचारही केला नाही. त्याच्यावर अन्याय झाला होता. घोर अन्याय. त्याची बाजू ऐकून न घेता चुकीचा निवाडा दिला गेला होता. लाजिरवणे आरोप त्याच्यावर उगीचच केले गेले होते आणि त्यांचे खंडन करण्याचा मार्गही बंद केला होता. का तिने अस करावं ? एवढी टोकाची पायरी विनाकारण का घ्यावी ? अविनाशचं डोकं भणभणायला लागलं. भावनांचा काल्लोळ उठला. सूड, सूड. सूड घेण्याची भावना त्या खळबळाटातून डोके वर काढू लागली. या क्षणी सर्व जगाला ओरडून सांगून तो निर्दोष असल्याचे पटवून देणे हे त्याच्या दृष्टीने आत्यंतिक महत्त्वाचे होते.

……

.  अविनाशला एकट्याला या दुर्दैवी प्रसंगाला तोंड देणे अशक्य झाले. आयुष्यात आजवर सामना केलेले अनेक प्रसंग, हितशत्रूंचे, हितचिंतकांचे चेहेरे त्याच्या डोळया समोर नाचू लागले. आणि त्या सर्वांमध्ये सर्वात ठळक चेहरा म्हणजे निर्मला चंदाचा. या सगळया संकटामागचे मुख्य कारण असलेली खलनायिका. निर्मला चंदा०

त्याच रात्री अविनाशने आपलं सामान आवरलं आणि जुन्नरला प्रकाश कडे, आपल्या भावाच्या गावी प्रयाण केलं.

सुदैवाने जोशी साहेबांनी या प्रकरणाचा विशेष गवगवा होवू दिला नव्हता. बँक समन्वय प्रकल्प आणि अविनाश या दोहींचे अस्तित्व क्षणात संपुष्टात आले होते. काही काथ्याकूट झालाच नाही. कोपऱ्या कोपऱ्यात, चहाच्या घोटाबरोबर थोडी फार चर्चा झाली असेल म्हणा, पण गवगवा असा झाला नाही. प्रकरण संपले. लोक विसरून गेले.

म्हणतात की शेपटावर पाय पडलेली, दुखावलेली नागिण दंश केल्या शिवाय राहत नाही. पण, अरे, येथे नागिण नाही, नागोबा नाही, वारूळ ही नाही आणि कोणी कोणाला दुखावलेलंही नाही. मग कारण काय, असले गलिच्छ आरोप करण्याचं?

गेल्या सहामाहीतल्या घडामोडींचा चलत्चित्रपट अविनाशच्या डोळ्यांसमोर सरकू लागला. बँक समन्वय प्रकल्प हे कंपनीने हाती घेतलेलं एक महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट होतं. अविनाश प्रोजेक्ट चा मॅनेजर होता आणि प्रोग्रामिंग कोडिंग ला मदत करण्यासाठी निर्मला चंदा सीनियर प्रोग्रामर आणि मंदाकिनी जुनीयर प्रोग्रामर अशी जोडी कन्सलटिंग इंजीनीयरिंग कंपनीने पाठवली होती. आणि कोन्ट्राक्टला अनुसरून या प्रोग्रामर जोडीची राहण्याची सोय कंपनीच्या हाऊसिंग

कॉलनी मध्ये जोशी साहेबांच्या बंगल्याशेजारच्या सीनियर ओफिसर गेस्ट हाऊस मध्ये केली होती.

निर्मला चंदाचा नितळ गोरा रंग आणि राजघराण्याचा रुबाब यामुळे ऑफिस मध्ये ती पटकन चर्चेचा विषय झाली होती. पण निर्मलाने कोणाशीही ज्यास्त सलगी वाढवली नाही. उलट सर्वांना तिने आपल्या तुसडेपणाने दोन हात दूरच ठेवले. ऑफिसमधल्या काळेने तिचे टोपण नाव हिमकन्या असं ठेवलं आणि तेच तिला चिकटलं.

अविनाशबरोबर मात्र निर्मलाची वागणूक वेगळी असायची. प्रोजेक्ट प्रमुख असल्यामुळे अविनाशबद्दलचा आदर तिच्या वागण्यात दिसत असे. नंतर मात्र अविनाशबरोबर तिची वागणूक जास्त जास्तच सलगीची होवू लागली. अविनाशला ते जाणवलं आणि त्याने तिला बिलकूल प्रोत्साहन दिले नाही. उलट, एखाद्या दिवशी उशिरापर्यंत काम चालत असेल तर अविनाश सिक्युरिटी च्या माणसाला खबरदारी म्हणून आसपास राहायला सांगत असे. निर्मलाला हा दुरावा आवडायचा नाही आणि अशा प्रकारे झिडकारले जाण्याची तिला सवयही नव्हती. त्यामुळेच तिने ही टोकाची पायरी गाठली असावी. पण इतकी टोकाची ?

प्रश्न ऑफीस च्या कामा मध्ये वैयक्तिक संबध कितपत सलगीचे असावे याचा होता. त्यावरून इतकी टोकाची पायरी गाठायचं काहीच प्रयोजन अविनाशला दिसेना. याचा सूड घेतलाच पाहिजे. सूड घेण्याची ही वेळ नक्कीच नव्हती, पण वाट पहायची आणि संधि येईल तशी पावले टाकायची. आता वेळ होती ती स्वतःला सावरायची आणि संपूर्ण विस्कळीत झालेले जीवन पुन्हा मार्गी लावण्याची.

जुन्नरच्या शांत वातावरणात अविनाश रमला, त्याने स्वतःच्या मनाला रमवून घेतलं. अविनाशच्या प्रकाशदादाची आणि सुलभा वाहिनीची अविनाशला खूपच मदत झाली. त्यांच्या खांद्याला खांदा लावून गुरं धुणे, दूध काढण्याच मशीन

चालवणे या पासून ट्रॅक्टरने जमिनीची नांगरणी करण्यापर्यंत कामे करायला अविनाशने मागे पुढे पाहिलं नाही.

सहा महीने गेले. अविनाश एव्हाना खूपच सावरला होता. त्याला आता त्याचे कोम्प्युटर, सॉफ्टवेअर, हार्डवेअर खुणावून बोलावू लागले होते. शेतावरच्या कामापेक्षा दोन्ही हाताची बोटे की-बोर्ड वर सफाईने फिरवत एकाग्रतेने मॉनिटर कडे बघण्याची त्याला ओढ लागली होती.

.आणि एके दिवशी अविनाशने जुन्नरला राम राम ठोकला आणि पुण्याच्या एका कोंम्प्युटर स्टार्ट-अप कंपनी मध्ये नोकरी मिळवली.

दिवसा मागून दिवस गेले. वर्षांमागून वर्षे गेली.

काळाने आपली पाऊले टाकली. वीस वर्षे गेली.

अविनाशने खूप काम केलं, अगदी जमिनीला नाक घासून काम केलं. प्रोजेक्ट मिळवले, वेळेवर पूर्ण केले. कंपनीचा पसारा हळू हळू वाढत गेला, राज्य स्तरा वरुन राष्ट्रीय स्तरावर आणि पुढे आंतर राष्ट्रीय स्तरावर कंपनी जाऊन पोहोचली.

अविनाशचीही प्रगति झाली. सर्वात उच्चस्तरीय मॅनेजमेंट पदावर तो विराजमान झाला. मुंबईच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर च्या ओफिस मधून कंपनीच्या कारभाराची जागतिक सूत्रे हलवू लागला.

गेल्या वीस वर्षातल्या सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक स्थित्यंतरानंतर अविनाशच्या मनातल्या बरेचसे चांगल्या – वाईट आठवणीचे, गोड कडू क्षणांचे चित्रपट अस्तंगत झाले खरे पण चित्ररूपाने एक आठवण प्रकर्षाने तेवतच राहिली, आणि ती म्हणजे, वीस वर्षापूर्वीच्या “त्या” घटनेची आठवण, मनातली निर्मला चंदाची दुष्ट प्रतिमा. एक न विसरण्यासारखा अनुभव, खलनाईकेची प्रतिमा. सूडाच्या भावनेतून जागृत राहिलेली.

a

कुशल नेतृत्वाखाली कंपनीची सर्वांगिण प्रगति झाली, पसारा वाढला. भक्कम पायावर जरी ती उभी होती, उत्तुंग शिखरे जरी गाठत होती, तरी सुद्धा, जगाच्या अटीतटीच्या बाजारपेठेत अग्रस्थान टिकवून ठेवण्यासाठी कंपनीला देशांतर्गतचा पाया आणखी मजबूत करावयाचा होता. मेट्रो शहरांच्या खाली द्वितीय स्तरावरच्या शहरा मध्ये जावून तिथे पर्यायी कार्यस्थळे उभारायची होती.

जळगाव, सूरत, सोलापूर .... शोध चालू होता.

आज सोलापूरच्या नवीनच उघडलेल्या शाखे मध्ये प्रोग्रामर पदासाठी फायनल इंटर्व्यु सुरू झाले होते. सकाळचे आकरा वाजले होते. चीफ टेक्निकल ओफिसर अविनाश बर्वेच्या नेतृत्वाखाली सीनियर टीम हजर होती. दोन उमेदवारांचे इंटर्व्यु झाले होते, तिसऱ्या उमेदवाराची प्रतीक्षा होती.

“सर येवू का मी आत?” एक गोड आवाज आला. .

अविनाशने वर मान केली. त्याचा स्वत:च्या डोळयांवर विश्वासच बसेना.

आपण स्वप्नात तर नाही ना, ते पहायला त्याने स्वतःला एक चिमटाही काढला, कारण त्याला दरवाज्यात “ती” उभी असलेली दिसत होती. “ती”, जिला गेले वीस वर्षे अविनाश आपली कट्टर शत्रू समजत होता, “ती” उभी होती. हसऱ्या चेहेऱ्याने आत येण्याची परवानगी मागत होती.

तिरस्काराची एक तीव्र सणक अविनाशच्या मस्तकात उठली. घालवून द्या तिला, धक्के मारून हाकलून द्या, दरवाजा बंद करा असा त्याच्या मनात प्रतिसाद उमटला. क्षणातच अविनाश भानावर आला. ही मुलगी लहान होती. ही, “ती” असण्याची शक्यता नव्हती。

“या आत”。 अविनाश म्हणाला.

उमेदवार मुलगी “धन्यवाद सर” म्हणत आत आली , स्थानापन्न झाली. नाव मनीषा आगरवाल. युनिवेर्सिटी मध्ये कोंम्प्युटर सायन्स प्रथम क्रमांक. कंपनीने उमेदवारांच्या घेतलेल्या चाचणी परीक्षेत पहिला क्रमांक.

प्रश्न विचारले गेले. समाधानकारक उत्तरे मिळाली. अविनाशने विचारलेल्या वैयक्तिक प्रश्नांना उत्तरं मिळाली. मनीषाचे वडील जगदीश आगरवाल. त्यांची सोलापुरातच स्वतःची अक्कौउंट्स आणि ऑडिट फर्म होती, आईचे पूर्वाश्रमीचे नाव राधिका वर्मा. ती चार्टर्ड अक्कोंटंट असून जगदीश आगरवालच्या बरोबरच फर्म चालवत होती.

बऱ्याच प्रश्नांना उत्तरे मिळाली होती पण एक प्रश्न राहिलाच की अविनाशच्या मनात साठवलेल्या निर्मला चंदा च्या प्रतिमेशी हिचं खरंच साम्य होतं, की तो केवळ आभास होता ? उत्तर नव्हतं .

दुपार झाली. दिवसभराचे ठरवलेले इंटर्व्यु संपले. अविनाश विश्रांती साठी हॉटेल कडे परतला. संध्याकाळी शहरातल्या प्रथितयश उद्योजकांना, व्यावसायिकांना भेटण्यासाठी हॉटेलच्या कॅानफरन्स हॉल मध्ये सेमिनार, कॉकटेल आणि डिनर आयोजित केले होते.

अविनाश ठरल्या वेळी खाली आला. जमलेल्या प्रथितयश लोकांसमवेत हितगुज केले, पॅनेल डिस्कशन द्वारे सर्व शंकांचे निरसन केलं. वातावरणात खूपच मोकळेपणा आला. हसत खेळत कॉकटेल व डिनर पार पडले.

रात्रीचा नऊ वाजण्याचा सुमार होता. अविनाश आणि त्याचे सहकारी शहरातल्या मान्यवर पाहुण्यांसमवेत, नाशिक हून मुद्दाम मागवलेल्या शांपेनचा स्वाद घेत सोफावर आरामात बसले होते. छोट्या छोट्या ग्रूप्स मध्ये लोक विखुरले होते. पाहूण्यांपैकी एक सदगृहस्थ अविनाश जवळ आले आणि स्वतःची ओळख करून दिली. “मी जगदीश आगरवाल”. अविनाशला नाव ओळखीचे वाटले पण लगेच संदर्भ लागला नाही. आगरवाल पुढे म्हणाले, “ सर माझी इथे अक्कौंट्स आणि ऑडिट ची फर्म आहे. आणि हो, सर, माझ्या मुलीने, मनीषाने आपल्या कंपनीत प्रोग्रामर च्या पोस्ट साठी अप्लाय केलेलं आहे. आजच इंटर्व्यु झाला तिचा”

a

अविनाशच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. शांपेनचा ग्लास त्याने बाजूला ठेवला. विचारशक्तीला नेहमीची धार आली.

“हे माझ कार्ड सर” आगरवालने खिशातून पाकीट काढलं होत आणि त्यातूनच एक बिझिनेस कार्ड काढून अविनाशला देऊ केलं. आगरवालने दुसऱ्या हातात धरलेल्या पाकीटाकडे अविनाशचं लक्षं गेल.

“मनीषाचा फोटो दिसतोय पाकिटात” अविनाश उद्गारला.

“नाही सर हा माझ्या पहिल्या पत्नीचा, निर्मला चंदाचा फोटो आहे”. आगरवाल उत्तरले.

“निर्मला चंदा ?” अविनाश उद्गारला. “ पण मनीषाने तर दुसरंच काही नाव सांगितलं होतं . ते नव्हतं का खरं ?”

“तसे नाही सर, निर्मला ही माझी पहिली पत्नी. मनीषाची नैसर्गिक आई० आगरवाल स्पष्टीकरण देते झाले. “सर त्याचं काय आहे, सुमारे वीस वर्षांपूर्वी निर्मला चंदा माझ्याबरोबर मुंबईला कॉमप्यूटर सोल्युशन कंपनीत काम करत होती. आमची मैत्री झाली आणि विवाहही झाला. त्यानंतर वर्षभरातच मनीषा जन्मली, पण दुर्दैवाने त्या बाळंतपणात आम्ही निर्मलेला गमाऊन बसलो”. आगरवाल पुढे म्हणाले, “मनीषाने तिच्या नैसर्गिक आईला पहिले देखील नाही. तिचे लहानपणापासून लालन पालन माझ्या दुसऱ्या पत्नीने, राधिकाने केले आहे. त्यामुळे मनीषा अगदी पूर्णांशाने राधिकालाच आपली आई मानते. मनीषा वर चांगले संस्कार बिंबवण्याचं, तिला मर्यादाशील बनवण्याचं श्रेय राधिकालाच जातं.”

अविनाश काहीच बोलला नाही. पण त्याच्या मनातील प्रश्न त्याच्या चेहेऱ्यावर पूर्णपणे उमटले होते.

मग आगरवालच पुढे म्हणाले, “सर हा फोटो फक्त एक आठवण म्हणून मी पाकिटात ठेवला आहे. अगदी भावना विरहित शुष्क आठवण.

“होत्या, वीस वर्षापूर्वी त्या फोटोला खूप भावना निगडीत होत्या. पण आता त्या पुसल्या आहेत सर. आठवणींशी खूप भावना निगडीत असतात, पण नंतर हळू हळू त्या विरळ होतात. कधी कधी विरळ व्हायला आपल्याला थोडे प्रयत्नही करावे लागतात. सर जीवन असंच आहे बघा”

अविनाशच्या मनात विचारचक्रे सुरू होती. भावनांचा उठलेला कल्लोळ असा आपोआप शांत कसा होईल ? नाही शक्य हे.

शांपेनचे घुटके सारासार विचारांची धार बोथट करत होते.

अन्यायाचा सूड. अन्यायाचा सूड. आलेली ही संधि दवडून उपयोग नाही. मनीषा आगरवालला कंपनीमध्ये प्रवेश नाकारला पाहिजे आणि आगरवालची अक्कौंट्स फर्म ब्लॅक लिस्ट करायला पाहिजे. अविनाश समाधानाने झोपला.

सकाळ उजाडली. पक्षांच्या किलबिलाटाने सजलेली सोलापूरची सुंदर सकाळ. हवाही छान होती. प्रसन्न, प्रदूषण विरहित.

निवड झालेल्या उमेदवारांची यादी करण्यासाठी निवड समितिची बैठक बरोबर नऊ वाजता सुरू झाली. त्या यादीनुसार मनीषा आगरवाल चे नाव पहिल्या क्रमांकावर होते.

अविनाशच्या कपाळावर आठ्या पसरल्या.

“आणि सर”, टेक्निकल औफिसर पुढे सांगत होता. “लोन फायनान्सचे जे नवीन सॉफ्टवेअर रिलीज झालंय नं, ते तिने चांगलं आत्मसात केलंय. आपल्या परदेशातल्या प्रोजेक्टच्या टीमना ती चांगलं मार्गदर्शन करू शकेल. तिला टीम लीडर म्हणून आपोइंट करणे खूप फायद्याचे होईल सर “

अविनाश विचार करू लागला

ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर बोलू लागला, “आणि सर या उमेदवाराच्या वडिलांची जी अक्कौंट्स आणि ऑडिट कंपनी आहे ती या भागात खूपच

नावाजलेली आहे. सचोटीच्या कामाबद्दल ते प्रसिद्ध आहेत आणि त्यांच्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रात बऱ्याच ओळखी आहेत. या कंपनीला पॅनेलवर घेतलं तर आपला फायदा होईल सर"

अविनाश मधला व्यावसायिक जागा झाला. कंपनीची प्रगति होणे, या गळेकापू राजकारणी काळात, अटीतटीच्य चुरशीच्या काळात चांगले कसबी कर्मचारी, कसबी व्यावसायीक आपल्या पंखा खाली असणे किती महत्वाचे आहे हे अविनाशला चांगलेच ठाऊक होते. अविनाशने डोळे मिटले, दोन क्षण विचार केला. त्याच्या डोळ्यासमोर निर्मला चंदा ची प्रतिमा आली खरी पण तिच्या भोवतालची ती दुष्ट काळी वलयं कुठे नाहीशी झाली होती. अविनाशने आपला निर्णय दिला,

"मनीषा आगरवालला "टीम लीडर" म्हणून नेमणूक पत्र द्या आणि दोन पायऱ्या वरचा सुरुवातीचा पगार देऊ करा."

"जगदीश आगरवालच्या अकौंट आणि ऑडिट फार्मला आपली "व्यावसायिक भागीदारी" देऊ करा॰

अविनाशच्या मनातला भावनांचा कल्लोळ संपुष्टात आला होता.

...........

काळ धावत होता. पुढे पाऊले टाकतच होता.

दोन वर्षांनी काल पुढे सरकला.

सोलापूरच्या नव्या विभागाचं काम फारच छान चाललं होतं. मनीषा आगरवालच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली प्रोजेक्टस उत्तम तऱ्हेने आणि दिलेल्या वेळेत पूर्ण केले जात होते, ग्राहक खुश होत होते. कंपनीला चांगली आमदनी मिळत होती.

अविनाश त्यांच्या कामावर, कार्यपध्दती वर लक्षं ठेवून होता. दर तीन महिन्यांनी अविनाश कामाचा एकंदर आढावा घेण्यासाठी सोलापूरला जात असे.

दिवसभर सर्व व्यावसायिक संलग्न कंपन्यांबरोबर, व्यावसायिक भागीदारांबरोबर मीटिंग्स झाल्यावर सायंकाळची कॉफी जगदीश आगरवाल बरोबर घेण्याचा प्रघातच पडला होता.

दोघांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण झाले होते. बराचसा मोकळेपणा आला होता, दोघांमध्ये व्यावसायिक संबंधांबरोबरच मित्रत्वाचे धागे विणले गेले होते. बऱ्याचदा निर्मला चंदा बद्दल जगदीश आगरवालना प्रश्न विचारण्याची तीव्र इच्छा अविनाशला होत असे पण त्याच्या तोंडातून शब्दच फुटत नसत. का कोण जाणे अविनाशची खात्री होती की त्याच्या मनातले हे द्वंद्व जगदीश आगरवाल पुरेपूर ओळखतायत आणि त्यांच्या डोळयात एक खोडकर झाक येऊन जाते .

शेवटी एक दिवस धीर करून अशाच एका कॉफी मीटिंग च्या अखेरीला अविनाशने घसा खाकरला आणि तो म्हणाला, “मिस्टर आगरवाल, तुम्हाला एक विचारू?”

जगदीश आगरवालने हात वर केला आणि अविनाशला तिथेच थांबवलं. “बर्वे साहेब,” जगदीश आगरवाल म्हणाले, “आपण काय विचारणार आहात ते माहीत आहे मला. या प्रश्नाची बऱ्याच दिवसांपासून मला अपेक्षा होतीच.”

अविनाशने भ्रुकुटी उंचावल्या.

“असं पहा बर्वे साहेब, सुमारे वीस वर्षापूर्वी आपल्या आयुष्यात झालेल्या दुर्दैवी घटनेबद्दल मला पूर्ण माहिती आहे.” जगदीश आगरवाल पुढे म्हणाले, “खरं तर सर, आपल्याला मी इथे बघितलं तेंव्हाच मला आश्चर्य वाटलं होतं आणि म्हणून मुद्दामच खात्री करून घेण्यासाठी पाकीटातला निर्मलाचा फोटो मी तुमच्या नजरेसमोर ठेवला होता. तुमची त्यावरची प्रतिक्रिया तुमच्या ओळखीबद्दल खात्री पटवायला मला पुरेशी होती.”

“बर्वे सर,” जगदीश आगरवाल पुढे म्हणाले. “आपण एका अत्यंत कूट कारस्थानाला बळी पडला होतात. आणि या कारस्थानाचे सुत्रधार होते तुमचे जोशी

साहेब आणि निर्मला चंदा. अगदी काळजीपूर्वक त्या दोघांनी हे कारस्थान उभारलं होतं खरं, पण तुमच्या क्षणार्धाचा विचार न करता तडकाफडकी राजीनामा देऊन निघून जाण्याने ते फसलं. आणि नंतर त्यांना तुमचा काहीच पत्ता लागेना, तुम्ही जगातून जणू अदृष्यच झाला होता. पण या कारस्थानी लोकांकडे पर्यायी योजना तयार होती.

"निर्मलेला मूळ कंपनीकडे परत पाठवलं गेलं, लगेच तिची दुसऱ्या प्रोजेक्टवर रवानगी झाली आणि तिथे बळीचा बकरा सापडलो मी."

"बर्वे सर," जगदीश आगरवाल पुढे म्हणाले. "मनिषाचा जन्म आमच्या विवाहा नंतर वर्षभरात नाही झाला, तो केवळ सहा महिन्यात झाला. निर्मलेच्या एकूण परिस्थितीची जेव्हा मला कल्पना आली तेव्हा बराच उशीर झाला होता. मी बराच चडफडलो आणि इकडे तिकडे चौकश्या केल्या。मला कळलं की त्या आधी निर्मला तुमच्या बरोबर काम करत होती. पण तुमचं चारित्र्य धुतल्या तांदळाइतके स्वच्छ असल्याची सर्वांनीच ग्वाही दिली."

जरा थांबून जगदीश आगरवाल पुढे म्हणाले, "आणि बर्वे सर, नंतर मला पुरावा मिळाला. हाऊसिंग कोलनीतल्या नोकरांकडून अगदी ठोस पुरावा मिळाला. जोशी साहेबांच्या आणि निर्मलाच्या विशेष दोस्ती बद्दल, त्यांच्या गुप्त भेटींबद्दल, सगळी सगळी माहिती हाती आली."

अविनाशला हे सर्व ऐकून धक्काच बसला. त्याच्या अगदी नाकावर टिच्चून त्याच्याच विरूध्द कूट काळे कारस्थान त्याच्या डोळया समोर रचलं गेलं होतं आणि त्याला याचा थांगही लागला नव्हता, किती हा भाबडेपणा ! पण कदाचित कंपनीच्या हाऊसिंग कॉलनी मध्ये राहत नसल्यामुळे, आणि आपण बरे की आपले काम बरे या त्याच्या धोरणामुळे, अविनाशला याच नाही तर कॉलनीतल्या इतर अनेक खऱ्या-खोट्र्या कहाण्याबद्दल अज्ञानच होतं.

a

“त्यांची किती जुनी ओळख होती ते काही मला माहिती नाही”, जगदीश आगरवाल पुढे म्हणाले, “पण हाती आलेल्या पुराव्यानिशी त्या दोघांना मला जाब विचारायचा होता. पण तेवढ्यात ही दुर्दैवी घटना घडली. निर्मलाचा बाळंतपणात मृत्यू झाला. त्यामुळे सारा चेहेरा मोहराच बदलून गेला. मी ठरवलं, की आई बापांच्या अपराधाची शिक्षा बाळाला द्यायची नाही. मनीषा ही माझी मुलगी आहे, राधिकाची मुलगी आहे. आमचं एक सुंदर कुटुंब आहे. म्हणूनच मी तुम्हाला म्हटलं होतं सर, की काल परत्वे भावना विरल होतात, नाहीशाही होतात आणि राहतं काय, फक्त एक प्रसंगचित्र, भावना विरहित चित्र. हेच जीवनाचं मला कळलेलं तत्व आहे सर”.

या संपूर्ण जीवन नाट्यातली अविनाशची भूमिका नक्की काय होती ते कळायला अविनाशला जरा विचार करायला लागला. सगळच अनाकलनीय, कल्पनेबाहेरचं. दिग्दर्शकाने त्याला जी भूमिका दिली होती त्या भूमिकेला अविनाशने अनावधानाने वेगळंच काही वळण दिलं होतं. पण या खेळी मुळेच तो बळीच्या बकऱ्या ऐवजी विजयी वीर झाला होता. विजयी वीर. दुष्ट चक्रव्यूह फोडून बाहेर आलेला विजयी वीर. तो हरला नव्हता, तो जिंकला होता.

गोष्ट संपली. शाम काका थांबले. टेबला भोवती जमलेल्या कोंडाळ्याने उत्स्फूर्त पणे टाळ्या वाजवल्या.

कुणीतरी वेटरला खुणावलं आणि मग त्या जल्लोषात सगळ्यांचेच ग्लास परत भरले गेले.

——X——

# ३

# देवाक काळजी रे

ओरिओ क्लबच्या बार रूम मध्ये मेजर (रिटायर्ड) साने बसले होते. त्यांच्या टेबलावर ते एकटेच होते, विमनस्कपणे आपला ग्लास कुरवाळत होते.

"नमस्कार", बार कडे जाता जाता शाम काका मेजर सानेंच्या जवळ उभे राहिले होते. "काळजीत दिसताय" शाम काकांनी मे. सानेंना विचारले.एक सुस्कारा सोडून मे. साने म्हणाले, "होय हो, परवा घरी दहा गेस्टना जेवायला बोलवलं आहे. ब्रिगेडियर साहेबही आहेत त्या ग्रूप मध्ये , आणि आज आमच्या कूकने सिक रिपोर्ट केलंय. कसं काय होणार आहे समजत नाही."

"सगळं ठीक होईल". त्यांचा हात थोपटत मेजर शाम उर्फ शाम काका म्हणाले, "देव सगळं ठीक करेल."

"आहो काय बोलताय मेजर साहेब, देवाला या बारीक सारिक गोष्टींकडे बघायला वेळ आहे का?" मेजर साने जरा तिरसटपणे ओरडले.

"आहे, आहे. देवाला वेळ आहे आणि त्याचं लक्षही आहे." शाम काका म्हणाले. "अहो तुम्हाला रेडकरांची आणि भालू ड्रायवरची गोष्ट माहीत आहे नं".

मेजर सानेनी नकारार्थी मान हलवली.

शाम काकांनी एक खुर्ची ओढली आणि बसता बसता ते म्हणाले, "सांगतो तुम्हाला".

मेजर सानेंनी एका वेटरला खुणावलं आणि शाम काकाना जे हवं ते पेय आणायला सांगितलं.    वेटरला सांगण्याची गरजच नव्हती. दोन मिनिटात ग्लास

शाम काकांच्या समोर आला. एव्हढेच नव्हे, पाच सहा तरूण ओफिसर्सनी सुद्धा पाहता पाहता खुर्च्या ओढल्या आणि टेबलाभोवती कोंडाळे केले.

शाम काकानी ग्लास वर करून “चीयर्स” केलं आणि एक मोठा घोट घेतला.

मग शाम काका बोलू लागले.

“……ही कथा आहे भालचंद्राची, भालूची.

ही कथा आहे रेडकरांची.

ही कथा आहे भगवंताची, पडद्यामागच्या त्या सूत्रधाराची.

ही कथा आहे एका न घडलेल्या घडामोडीची.

भालू हा रेडकरांचा ड्रायव्हर, एक प्रामाणिक, विश्वासू आणि काहीसा हरकाम्या नोकर. रेडकरांच्या दैनंदिन रामरगाड्याचा एक महत्त्वाचा दुवा.

.

भालू ड्रायव्हर होता. लखुचा बाप होता, रमाचा नवरा होता. एक कुटुंबवत्सल संसारी होता. भालू दोन छकुल्यांचा प्रेमळ आजोबा होता.

भालू तसा अल्प संतुष्ट मनुष्य, आपल्या सीमा ओळखून असणारा, पण उराशी तो एक स्वप्न बाळगून होता.

आपल्या मुलाने, सुनेने, नातवंडांनी चाळीच्या या खबदाडातून सुटावे, पंख पसरावेत आणि सर्वांनी तीन चार खोल्यांच्या फ्लॅट मधे रहायला जावं, अगदी नायगाव, नालासोपारा, विरार पर्यंत, एवढच एक मर्यादित स्वप्न तो पहात होता.

मुंबईत काय किंवा पुढे पसरलेल्या नव नगरांमध्ये काय, अशी स्वप्नं रुजवायला पैशांचं बळ लागतं, खतपाणी लागतं. ते तर भालूकडे नव्हतं आणि

a

त्याच्या तरण्या मुलाकडे, लखूकडेही सध्या तरी नव्हतं. त्यामुळे स्वप्नाच्या बियाण्याची अजुन पेरणीही झालेली नव्हती.

भालूची रेडकरांकडची नोकरी चालूच होती, लखूची मोटरगाड्यांच्या विम्याची फुटकळ कामं चालू होती, सुनबाईच्या घरगुती शिकवण्या चालू होत्या, नातवंडं टाय लावून शाळेत जात होती, ए बी सी शिकत होती. संसाराचा गाडा ढकलंपट्टी का होईना, रेटला जात होता.

रेडकरांकडे दिवसाला फार तर एक दोन तासच भालूसाठी काम असायचं, बहुतेक जवळच्या दुकानांच्या आणि बॅंकांच्या ट्रिप्स. भालू खुष होता. नाहीतरी या वाढत्या वयात दुसरं काही काम त्याला झेपलंच नसतं. सध्या तरी रेडकरांकडुन मिळणारा महिना वीस हजार पगाराचा भालूच्या कुटुंबाला मोठा आधार होता.

तिकडे रेडकरही एक स्वप्न बाळगून होते.

त्याना अमेरिकेला जायचं होतं. पर्यटन करायचं होतं. खूपसं काही बघायचं होतं. नायगारा, स्टॅच्यु ऑफ लिबर्टी, जमेल तेवढं सगळं बघायचं होतं.

पण पैशांची व्यवस्था ! ती कशी करायची !

खूप दिवसांपासून उराशी बाळगलेलं स्वप्न, आता डॉलरचा भाव पहाता, रेडकराना स्वबळावर रेटणं अशक्यच वाटत होतं.

पण रेडकरांचं एक आशास्थान होतं आणि ते म्हणजे त्यांचं कन्यारत्न नितू.

पाच वर्षांपूर्वी सहकुटुंब अमेरिकेला स्थलांतरीत झालेल्या जावईबापूंना कॅलिफोर्निया च्या सिलिकॅान व्हॅलीमधे चांगली नोकरी मिळाली होती. आणि नंतर नितूला नोकरी, एस यू व्ही मोटर गाड्यांची खरेदी, अपार्टमेंट मधुन बंगल्यात रहायला जाणे वगैरे प्रगती टप्प्या टप्प्याने चालू होती. मागच्याच महिन्यात नितू विचारत होती, “काय बाबा, इकडे कधी येताय”? रेडकरांनी तेव्हां काहीच उत्तर दिलं नव्हतं. सुचलंच नव्हतं काही बोलायला.

a

आता दोन दिवसांपूर्वी मात्र नितूनं पक्कं आमंत्रण दिलं होतं, येत्या उन्हाळयात चांगलं पाच सहा महिन्यासाठी आई बाबानी कॅलिफोर्नियाला यायचं, मुलांना सुट्टी लागल्यावर सर्वानी खूप फिरायचं, असे खूपसे प्लॅन तिने केले होते. तिकिटंही नितूच काढणार होती.

रेडकर हरखले होते. मनोमन सुखावले होते. पर्यटनाचे आराखडे बनवायला लागले होते. नायगाऱ्याचे तुषार, ग्रॅंड कॅननची भव्यता, नॅशनल पार्क मधली निसर्गाची भव्यता, लास व्हेगासला स्लॉट मशिन मधून पडणाऱ्या नाण्यांची किणकिण, हॉलिवुडच्या युनिवर्सल स्टुडिओमध्ये बेगडी सेलिब्रिटी बरोबर केलेलं हस्तांदोलन, न्युयॉर्कच्या टोलेजंग टॉवर्समधुन दिसणारा मॅनहॅटनचा पसारा.... सगळं त्याना जाणवायला लागलं होतं. रेडकरांच्या सर्व जाणिवा, सगळी ज्ञानेंद्रियं, अगदी ओव्हरटाईम काम करायला लागली होती. मनाचं फुलपाखरू स्वैरपणे भिरभिरू लागलं होतं.

आणि अचानक विचार आला, की इथली काय व्यवस्था करायची तेही बघायला पाहिजे. दागदागिने बॅंकेच्या लॉकर मधे, बाकीच्या सगळया मौल्यवान वस्तू फ्लॅट मधेच कडेकोट बंदोबस्तात ठेवायच्या, आणि गाडीचं काय ! सहा महिने जुनी गाडी पावसात गंजत ठेवण्यापेक्षा विकुनच टाकलेली बरी. विचारचक्रं चालू होती. प्रत्येक निर्णयाच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजू डोळयांसमोर येत होत्या.

आणि. मग भालूचं काय! सगळयात मोठी नकारात्मक बाजू म्हणजे भालू. नाही म्हटलं तरी महिन्याला पगार, ओव्हरटाईम आणि इतर बक्षिसी मिळून रेडकरांकडून भालचंद्राला वीस ते पंचवीस हजार मिळत असत. रेडकरानी कोविदच्या काळात भालचंद्राला संपूर्ण पगार कामावर न येताही सहा महिने दिला होता. पण आता गाडीच नाही म्हणजे भालूच्या नोकरीला पूर्ण विराम. नोकरीच नाही

म्हणजे ही आमदनी शून्य. एवढा मोठा खड्डा भालू कसा भरून काढील ! भालूच्या कुटुंबावर सांपत्तिक संकट.

भालूची दिवसातून दोन दोन कप दूध पिणारी, टाय लावून शाळेत जाणारी, नातवंडं रेडकरांच्या डोळ्यांसमोर यायला लागली.

एरवी साधेपणाने राहणारी पण गौरी गणपतीला दोन्ही हातांनी खर्च करणारी भालूची गृहिणी रेडकराना आठवायला लागली.

फक्त एका पर्यटन सुखाच्या हव्यासापायी त्या कुटुंबाची पूर्ण आर्थिक वाताहत होणार, आणि याला कारण कोण, तर रेडकर. एका बाजूला अमेरिकन ड्रीम आणि दुसऱ्या बाजूला हे असे भकास दृष्य.

रेडकरानी बाहेर बघितलं. नव्यानेच उगवलेल्या एकदम पॉश टावर इमारतींमधे दिवे झगमगत होते. रेडकर विचार करू लागले. एवढे नवे लक्झरी फ्लॅटस्, श्रीमंत लोक, त्यांच्या चकचकीत गाड्या. दुसरा एखादा ड्रायव्हरचा जॉब मिळायला भालूला फारशी अडचण पडू नये. हां, पगार कदाचित जरा कमी असेल, कामाचे तास वेगळे असतील, पण कुटुंबाची उपासमार तरी होणार नाही.

रेडकरांचा हॅम्लेट झाला होता. सगळेच निर्णय त्यांच्या आवाक्या बाहेरचे वाटत होते.

रेडकरानी देवाला हात जोडले

देवाक काळजी रे.
माझ्या देवाक काळजी रे

ईकडे भालचंद्राच्या घरी काही वेगळ्याच घडामोडी घडत होत्या. लखूला स्टार इन्व्हेस्टमेंट्स कडून चांगल्या नोकरीची ऑफर आली. अगदी त्याला झेपेल, साजेलसे काम. स्टार ची सिस्टर कंपनी म्हणून नवीन निघणाऱ्या कार इन्शुरन्स

a

एजन्सीचा डिविजनल मॅनेजर. लठ्ठ पगार, रहायला मीरा रोडला फ्लॅट. सुमारे एक महिन्या नंतर कंपनीचा नवा सेट अप तयार झाला की लगेच जॉइन व्हायचं होतं.

भालूच्या घरात आनंदी आनंद झाला. लखु म्हणाला, "आई, बाबा, तुम्ही पण आमच्या बरोबर मीरा रोडला चला. सगळे मिळुन आरामात राहु.".

फ्लॅटमधे रहायला जायचं. वेगवेगळ्या खोल्या. खोल्याना दारं, कड्या, खूपच प्रायव्हसी. स्वयंपाक घर वेगळं, बाथरूम, संडास घरात. बाहेर जाऊन लाईन लावायला नको. चोवीस तास पाण्याचा नळ. अगदी परिपूर्ण स्वप्नपूर्ती. पण मग भालचंद्राला एक मोठी अडचण लक्षात आली. मीरा रोड कांदिवली पासून फारच लांब. तिथून रोज रेडकरांकडे कांदिवलीला जा ये करणं अवघडच. तिकडे फ्लॅट मध्ये रहायला जायचं तर कांदिवलीची रेडकरांची नोकरी सोडावीच लागणार.

दैनंदिन व्यवहारांसाठी रेडकरांची भालुवर केवढी भिस्त होती याची भालूला जाण होती. बॅंकेची साधी साधी कामं तर ते भालचंद्राला सांगायचेच पण घरातही भालचंद्राची रेडकराना खूपच मदत व्हायची. वरच्या माळयावरच्या सामानाची चढ-उतार, दिवाळीत इलेक्ट्रिक माळा, आकाश कंदील लावणे, घरगुती रिपेअर कामासाठी प्लंबरला, इलेक्ट्रीशियनला बोलावून आणणे, दिवसाआड विणाताईंच्या सूचनेनुसार भाजीपाला आणणे. ठाई ठाई रेडकरांना आणि विणाताईंनाही भालचंद्राची मदत लागायची. बरं, मीरा रोडला लखूबरोबर न जावं तर इथल्या समता नगर च्या खुराड्यातच कारण नसताना खितपत पडावे लागेल. या सगळ्या त्रांगड्यातुन योग्य निर्णय कसा घेणार!!

आपल्या लांबच्या मेव्हण्याची, राजूची शिफारस करावी का रेडकरांकडे, आपल्या जागी कामाला ठेवून घ्यायला ? पण राजूची पान चघळत बसायची सवय रेडकराना अजिबात आवडली नसती.

आता भालचंद्राची स्थिती मात्र हॅम्लेट सारखी झाली. काय निर्णय घ्यावा ते भालचंद्राला समजेना.

a

भालचंद्राले देवाला हात जोडले.

देवाक काळजी रे.
माझ्या देवाक काळजी रे

शुक्रवारची सकाळ. नेहमीप्रमाणे भालचंद्र कामावर आला. बॅंकेची, बाजारहाटाची वगैरे सगळी कामं झाली. पुढे वीक एन्ड. दोन दिवस भालचंद्राला सुट्टी. गाडी गॅरेजमध्ये ठेवून भालचंद्र चावी द्यायला आला.

रेडकर वाटच पहात होते.

दोघांच्याही मनात वेगळ्या वेगळ्या विचारांचे काहूर माजले होते. वादळी वारे घोघावत होते.

डळमळत आपापल्या निर्णयाप्रत पोहोचलेले दोन हॅम्लेट समोरासमोर समोर आले.

भालचंद्राने चावी ठेवली आणि तिथेच उभा राहिला.

“भालू, एक दोन महिन्यात गाडी विकावी म्हणतो मी.” रेडकरांना म्हणायचं होतं.

“साहेब, एक दोन महिन्यात नोकरी सोडावी म्हणतो मी”. भालचंद्राला म्हणायचं होतं.

पण दोघांनाही बोलायची संधीच मिळाली नाही.

कारण, तेव्हड्यात रेडकरांच्या हातातला मोबाईल वाजला. सातोस्करांचा फोन. इकॉनॉमिक टाइम्स मधे फारच वाईट बातमी होती. रिलायन्सचा संभावित

बोनस इश्यु कॅन्सल झाला होता म्हणे. मार्केटमधे मोठे चढ उतार होण्याची शक्यता होती.

रेडकर तिथेच सोफ्यावर बसले. एकाग्रतेने मोबाईलद्वारे शेअर मार्केटच्या उलाढाली करु लागले. भालू गाडीची चावी ठेवून, "जातो" असे मोघम बोलून निघून गेला.

दुपारी जेवताना विणाताईनी विचारलं, "काय हो, सांगितलं का भालूला"?

रेडकरांनी नुसतीच नकारार्थी मान हलवली. मात्र पुढच्या आठवड्यात कधी न कधी हे अवघड काम करायलाच लागणार होतं, हे रेडकर पुरेपूर जाणून होते.

भालचंद्र घरी पोहोचला. पाण्याचा पेला हातात देताना त्याच्या बायकोने, रमाने विचारलं, "सांगितलं का मालकाना?"

भालचंद्राने नकारार्थी मान हलवली. आपला जॉब सोडण्याचा निर्णय ऐकल्यावर मालकाना हार्ट अॅटॅक आला तर!! अगदी टोकाचे विचार भालचंद्राला भेडसावत होते.

"बघु या सोमवारी" असं मनात म्हणत भालचंद्राने छोटु कंपनीशी खेळायला सुरुवात केली.

शनिवारची सकाळ. वॅाटस् अप फोनचा ट्यून वाजला. नितूचा अमेरिकेहून फोन. विणाताईनी घड्याळात पाहिलं, सकाळचे दहा वाजले होते. "हिचे शुक्रवारच्या रात्रीचे साडे नऊ. जेवणं उरकुन फोन केलेला दिसतोय", असे पुटपुटत विणाताईनी फोन उचलला. स्पीकरही ऑन केला.

"अगं आई, गुड न्यूज" अशा सलामीच्या वाक्याने नितूने तिची गुड न्यूज भराभर सांगायला सुरुवात केली. विणाताई ऐकत होत्या. जवळ बसून रेडकरही ऐकत होते.

विजयला, म्हणजे जावयांना नोकरीमध्ये प्रमोशन मिळाले होतं आणि एक वर्षासाठी त्यांची स्वित्झरलॅंडला जिनिवाच्या ऑफिसमधे डेप्युटेशनवर बदली झाली होती. विजयला पुढच्या आठवड्यातच रुजू व्हायचं होतं आणि शाळांना सुट्टी लागली की दोन अडीच महिन्यांसाठी नितू मुलांना घेऊन जिनिवाला जाणार होती."

"आई, बाबा, तुमची अमेरिका ट्रिप या वर्षी जमेलसं वाटत नाही. पुढच्या वर्षी मात्र अगदी नक्की तय्यार रहा. प्रॉमिस." नितू म्हणत होती. आणखी पाच दहा मिनिटे इकडचं तिकडचं बोलून नितूने फोन ठेवला.

रेडकर सुन्न झाले. त्यांच्या अमेरिका स्वप्नाला अगदीच सुरुंग लागला नसला तरी भगदाड मात्र पडलं होते. शुन्यात बघत सोफ्यावर ते बसून राहिले. त्याना बरं वाटण्यासाठी विणाताई म्हणाल्या, "चला , ट्रिप चांगली प्लॅन करायला हाताशी जरा वेळ तरी मिळाला".

"जन्मभर ट्रिपचं प्लॅनिंगच करत आलोय, आणखी थोडे दिवस वाट बघायची. दुसरं काय आहे आपल्या हातात !" रेडकर म्हणाले.

"अहो, असं पहा नं, भालूच्या बाबतीतले अवघड निर्णयही तूर्त घ्यायला नकोत". विणाताई काळया ढगाची रूपेरी किनार दाखवण्याचा प्रयत्न करत होत्या.

कंटाळवाणा शनिवार असाच निरुत्साही वातावरणात चालला होता. रेडकरानी खाली घातलेली मान वर उठेचना. मग विणाताईनी सातोस्कराना फोन केला आणि संध्याकाळी गप्पा मारायला बोलावलं.

श्री आणि सौ सातोस्कर आले. ग्लासं निघाली, भजी तळली गेली. अनेक विषयांचा कीस पडला. खूपशा ओळखीच्या लोकांवर, अनोळखी लोकांवर ताशेरे मारले गेले. मग सातोस्कर मंडळी जेवायलाही थांबली. शेवटी वातावरण पूर्ण निवळलं, रेडकरांची मन:स्थिती पूर्ववत झाली. काळ्या ढगाच्या सर्व रूपेरी कडांना त्यांच्या मनाने यथोचित दाद दिली.

a

रेडकर दांपत्य शांतपणे झोपलं. भालचंद्राच्या कुटुंबात चाललेल्या घडामोडींची त्याना सुतराम कल्पना नव्हती. आपली स्वप्नं तूर्त कोल्ड स्टोरेज मधे ठेवायची आणि मागचा डाव पुढे चालू ठेवायचा. आहे ते स्वीकारायचं, नो प्रॉब्लेम.

अज्ञानात मोठं सुख असतं. सोमवारी भालचंद्र येईल, त्याच्या महिन्याभरात काम सोडण्याचा निर्णय सांगेल आणि मागच्या डावाची घडी पूर्ण विस्कळीत होऊ शकेल अशा संभावित संकटांची त्याना चाहुलही नव्हती.

पण

देवाक काळजी रे.

माझ्या देवाक काळजी रे

शनिवारच्या संध्याकाळी तिकडे समता नगरच्या चाळीत, भालचंद्राच्या घरात काही वेगळीच घडामोड चालली होती. वातावरण तेवढं ठीक नव्हतं. लखू बाहेरून आला तोच चिडचिडलेला. मुलांवर ओरडला, बायकोवर खेकसला, घटाघटा पाणी प्यायला आणि मग डोळे मिटून बाहेरच्या आराम खुर्चीत झुलत बसला.

जरा वेळाने भालचंद्र बाहेरुन आला. दाराबाहेर चपला काढता काढता त्याने लखुला विचारलं, “काय रे लखू, बरा आहेस ना? असा डोळे मिटून काय बसलायस?”

“सगळा राडा झालाय बाबा.” लखू म्दणाला. “स्टार कंपनीच्या ऑफिसमधे जाऊन आलो मी, त्यांचे प्लॅन बदललेत जरासे, बाबा”. आणि मग तुटक शब्दात, थोडीशी शेलक्या शिव्यांचा पेरणी करत लखु सांगायला लागला.

स्टार इन्व्हेस्टमेंट कंपनीला त्यांच्या विस्तारीकरणाचं लायसेन्स अजून मिळाले नव्हतं. सरकारकडून काही विचारणा झाली होती. काही त्रुटी पूर्ण करायला सांगितल्या होत्या, आणि त्याला उणे पुरे एक वर्ष तरी लागणार होते.

भालचंद्र, रमा आणि लखूची बायको सुचेता, तिघेही ऐकून सुन्न झाले. होते तिथेच खाली बसले. कंपनीच्या साहेबाना आणि सरकारला शिव्यांचा लाखोली वाहण्यासाठी रमाची मनातल्या मनात शब्दांची जुळवा जुळव चालली होती.

तेवढ्यात लखूने हात वर केला. लखू पुढे सांगू लागला.

स्टार कंपनीने अगदीच वाटाण्याच्या अक्षता लावल्या नव्हत्या. आशेचा अंकुर करपला नव्हता. एका वर्षानंतर कंपनीची इन्शुरन्स डिव्हिजन कार्यान्वित होणार होती नक्की. आणि त्याना लखू हवा होता हेही नक्की. लखूला त्यानी एक वर्षासाठी सुधारित ऑफर दिली होती, ती अशी,

लखूने ताबडतोब जॉईन व्हायचं आणि कंपनीच्या सेट अपचं काम घरूनच करायचं. क्लायंटची वर्गवार यादी, कामासाठी लागणारे फॅार्म, कामांची विभागणी ही आणि अशी बरीच जुळवा जुळव करण्यासाठी जी एक टीम गठीत केली होती त्यात लखूचाही समावेश केला जाणार होता.

रमाने मुद्द्याचा प्रश्न विचारला. “पगार किती देतायत, लखू ?”

“वर्षभरात काम तसं नाम मात्रच आहे. त्यामुळे महिना पंचवीस हजाराचे पॅकेज देतायत आई.”

दिवसभर वण वण फिरून मिळणाऱ्या लखूच्या सध्याच्या कमाई ईतकंच हे पॅकेज होतं. यातून एका हाती कुटुंबखर्च भागणं शक्यच नव्हतं.

भालचंद्राच्या लक्षात आलं. निदान येत्या पूर्ण वर्षात भालचंद्राच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या नशिबी समता नगर मधल्या चाळीलाच चिकटुन राहणं लिहिलं होतं.

सोमवार आला. भालचंद्र कामावर रुजू झाला. बॅंकेची, बाजारहाटाची वगैरे सगळी कामं आटोपली. गाडी घरी आली. उतरतां उतरतां रेडकर थबकले. खिशात हात घालून त्यानी पाचशे रुपयांची एक नोट काढली. नोट भालचंद्राच्या हातात

सरकवत रेडकर म्हणाले, "भालू, आज आमच्या अमेरिकेतल्या नातवाचा वाढदिवस आहे. तुझ्या नातवंडासाठी काही मिठाई घे घरी जाता जाता."

"थॅंक यू साहेब" . भालचंद्र हसून म्हणाला. रेडकर गाडीतून उतरले आणि चालू लागले.

अशी ही भालचंद्र उर्फ भालूची कथा संपली.
रेडकरांची कथा संपली
एका न फोफावलेल्या वादळाची कथा संपली.

सर्वे भवन्तु सुखिन: । सर्वे सन्तु निरामया । सर्वे भद्राणि पश्यन्तु ॥

वादळ उठलं होतं. येता येताच वाटेत थबकलं होतं. आल्या पावली माघारी निघुन गेलं होतं.

जगन्नियत्याने त्याच्या अनाकलनीय पध्दतीने ते शमवलं होतं.

रेडकरांच्या स्वप्नांची आणि भालचंद्राच्याही स्वप्नांची पूर्तता नक्कीच होणार होती, पण एकमेकाना दुखावून नाही. स्वप्नांची राख रांगोळी झाली नव्हती. स्वप्नं जिवंत होती, त्याना पालवीही फुटणार होती. सुयोग्य वेळी. सुयोग्य रीतीने.

येईल दिवस तुझाही माणसा
जिगर सोडू नको
तुझ्या हाती आहे डाव सारा
इसर गजाल कालची रे
देवाक काळजी रे
माझ्या देवाक काळजी रे

....शाम काकांची गोष्ट संपली. मेजर साने विचार करत होते, देवाला आपलीही काळजी असेल का? जे संकट, जे वादळ आपल्या जीवनात येऊ पहातंय त्याला कोणीतरी अल्लद फुंकर मारून शमवू शकेल का ?

अस्वस्थपणे मेजर साने टेबलावर बोटांनी ड्रम वाजवू लागले.

तेवढ्यात, मेजर सानेंच्या मोबाईलने टेक्स्ट मेसेज आल्याचा घंटानाद केला.

मिसेस सानेंचा मेसेज होता. "चौदाव्या मजल्यावरचे डॉक्टर गायतोंडे वीक एन्डला माथेरानला चाललेत. त्यांच्या घरात कोणी नसणार आहे. त्यांच्या कुकला, बैजूला शनिवार रविवारी आपल्याकडे ठेवून घ्यायची रिक्वेस्ट करायला फोन केला होता सौ. गायतोंडेनी."

" चला, देव पावला. !" मेजर सानेंचा चेहरा आनंदाने उजळला.

त्या जगन्नियत्यानी आणखी एक वादळ फोफावण्यापूर्वीच शमवलं होतं.

——X——

a

४

# उशिरा का होईना...

कुलाब्याच्या ओरिओ क्लबच्या बार रूम मध्ये मेजर (रिटायर्ड) शाम उर्फ शाम काका बसले होते. हातातल्या ग्लास मधून घुटके घेता घेता आजूबाजूला बारीक निरीक्षण करीत होते. तेवढ्यात त्यांना नमस्कार करून पुढे जाणाऱ्या एका तरुण आय ए एस ऑफिसरला त्यांनी हटकले, “काय रे जोशी, तुझे डेप्युटी सेक्रेटरी साहेब हल्ली दिसत नाहीत? क्लबची मेंबरशिप सोडली की काय साहेबांनी ?”

“कोण, काळे साहेब ? काका, रिटायरमेंट नंतर काळे साहेब पार्ल्याला राहायला गेलेत. त्यामुळे क्वचित इकडे येतात. पण आज येणार आहेत असं त्यांचे मेहुणे देशपांडेसाहेब म्हणत होते.... हे आलेच पहा काळे साहेब.”

“या या काळे, तुम्ही नाही म्हणजे चुकल्या चुकल्या सारखं वाटतं.” शाम काका म्हणाले .

काळे आले. त्यांनी एक खुर्ची ओढली आणि शाम काकांच्या जवळ बसले. वेटरला बोलावून आपली ऑर्डर दिली आणि नंतर शाम काकांकडे वळून ते म्हणाले, “काय करायचं मेजर साहेब, पार्ल्याहून रोज रोज यायला जमत नाही आणि दुसरं म्हणजे घरी मिसेसला सोबत कोणीच नाही. मुलगाही बघा ना, दोन वर्षांपूर्वी युरोपला गेलाय तो परत यायचं नावच काढत नाही”.

“येईल. नक्की परत येईल. तुम्हाला मुकुंदराव प्रधानांची गोष्ट माहिती आहे का, त्यांचाही काहीसा तुमच्यासारखाच प्रकार होता, पण अखेरीस सगळं सुरळीत झालं. .......नाही माहिती का, बरं मी सांगतो ऐका”.

गोष्ट ऐकायला काळे फारसे उत्सुक नव्हते, पण आजूबाजूला उभ्या असलेल्या टोळक्यातल्या तिघा चौघांनी पटापट खुर्च्या ओढून त्या टेबलापाशीच बैठक मारली, आणि मग नाईलाजस्तव काळेना सुद्धा गोष्ट ऐकण्याशिवाय दूसरा पर्याय उरला नाही.

शाम काका सांगू लागले ,,,.

“....कांदिवलीच्या छोटेखानी बंगल्यांच्या सनशाईन सोसायटीमधे मुकुंदराव प्रधानांचा टुमदार बंगला होता. सगळे एकसारखे बंगले. खाली हॉल किचन डायनिंग आणि वर तीन बेडरूम. सुंदर रचना. समोर आणि मागे लहानसा बगीचा आणि गाडीसाठी गॅरेज.

मुकुंदराव प्रधानांना दोन अपत्ये. रितेश आणि मिताली. रितेश, संगणकाचा हार्ड वेअर इंजिनियर आणि मिताली, वकील.

मुकुंदरावांच्या सेवा निवृत्ती नंतर रिचर्डसन कंपनीच्या वसाहतीला राम राम करून प्रधान कुटुंब या बंगल्यात रहायला आलं. मुलांना पुढच्या जीवनातल्या सफलतेसाठी डोक्यावर एक भक्कम छप्पर.

पण वर्षाभरातच रितेशला त्याच्या कंपनीने स्वीडनला पाठवलं. दोन महिन्यांनी मिताली आंतर्राष्ट्रीय कायदा शिकायला ऑस्ट्रेलियाला गेली आणि मेलबोर्नच्या एका लॉ फर्म मधे ती व्यावसायिक उमेदवारी सुद्धा करायला लागली.

दोन वर्षं झाली. फोनवर दोघा मुलांचा संपर्क नियमित असायचा पण दोघं परत येण्याचं नाव काढत नव्हते. मुकुंदरावानी किंवा निर्मलाताईनी विषय काढलाच तर “बघु”, “बघु” असं मोघम उत्तर मिळायचं.

मुकुंदरावाना फार खंत वाटायची. निर्मलाताईना म्हणायचे, “घर म्हणजे कसं, तरुण मंडळीच्या लगबगीने, उत्साहाने गजबजून गेलं पाहिजे; त्यांच्या मुलांच्या आरडाओरड्याने हादरून गेलं पाहिजे. एवढा हौशीने बंगला घेतला आणि आता आपण दोघंच राहतोय भुतासारखे.”

मुकुंदरावाना आठवत होतं, स्वीडनला गेल्यावर आठवड्यातच रितेशचा फोन आला. मुकुंदरावानी विचारलं,”बरा आहेस नं रितेश? पुरेसे गरम कपडे आहेत नं? काम कसं चाललंय? कामावर जाण्यायेण्याची काय सोय आहे?”

स्पीकर फोन चालू होता.

निर्मला ताईनी म्हणजे रितेशच्या आईने चौकशी केली. “रितेशबाळ, बरा आहेस नं? खातोयस पितोयस नं नीट?”

“मी बरा आहे आई”. रितेश म्हणाला. “इथे स्टॉकहोमजवळच्या शहरामधे एका हॉटेलमधे आम्ही उतरलो आहोत. त्यामुळे रहाण्याजेवण्याची सोय उत्तम आहे. आणि बाबा, काम छान चाललंय. एरिकसनच्या, म्हणजे आमच्या इथल्या कंपनीच्या सिस्टिमचा अभ्यास करतोय आम्ही. जायला यायला गाडी आहे. आणि बाबा, थंडी भरपूर. इथे आल्या बरोबर कपड्यांचा अलाउन्स मिळाला, त्यानंतर सुपर मार्केट मधून गरम कपड्यांची खरेदी व्यवस्थित झाली आहे. तुम्ही काही काळजी करू नका.”

मुलाचं एकंदर सगळं व्यवस्थित चाललंय हे ऐकून आई बाबांनी निःश्वास सोडला.

एक आठवडा तसाच गेला. वेळेच्या साडेचार तासांच्या तफावतीमुळे आठवड्याभरात बोलणं झालं नाही. पुढच्या शनिवारी फोन आला.

रितेश सांगत होता, “बाबा ठीक चाललंय सगळं. सॉफ्टवेअरमधे इथे बरेच प्रॉब्लेम आहेत, म्हणून मी मुंबईहून सॉफ्टवेअर मधल्या तज्ञाला पाठवायला सांगितलंय. या आठवड्यात तो येईल असं म्हणतायत, आणि हो, आई,” रितेश पुढे म्हणाला, “उद्या आम्हाला आमचा हॉटेल मधला मुक्काम आवरून आपार्टमेंट ब्लॉकमधे शिफ्ट व्हायचंय. प्रत्येकाला एक स्टुडिओ आपार्टमेंट मिळणार आहे, त्यात प्रत्येकाचं छोटंसं किचन असणार. बघुया कसं काय जमतंय ते”. रितेशने फोन ठेवला.

निर्मलाताई आठवडाभर रितेशची काळजी करत होत्या. त्यांच्या मनात विचार येत होते. या मुलाला हाताने एकही गोष्ट करून खायचं माहीत नाही, एकट्याने रहायचं म्हणजे त्याची उपासमारच होईल स्टुडिओ आपार्टमेंट मधे राहून !

शनिवारी रितेशचा फोन आला. “आई, झालो आम्ही सगळे शिफ्ट”, रितेश सांगत होता. “आणि जेवणाखाण्याचा तसा जास्त प्राब्लेम नाही येणार. इथे समोरच सुपरमार्केट आहे. पहिल्याच दिवशी आम्ही सगळयांनी जाऊन ब्रेड, सॉसेजेस, बर्गर बन्स, मीट पॅटी वगैरे गोष्टी आणून आपापले फ्रिज भरून ठेवलेत. लागेल तसे काढायचे.”

“आणि काम कसं चाललंय?” मुकुंदरावानी विचारलं.

“काम ठीक आहे बाबा.” रितेश म्हणाला, “अजून या सॉफ्टवेअर प्रॉब्लेम्सचा थांग लागत नाही, त्यामुळे मलाही पुढे जाता येत नाही. पुढच्या आठवड्यात आमचा तज्ञ नक्की येणार आहे, असा मुंबईहून निरोप आलाय”.

फोन ठेवल्यावर मुकुंदराव निर्मलाताईंना म्हणाले, “जरा अपसेटच वाटला रितेश. कामाचं टेन्शन वाढलेलं दिसतंय”.

पुढचा शनिवार आला. प्रधान दांपत्य रितेशच्या फोनची दुपारपासून वाट पहात होते. शेवटी रात्री जरा उशीराच फोन आला.

“रितेश, उशीर झाला आज बराच फोनला. तब्येत बरी आहे नं” ? निर्मलाताईंनी काळजीने विचारले.

“आई माझी तब्येत ठीक आहे. सकाळ संध्याकाळ जेवायला खायला ऊठ सूट सॉसेजेस, बर्गर खाऊन कंटाळा आलाय अगदी. काल मुंबईहून आमच्या सॉफ्टवेअर एक्सपर्ट मीनाक्षी सीतारामन् आल्यात. आज सकाळी त्याना घेऊनच सुपरमार्केट मधे गेलो होतो. दाखवायला. आणि आई गंमत म्हणजे आम्ही घेतो ते पदार्थ न घेता वेगळेच पदार्थ घेतले त्यांनी. कांदे काय, बटाटे काय, राईस, विचारू नकोस. त्यांना गुड बाय केलं आणि मग मी आणि माझा सहकारी रमेश आज एकत्र जेवलो. मिडियम पिझा पेपरोनी शेअर केला. मग दुपारी झोपलो गाढ”.

“आणि कामाचं कसं चाललंय?” मुकुंदरावानी विचारलं.

“ते सॉफ्टवेअरमधेच अडकलं आहे नं बाबा”. रितेश म्हणाला. “उद्यापासून या मीनाक्षी सीतारामन् कामाला लागतील. त्यांच्यावर आहे बरचसं.”

इकडचं तिकडचं थोडं बोलणं झाल्यावर रितेशने फोन ठेवला.

आपल्या मुलाला चांगलं चुंगलं करून खायला घालता येत नाही म्हणून निर्मलाताईना चुटपुट लागली होती, तर मुलाला त्याच्या कामात कुठल्याही प्रकारची मदत करता येत नाही म्हणून मुकुंदराव हात चोळत बसले होते.

मुकुंदरावांची निराश मनःस्थिती त्यांच्या मित्रांना ब्रिज टेबलवरही जाणवली. दोनदा चांगला डाव हातात असताना क्लबमध्ये पत्ते खेळताना मुकुंदरावांनी अक्षम्य चुका केल्या.

आठवडा बेचैनीत गेला. मुकुंदरावानी दोन नवी गुलाबाची रोपटी आणून लावली. जास्वंदीची मशागत केली. निर्मलाताई मैत्रिणींबरोबर दोनदा मॉल मधे जाऊन आल्या. दोन पर्सेस उगीचच विकत घेतल्या. एकटेपणा, असहायपणा त्यांना खायला उठत होता.

शनिवार आला. दुपारीच रितेशचा फोन आला. “बाबा फार बिझी गेला आठवडा.” रितेश सांगत होता. “मीनाक्षी एकामागून एक सॉफ्टवेअरमधल्या चुका दुरुस्त करत गेली आणि बरेच प्रॉब्लेम सुटत गेले. संध्याकाळी खूप उशीरापर्यंत बसायला लागायचं. सॉसेज तळायला आणि बर्गर बनवायलाही वेळ मिळाला नाही. दोन दिवस तर मी पिझ्झाच मागवला आणि काल मीनाक्षी व्हेज बिर्याणी घेऊन आली. अगदी सरप्राइज ट्रीट झाली. मग आईस्क्रीम कार्यक्रम झाला. मजा आली.”

चला, मुलगा आनंदात आहे, हे ऐकून प्रधान दंपतीला बरं वाटलं. आनंदाचा तो डोस आठवडाभर टिकला.

शनिवार आला. रितेशचा फोन आलाच नाही. मग रविवारी रितेशचा फोन आला. “बराच गडबडीत गेला कालचा दिवस बाबा.” रितेशच्या सूर तर आनंदी होता. “बरंच वॉशिंग करायचं होतं आणि मग मीनाक्षीने इडली उत्तप्पा पार्टीला बोलावलं.”

“तुला कधीपासून इडली आवडायला लागली, आणि काय रे, इडलीचं पीठ कुठे मिळालं त्या मीनाक्षीला?” निर्मलाताईंनी अगदी मूलभूत प्रश्न विचारले”.

a

"अगं आई, ते सगळं मीनाक्षीचं काम. इथलं इंडियन दुकान शोधून काढलं आणि घेऊन आली रेडिमेड इडली आटा. आई इडल्याही अफलातून आणि सांबार त्याहून अफलातून. फारच मजा आली".

रितेशने मीनाक्षीवर उधळलेली स्तुतीसुमनांची बरसात निर्मलाताईंच्या मनात धोक्याची किणकिणती घंटा वाजवून गेली.

परत एक बेचैनीचा आठवडा. पण आश्चर्य म्हणजे मुकुंदराव अजिबात बेचैन नव्हते. निर्मलाताईंना दिसलेला धोक्याचा कंदील त्याना दिसलाच नव्हता. आठवडाभर ते गाफीलच राहिले. आयपीएल क्रिकेट मॅचेस मधे लक्ष गुंतल्यामुळे निर्मलाताईंचा नरम मूड त्यांच्या लक्षात आला नाही. त्यामुळे शनिवारी झालेल्या भुकंपाच्या धक्का त्याना जास्त जाणवला.

शनिवारी रितेशचा फोन आला. "बाबा, मीनाक्षी माझ्या बरोबर रहायला येतेय. आम्ही दोघंही स्टुडिओ आपार्टमेंट सोडून वन बेडरूम हॉल किचन आपार्टमेंटमधे शिफ्ट होतोय. सगळा घरखर्च दोघे वाटून घेणार आहोत , फिफ्टी फिफ्टी. आणि हो, बाबा या महिना अखेरीला आमचं दोघांचंही दोन वर्षांचं कॉन्ट्रॅक्ट संपतंय. पण इथल्या होस्ट कंपनीने म्हणजे एरिकसनने आम्हाला दोघांनाही जॉब ऑफर दिलीय. सुरुवातीला एक वर्षाचं कॉन्ट्रॅक्ट. उत्तम पगार. ते म्हणतायत की माझं आणि मीनाक्षीचं हार्डवेअर सॉफ्टवेअर कॉम्बिनेशन त्याना फार आवडलंय. तुम्हाला काय वाटतं बाबा, ही ऑफर घ्यावी का पदरात पाडून ?"

रितेश आपल्याला काहीतरी विचारतोय, आपलं मत मागतोय या कल्पनेने मुकुंदराव एक क्षणभर सुखावले, पण मग त्यांच्या लक्षात आलं की हे फक्त औपचारिक विचारणं होतं. त्या विचारण्याला फारसा अर्थ नव्हता. पण त्या अनुषंगाने

मुकुंदरावाना या एकतर्फी संभाषणात प्रवेश करायची संधी तरी मिळाली.

स्पीकर फोन ऑन होता. निर्मलाताई सगळं संभाषण ऐकतच होत्या, पण फोन खाली ठेवून त्यांच्याशी विचार विनिमय करणं मुकुंदरावाना शक्यच नव्हतं.

क्षणभर विचार करून वडिलधाऱ्या माणसाच्या भुमिकेतून जो प्रश्न विचारायला पाहिजे त्याला मुकुंदरावानी हात घातला.

“जॉब ऑफरचं वगैरे ठीक आहे रितेश, पण तू आणि मीनाक्षी बाईने एकत्र राहणे ही जरा गंभीर बाब आहे. “लिव्हिंग टुगेदर” ही सिरियस गोष्ट आहे. मग काय रजिस्टर लग्न करायचा विचार आहे का तुमचा?” मुकुंदरावानी विचारलं.

रितेशच्या लक्षात आलं कि संभाषण नाजुक रस्त्याला लागलंय. बाबांच्या बोलण्याचा रोख त्याच्या लक्षात आला. आई बाबांना दुखवण्याची तर त्याची अजिबात इच्छा नव्हती. तोलून मापून शब्द वापरत रितेश म्हणाला, “हो, हो . ते तर करायचं आहेच, पण बाबा इथले नियम आणि प्रथा जरा वेगळ्या आहेत. त्याप्रमाणे जायला हवं. हे शिफ्टिंग झाल्यावर करीन मी फोन तुम्हाला बाबा.”

विषय बदलत रितेश पुढे म्हणाला, “आणि हो बाबा, मितालीशी बोललात का तुम्ही? मेलबोर्नहून फोन आला होता तिचा. तिचा बॉयफ्रेंड होता नं, माईक, त्याच्याशी ब्रेक अप झालाय म्हणत होती. सुरवातीला वाईट मूडमधे होती पण नंतर शांत झाली. तिच्या सॉलिसिटर परिक्षेवर आता ती पूर्णपणे लक्ष केंद्रित करणार आहे म्हणाली.” रितेशने माहिती पुरवली.

संभाषण संपलं आणि मग फोन डिस्कनेक्ट झाला.

मुकुंदराव आणि निर्मलाताई बसून राहिले. निःस्तब्ध. दोघं आपापल्या विचारात.

a

रितेशप्रमाणे मितालीशीही आठवड्याच्या आठवड्याला फोन कॉल करण्याचा परिपाठ ठेवला होता. “मिताली, अगं मुलं बघायची का ? वय वाढत चाललंय तुझं” असं घाबरत घाबरत सुतोवाचही ते करत असत. पण मितालीने निक्षून संगितलं होतं, “आई, बाबा, हे आंतरराष्ट्रीय कायदे कानून समजून घ्यायचे म्हणजे डावीकडे उजवीकडे बघायलाही वेळ नसतो. मला सध्या कामावर लक्षं केन्द्रित करायच आहे.”

मितालीचं हे बॉय फ्रेंड वगैरे प्रकरण त्यांना माहीतच नव्हतं. दोघेही सुन्नपणे बसून राहिले. फोनवरून मुलांशी जास्त काही बोलण्यात अर्थ नव्हता. बोलायचा मूडही नव्हता.

काही दिवस गेले. रितेशने आपला निर्णय घेतला होता, मितालीही सावरली होती. दोन्ही मुलांना आईवडिलांच्या हस्तक्षेपाची किंवा मदतीची सध्या तरी जरूर नव्हती. विमनस्क मनःस्थितीत दिवस जात होते.

-------------- .

शनिवारी रितेश चा फोन आला. “बाबा जुनं कॉन्ट्रॅक्ट संपलं. सोमवारपासून एरिकसनशी डायरेक्ट कॉन्ट्रॅक्ट आमचं दोघांचंही.”

मुकुंदराव आणि निर्मला ताई बरोबरच म्हणाले, “आमच्या शुभेच्छा तुम्हाला दोघांनाही”.

जमुकुंदरावानी आणि निर्मला ताईनी चमकून एकमेकांकडे बघितलं. नकळतच दोघांनीही या नव्या घडामोडीचा नाईलाजाने का होईना, स्वीकार केला होता.

a

दिवस जात होते. रितेश आणि मीनाक्षी खूप काम करत होते. कामानिमित्ताने स्टॉकहोम, वेस्तरास, उपसाला, माल्मो अशा स्वीडन मधल्या लहान मोठ्या शहरात, गावात, सगळ्या स्वीडनभर फिरत होते. मधुन मधुन फोन यायचा. हलक्या फुलक्या गप्पा व्हायच्या.

मधेच एकदा रितेश म्हणाला, “बाबा स्विडिश नागरिकत्वासाठी ॲप्लाय करण्याचा विचार करतोय आम्ही.” मुकुंदरावाना यावर काय बोलावे ते सुचेना.

-------------

मेलबोर्नहून एक गुड न्यूज आली. मिताली तिची सॉलिसीटर परीक्षा चांगल्या ग्रेडने पास झाली आणि त्याच फर्ममधे तिला ज्यूनिअर लॉयरची जागा मिळाली.

फोनवर बोलताना लग्नाचा विषय निर्मलाताईनी काढला की ती त्याला शिताफीने बगल मात्र द्यायची.

मुकुंदराव आणि निर्मलाताई विचार करायचे, “रितेश आंणि मिताली, कधीकाळी, आपण लौकिक दृष्टीने म्हणतो तसे, खरेखुरे गृहस्थाश्रमी होतील का? या बंगल्यात जावई, सून, नातवंडे आपल्याला दिसतील का?” पण त्यांच्या आशेला पालवी फुटण्याची काहीच चिह्नं दिसत नव्हती.

--------------

एक वर्षं संपत आलं. रितेशचा फोन आला. “बाबा आम्ही बादनला शिफ्ट होतोय”.

"बादन स्वित्झरलंड?" मुकुंदरावानी विचारलं. "आणि ते स्विडिश नागरिकत्वाचं काय झालं"?

"त्याचं असं झालं बाबा, आमचं एरिकसनचं कॉन्ट्रॅक्ट संपतंय. स्वीडिश नागरिकत्व घेण्याचा विचार सोडून दिलाय आम्ही. स्वित्झरलंडला जाऊन फ्री लान्सिन्ग करायचा विचार आहे आमचा दोघांचा. बादनला रहाणं स्वस्त आहे. आणि तिथे राहून जिनिवा पासून झूरिकपर्यंत आम्हाला कामाची व्याप्ती ठेवता येईल. मीनाक्षी ने सगळं छान प्लॅनिंग केलंय." रितेश म्हणाला.

"ठीक आहे. विचारपूर्वक निर्णय घ्या." मुकुंदराव म्हणाले, "आणि रितेश, लग्न रजिस्टर करायचा काही विचार करा आता."

"बाबा माझी गर्लफ्रेंड म्हणतेय की काय घाई आहे?" रितेश म्हणाला.

रितेश आणि मीनाक्षीचे पुढचे काही आठवडे बरेच गडबडीत गेले असावेत. दोघंही स्वित्झरलंडला शिफ्ट झाले. ठरल्याप्रमाणे बादनला घर घेतलं. बिझिनेस कॉन्टॅक्ट्स तयार होतेच. काम जोरात सुरु झालं. फोनवर बोलणं व्हायचं खरं, पण अगदी त्रोटक. औपचारिकच म्हणा ना.

मुकुंदरावानी आणि निर्मला ताईनी आता नाईलाजाने का होईना, मीनाक्षीला सूनबाई म्हणून मानलं होतं पण एकंदर सेट अप असा विचित्र होता की हे नातं कुठल्याही प्रकारे पुढे झेप घेत नव्हतं.

फोनवर रितेशकडे त्याच्या तब्येतीची चौकशी करताना रीतीप्रमाणे निर्मलाताई अगदी आवर्जून मीनाक्षीच्या तब्येतीचीही चौकशी करायच्या. पण, "बरी आहे", "ठीक आहे" अशा उत्तरांवर त्यांची बोळवण व्हायची.

a

चार पाच आठवडे गेले. शनिवारी रितेश चा फोन आला. स्वित्झरलंडची थंडी, कामाचं प्रेशर वगैरेबद्दल बोलून झाल्यावर फोन ठेवायच्या आधी मुकुंदराव म्हणाले, ‘‘ठीक आहे रितेश, तब्येतीची काळजी घे; आणि मीनाक्षी कशी आहे, बरी आहे नं?’’

पलीकडे थोडी शांतता होती. नंतर रितेश म्हणाला, ’’बाबा मीनाक्षी आता नाही इथे’’.

मुकुंदराव धास्तावले. घाबरून त्यानी विचारलं, ‘‘काय झालं मीनाक्षीला?’’

‘‘घाबरण्यासारखं काही नाही बाबा, मीनाक्षी इथे बादनमधेच आहे, पण आता, ती माझी जी एफ म्हणजे गर्ल फ्रेंड नाही.’’

मुकुंदरावाना आणि निर्मला ताईना काहीच उमजेना.

‘‘सांगतो बाबा.’’ रितेश म्हणाला. ‘‘महिन्या दीड महिन्यापूर्वी इथे बादनलाच आमच्या सारखीच दुसरी एक जोडी आम्हाला भेटली, गोपालन आणि जयश्री. जयश्री सुळे. दोघंही इथेच बादनला मोठ्या कंपनी मधे कॉन्ट्रॅक्टवर आहेत. आमचं आणि त्यांचं चांगलं जुळलं. वीकेंड ला भेटायचो, बाहेर जायचो, मजा करायचो. मग आमच्या सगळयांच्याच हळूहळू लक्षात आलं की मी आणि जयश्री एकमेकाला अगदी फिट जुळतोय आणि तसंच, गोपालन आणि मीनाक्षी एकमेकाला जुळतायत. मग बाबा, आम्ही अदलाबदल केली. आता जयश्री माझी गर्ल फ्रेंड आहे आणि आम्ही बरोबर राहतो. मीनाक्षी आता गोपालन बरोबर राहतेय. पण बाबा, आमची मैत्री कायम आहे. आम्ही चांगले मित्र आहोत.’’

संभाषण संपलं. मुकुंदराव आणि निर्मलाताई एकमेकांकडे सुन्न होऊन पहात राहिले.

-----------

रविवार उजाडला. सकाळीच मितालीचा ऑस्ट्रेलियाहून व्हिडिओ कॉल आला.

“बाबा, हा माझा बॉय फ्रेंड संजीव कर्णिक”.

एक सुसंस्कृत दिसणारा पोऱ्या विडिओ स्क्रीनवर येऊन हॅलो करून गेला.

मिताली बोलत होती. “बाबा संजीव आमच्या फर्ममधे सिनियर लॉयर म्हणून नुकताच आलाय. आई वडील पुण्याला असतात याचे, पण मोठी बहिण इथे मेलबोर्नला असते, शीला दिघे. मागच्या वीकेंडला मी गेले होते, बाबा, शीला दीदी कडे, आणि काय सांगू बाबा, अगदी आपल्या घरी आल्यासारखं वाटलं.”

“छान बाळा, मजेत रहा.” निर्मला ताई म्हणाल्या. “काम बरं चाललंय नं तुझं?”

“हो आई. पण प्रमोशननंतर काम खूपच वाढलंय.” मिताली म्हणाली. “ठेवते फोन आता, संजीव बरोबर लंचला जायचंय बाहेर”.

फोन डिस्कनेक्ट तर झाला, पण त्या संवादातून ओझरलेल्या सुखद लहरींवर मुकुंदराव आणि निर्मलाताई कितीतरी वेळ तरंगत राहिले आणि आदल्या दिवशी रितेशशी बोलल्यानंतर त्यांच्या मनाला लागलेली हुरहुरही कुठच्या कुठे पळून गेली.

--------------

दोन आठवडे गेले. वीकेंड आला. रितेशचा फोन आला.

“बाळा कसा आहेस? खातो पितोयस की नाही व्यवस्थित?” निर्मला ताईनी विचारलं.

“अगं आई,” रितेश म्हणाला, “खातो पितोयस म्हणजे काय, चंगळ आहे नुसती. अगं काल जयश्रीनी फ्राइड फिश केलं. घमघमाट. आणि चव अगदी तुझ्या

हातच्या तळलेल्या सुरमई सारखी. आणि बरंका आई, जयश्री मटण करी एवढी सुंदर करते, अगदी आलं लसणाची पेस्ट लाऊन, की मुंबईला आपल्या डायनिंग रूम मध्ये बसल्यासारखं वाटतं.”

रितेशच्या आनंदाचा, मजेत बोलण्याचा संसर्ग मुकुंदरावाना आणि निर्मला ताईनाही लागला. गप्पा खूपच रंगल्या आणि मग जयश्री या संभाषणात कधी सामील झाली तेही मुकुंदरावाना आणि निर्मलाताईना कळलं नाही.

अर्ध्या तासानंतर संभाषण संपलं. फोन डिस्कनेक्ट झाला. निर्मला ताईनी देव्हाऱ्यापाशी जाऊन गणपती बाप्पाला हात जोडले.

------------

असेच दोन आठवडे गेले ऑस्ट्रेलियाहून मितालीचा फोन आला.

“आई, आमच्या फर्मची मुंबईला ब्रँच काढणार आहेत इन्टरनॅशल कॉरपोरेट केसेस साठी. संजीवला ब्रँच हेडच्या पोस्ट साठी ऑफर दिली आहे. मोठी पोस्ट आहे बाबा, चाळीस कॉरपोरेट लॉयरस् असतील हाताखाली. नेपियन सी रोडला फ्लॅट देणार आहेत. ऑफर ॲक्सेप्ट करायचं मनात आहे संजीवच्या. बघु काय ठरतंय ते. आणि ॲक्सेप्ट केली तर पुढच्या चार महिन्यात तिकडे यावं लागेल.

आणि आई, काल शीला दीदी म्हणत होत्या की संजीवच्या आईबाबांना तुम्हाला भेटायचंय म्हणून. पुण्याहून फोन करतील ते तुम्हाला”.

मुकुंदरावानी फोन खाली ठेवला आणि निर्मलाताईना विचारलं, “फोन आला त्या कर्णिकांचा तर केव्हा बोलवायचं त्याना?”

“अहो त्यांना कसले बोलावताय? उद्याच्या उद्या गाडी काढून पुण्याला जायचंय आपल्याला.”

मुकुंदरावानी मान डोलावली.

मुकुंदराव आणि निर्मलाताई पुण्याला गेले, आणि परत आले ते ठरवूनच, की पुढच्या महिन्यात सगळ्यांनी ऑस्ट्रेलिआला जायचं आणि मुलांच्या एन्गेजमेंटचा सोहळा तिथे करायचा. नंतर लग्न पुण्यात.

---

पुढच्या वीकेंडला रितेशचा फोन आला.

“बाबा, मी आणि जयश्री काल झुरिकला रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये नोटिस देऊन आलो. आता एक महिन्यानी रजिस्टर्ड लग्न करायचंय. तुम्हाला आणि जयश्रीच्या आईबाबांना झुरिकला यायला पाहिजे.”

“ही तर फारच चांगली बातमी दिलीस रितेश. पण पुढच्या महिन्यात ऑस्ट्रेलियाला जायचंय नं आम्हाला, मितालीच्या एन्गेंजमेंटला.” मुकुंदराव म्हणाले.

रितेश म्हणाला, “अहो बाबा, आधी इथे या, मग आपण सगळेच ऑस्ट्रेलियाला जाऊ. आमचा हनिमून गोल्ड कोस्टला.” रितेश पुढे म्हणाला, “आज रात्री जयश्रीच्या बाबांचा फोन येईल तुम्हाला, बाबा. वसईला राहतात ते. फॅक्टरी आहे तिथे त्यांची, डिफेन्स प्रॉडक्टची.”

संध्याकाळी वसईहून सुळेंचा फोन आला. छान गप्पा झाल्या. लांबची नातीही निघाली.

फोन ठेवता ठेवता सुळे म्हणाले, “माझ्या वसईच्या फॅक्टरी च्या पूर्ण नूतनीकरणाचं, ऑटोमेशनचं आणि नंतर ती नीटपणे चालवायचं काम मी

जावईबापूना देऊ केलंय, सांगितलं असेलच त्यानी तुम्हाला. जयश्रीला म्हटलं, हीच कामं तुम्ही बाहेरच्या कंपन्यांसाठी करता, आता घरच्यासाठी करा. आवडली आहे दोघांना कल्पना.''

रात्री मुकुंदराव लीलाताईना म्हणाले, ''वरच्या सगळ्या बेडरूमचं फर्नीशिंग वगैरे अपटुडेट करायला पाहिजे. चार सहा महिन्यात गजबजून जाणार आहे घर.

....शाम काकांची गोष्ट संपली. ग्लास उचलून त्यानी तो एका घोटात रिकामा केला. मग काळेंकडे एकदा हसून पाहिलं आणि किंचितशी मान डोलावली. काळेंनीही हसून प्रत्युत्तर दिलं, मान डोलावली. ''बाय'' केलं आणि हलकीशी शीळ वाजवत ते तिथून निघून गेले.

-------X-------

a

# ५

# सम्मेलन

संध्याकाळची सुमारे सातची वेळ. कुलाब्याच्या ओरिओ क्लब मध्ये मेजर (रिटायर्ड) शाम , उर्फ अंकल शाम उर्फ शाम काका बार रूम मधल्या त्यांच्या नेहमीच्या टेबलावर बसले होते. कबाबचा तुकडा तोंडात होता आणि चावून झाल्यावर ड्रिंकच्या घोटाने त्याला रिचवायचा विचार चालू होता. बारीक नजरेने बार रूम मधल्या व्यक्तींचं निरीक्षणही चालू होतं.

“जोगळेकर, अहो प्रोफेसर,” शाम काकांनी मोबाइल कानाला लावून उभ्या असलेल्या एका व्यक्तीला हाक मारली.

प्रोफेसर जोगळेकरांनी मोबाईलवर दोन चार शब्द बोलून पलीकडच्या माणसाची बोळवण केली, मोबाइल खिशात टाकला आणि शाम काकांच्या जवळ आले. “काय म्हणताय काका ?” प्रोफेसर जोगळेकरांनी विचारलं.

“गेले दोन चार दिवस पाहतोय, सारखे मोबाइल वरच बोलत असता. काय, गडबड काय आहे ?” शाम काकांनी सरळच प्रश्न केला.

“सांगतो काका”. प्रोफेसर जोगळेकर एक खुर्ची ओढून बसले आणि म्हणाले, “अमरावतीच्या शाळेतल्या आमच्या त्या वेळच्या दहावीच्या वर्गातल्या वर्ग बंधू भगिनींचं सम्मेलन करायचं ठरवलंय आम्ही. मी कार्याध्यक्ष आहे समितीचा. त्यासाठी चालली आहे फोना फोनी आणि धावपळ”.

“अरे वा, चांगली गोष्ट आहे. काय वयोमान आहे तुमच्या वर्ग बंधू भगिनींचं? आणि राहायला कुठे असतात सगळे ?” शाम काकानी विचारले.

a

"अहो काका, मीच बघा ना, दहा बारा वर्षापूर्वी रिटायर झालो, माझ्याच वयाचे म्हणजे सत्तरीच्या आसपासचे आहेत सगळे. आणि राहायला म्हटलं तर विखुरलेले आहेत, अमरावती, मुंबई, पुणे, असे ठीक ठिकाणी". प्रोफेसरांनी अगदी सविस्तर उत्तर दिले.

"अहो जोगळेकर, ही तर हुबेहूब आमच्या संजयच्या गोष्टीचीच पुंनरावृत्ती दिसते", शाम काका म्हणाले. "कोण संजय आणि काय त्यांचा संबंध इथे? जरा स्पष्ट सांगाल का काका". प्रोफेसर जोगळेकर जरा चीड चिडया सुरातच म्हणाले.

"सांगतो". शाम काका म्हणाले. "पाहिजे तर तुमचं ड्रिंक मागवा. इंटरेस्टिंग गोष्ट आहे, ओघानच आलंय म्हणून."

प्रोफेसर साहेबांनी वेटरला बोलावून स्वत:साठी ड्रिंक मागवलं आणि कर्तव्य बुध्दीने शाम काकांचाही ग्लास भरून आणण्याची सूचना दिली. ड्रिंक्स आल्यावर शाम काकांनी एक मोठा घोट घेतला आणि ते बोलू लागले.

....."जोगळेकर, ही मुख्यत्वे एका चौकडीची गोष्ट आहे. संजय, अशोक, शिरीष आणि रवी, सर्वजण तुमच्यासारखेच आता सत्तरीच्या घरातले आणि शाळेपासूनचे एकमेकांचे मित्र.

एका संध्याकाळची सात- साडेसातच्या सुमाराची गोष्ट. बाहेर अंधारलं होतं. कांदिवलीच्या त्रिभुवन रेस्टॉरंट ॲन्ड बार मधे मंद उजेडात ही चौकडी बसली होती. चौकडीचं ॲव्हरेज वय बहात्तर वर्षे. चौघाजणात एक क्वार्टर रिचवून झाला होता. दुसरा ऑर्डर केला होता.

दर महिन्या दोन महिन्यांतून एकदा भेटायचं, गप्पा टप्पा मारायच्या, जमतील तेवढे क्वार्टर रिचवायचे, शेंगदाणे, कबाब, बिर्याणी जे काही खावंस वाटेल ते ऑर्डर करायचं, शेवटी दोन बाय चार कुल्फी मागवायची, मग जे काही एकूण बिल येईल त्याला चारने भागून शेअर करायचं आणि मग बाय बाय करून आपापल्या घरी

a

रवाना व्हायचं असा टिपिकल सुखवस्तू रिटायर्ड मुंबईकर कार्यक्रम गेली चार पाच वर्षं चालू होता.

आजही सर्वांचा रिलॅक्स्ड मूड होता. राजकीय विषयांवर, सामाजिक विषयांवर अशा निरुपद्रवी गप्पा चालू होत्या.

“या वर्षीचं वार्षिक सम्मेलन कोण होस्ट करतंय?” दोन शेंगदाणे तोंडात टाकत संजय ने विषय काढला.

“यावर्षी अजून पर्यंत कोणाकडून प्रपोजल आलेलं ऐकिवात तरी नाही”. सुरेश म्हणाला.

“गेल्या वर्षी कोल्हापूर ग्रुपनी किती छान कार्यक्रम अॅरेंज केला होता”. शिरीष म्हणाला.

“हो ना. पन्हाळयाच्या विसावा रिसॉर्ट मधली राहण्याची सोय, आणि नंतर उसाच्या गुऱ्हाळाला भेट. सर्वच कार्यक्रम सुंदर झाला होता. गोड गोड रस आणि गरम गरम गुळ. पन्नास जण आले होते सम्मेलनाला. रात्री किती उशीरापर्यंत बसलो होतो गप्पा मारत !” रवीने आठवण काढली.

“आणि त्याच्या मागच्या वर्षी सोलापूरच्या मंडळींनी अॅरेंज केलेला हुरडा पार्टी आणि सम्मेलनाचा कार्यक्रम.” अशोकला आठवलं. “त्यावेळी तर साठ जण आले होते.”

पुण्याच्या लोकमान्य विद्यालयातून एकोणीसशे चौसष्ठ साली एसेस्सी पास झालेले हे विद्यार्थी, आज पन्नास-पंचावन्न वर्षांनंतरही एका अदृष्य साखळीने गुंफुन राहिले होते. गावोगावी विखुरले असले तरी सोशल मिडियाच्या सर्व आधुनिक माध्यमांचा तरबेजपणे उपयोग करत होते, संपर्कात रहात होते, आपापल्या मुलांच्या, नातवंडांच्या जीवनातल्या गोड बातम्या एकमेकांना आनंदाने सांगत होते, लागेल

तेव्हा अडी अडचणीना धावून जात होते. जमेल तसं मासिक सम्मेलनं, वार्षिक सम्मेलनं भरवत होते.

पुणे, सोलापूर, कोल्हापूर ग्रुपना स्थानिक मासिक सम्मेलनं भरवणं सहज शक्य असायचं, आणि त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या वर्गबंधू-भगिनींचे स्नेहबंध अगदी पुढच्या पिढ्यांपर्यंतही पसरले होते.

मुंबई ग्रुपच्या मंडळींना वयोमानानुसार लोकलचा, रिक्षा-बसचा प्रवास अवघड पडायला लागला होता आणि त्यामुळे कांदिवलीला भेटणाऱ्या संजय, सुरेश, अशोक आणि रवी या चौकडीप्रमाणे नियमितपणे भेटणारे ग्रुप कमीच होते, पण एकमेकांशी फोनसंपर्क मात्र सगळे नियमितपणे साधायचे.

---

भरलेला क्वार्टरचा चंबू आणि खाद्यपदार्थ घेऊन वेटर आला. थोडा वेळ चौघेहीजण खाद्यांचा आणि पेयाचा समाचार घेण्यात गुंतले. विचार करायला आणि बोलायला फुरसतच नव्हती.

अशी पाच दहा मिनिटे गेली. मग शिरीषने ग्लास खाली ठेवला, काटा चमचा बशीत ठेवले आणि नॅपकिनला तोंड पुसत म्हणाला, “अरे यार, यावर्षी आपण मुंबई ग्रुपने का सम्मेलन होस्ट करू नये ?”

“कल्पना छान आहे. जरूर करूया.” सुरेशने री ओढली.

“पण कुठे करायचं ? मुंबईच्या आपल्या सगळया लोकांना सोईस्कर पडणारी जागा पाहिजे आणि बाहेरची लोकंही सहजपणे येऊ जाऊ शकली पाहिजेत. स्वस्तही हवी”. संजयचा काळजीयुक्त सूर.

“हं”, सुरेशची कल्पना, “देवनारच्या एखाद्या हॉटेलमधे केलं तर? बाहेरगावचे लोक सकाळी येतील, संध्याकाळी निघून जातील. सगळं बाहेरच्या बाहेर.”

a

“अवघड पडेल”. शिरीषचं वक्तव्य. “आणि बाहेरचे ग्रुप एवढ्या लांबून आल्यावर ओव्हरनाईट राहिल्याशिवाय मजा नाही. मला काय वाटतं, मुंबईत काही हे होणार नाही. त्यापेक्षा आपण कर्जत, खालापूर, लोणावळा यापैकी कुठेतरी स्वस्तात पण उत्तम सोय असलेलं रिसॉर्ट बघू. ठिकठिकाणाहून आपले वर्गमित्र-मैत्रिणी येतील. रिसॉर्ट मधे सकाळी नऊ साडे नऊ पर्यंत भेटतील, सगळेजण एकत्र ब्रेकफास्ट घेऊ. मग सगळे आपापल्या रूम्स् मधे जातील, फ्रेश होतील. मग रिसॉर्ट च्या हिरवळीवर किंवा कॉन्फरन्स रूममध्ये भेटूया, छोटे छोटे गेम्स, गप्पा, गाणी यात लंचपर्यंत वेळ जाईल. नंतर भक्कम जेवण, थोडी विश्रांती आणि मग चहानंतर जवळ कुठे तरी फिरायला, पाय मोकळे करायला जाऊ, रात्रीच्या जेवणापूर्वी एकत्र बसू, स्टार्टर्स वगैरे मागवू. दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट घेऊन चेक आऊट. कसा वाटतोय कार्यक्रम? “

“हे तर फारच उत्तम “. अशोकने आपल्या परीने शिक्कामोर्तब केलं. “पण किती जण येतीलसं वाटतंय ?”

शिरीष जरा विचार करून म्हणाला, “असं बघ, कोल्हापूरच्या सम्मेलनाला पन्नास जण होते. इथे आपण मुंबईचेच दहा कपल्स आणि पाचएक जण एकटे आले तरी पंचवीस होतात. पुण्याचे वीस धरूया आणि सोलापूर, कोल्हापूर इकडचे तिकडचे दहाबारा. पन्नास तरी जमायला हरकत नाही.”

“बरोबर आहे,” अशोक म्हणाला, “एवढा चांगला बेत आखल्यावर धावून धावून लोक येतीलच.”

रवी गप्पच होता.

“संजय, माझ्या माहितीत एक कर्जतला छान रिसॉर्ट आहे. अ‍ॅग्रो रिसॉर्ट म्हणे. तिथे आहे पन्नास एक माणसांची रहायची सोय.” शिरीष म्हणाला. “कोणाला विचारून पाहता येईल का तुला? बेस्ट म्हणजे तिथे अ‍ॅक्चुअली जाऊन बघावं. गाडी आहे नं तुझी. मी ड्रायव्हर बोलावतो, पाहिजेतर. दुसरीही रिसॉर्टस् पहा”.

मंडळी शांत होती. रेस्टॉरंट मधे कोलाहल वाढला होता. मंडळींच्या मनातही विचार चक्रं चालू झाली होती. आधीच उत्तेजित मनःस्थिती सम्मेलन होस्ट करण्याच्या विचाराने जास्तच उत्तेजित झाली होती.

“अशोक, व्हाट्स्अप वर एक नोटिस टाकून दे आणि रवी, बाहेरगावच्या लोकांना फोनवरून कळवून टाक”. शिरीष म्हणाला. “आणि हो, तारीख कोणती? मधलेच वार पकडुया, रिसॉर्ट पण स्वस्तात मिळेल. मार्चच्या शेवटच्या आठवड्यातले मंगळवार बुधवार धरूया, म्हणजे तीस - एकतीस मार्च येईल. कळवून टाका सगळ्यांना म्हणजे कोणाला काय ट्रेन वगैरे रिझर्व्हेशन करायचं असेल तर होऊन जाईल. रवी, फोन करून टाक सगळ्यांना.”

रवी, अशोक आणि संजयनी मान हलवून आपली कबुली दाखवली आणि आपापल्या ग्लासकडे परत लक्षं केंद्रित केले.

सम्मेलनावर पुढे काही उहापोह झाला नाही. इतर गप्पा सुरू झाल्या. ग्लास रिकामे झाले. काटे चमचे रिकाम्या बशांमधे ठेवले गेले. चौकडीचा मासिक भेटीचा कार्यक्रम संपला. बिल चुकतं केलं गेलं. एकमेकांचा निरोप घेऊन मंडळी घरोघर गेली आणि घरी पोहोचण्याच्याही अगोदर सम्मेलनाचा विषय पूर्ण विसरून गेली.

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवताना शिरीषला एकदमच आदल्या दिवशीच्या संभाषणाची आठवण झाली. लगेच त्याने फोन उचलून संजयशी, अशोकशी आणि रवीशी संपर्क साधला आणि सम्मेलनाची आणि त्यासंबंधात प्रत्येकावर सोपवलेल्या कामगिरीची आठवण करून दिली.

सगळे कामाला लागले.

संजयने नेटवर्क चाळले. वेबसाईट बघितल्या. लांबून येणाऱ्यांच्या प्रवासाचा विचार केला. आणि शेवटी त्याला लोणावळा हे सम्मेलन करण्यासाठी सर्व दृष्टीनी योग्य ठिकाण वाटलं.

सुंदर, स्वच्छ मोकळी हवा, यायला जायला रेल्वे आहे, एक्सप्रेस रस्ताही आहे. हॉटेलं, रिसॉर्ट बरेच असल्यामुळे रहायची जेवणाची चांगली सोय आहे.

आपल्या ग्रुप मधल्या इतरांचं मत आजमावं म्हणून संजयने अशोकला फोन केला. अशोकचे विचारही त्याच दिशेने चालले होते. लोणावळ्याबद्दल सगळ्यांचंच एकमत झालं.

संजयने मग एका ओळखीच्या एजंटकडून लोणावळ्याच्या दोन तीन रिसॉर्टकडून त्यांचे रेट मागवले आणि शेवटी शांतीभुवन पक्कं केलं.

शिरीषचा फोन आला.

“काय संजय, कुठपर्यंत आलंय?” शिरीषने विचारलं.

“शिरीष, शांतीभुवन ठीक दिसतंय. पण आपले लोक किती असतील? रूम्स् किती बुक करायच्या? ॲडव्हान्सही द्यावा लागेल.” संजयने सांगितले.

“असं बघ संजय, आपला पन्नास एक लोकांचा अंदाज आहेच. त्याअंदाजाने पंचवीस डबल रूम रिझर्व्ह कराव्या”. शिरीषने सल्ला दिला.

संजयने परत हॉटेल मॅनेजरशी बोलणं केलं रूम रेट, पूर्ण पॅकेज चा रेट वगैरे सगळं सगळं नीट विचारून घेतलं आणि परत शिरीषला फोन लावला.

“अरे शिरीष, सोलापूर कोल्हापूर पेक्षा लोणावळ्याचे रेट जरा जास्त वाटतायत. सगळेजण पटवून घेतील नं? मला दुसरी एक कल्पना सुचली आहे. हॉटेलमधे ट्रिपल ऑक्युपन्सी आणि चार ऑक्युपन्सीच्यापण रूम्स् आहेत. मॅनेजर म्हणतोय की त्या स्वस्त पडतील. त्या बुक करायच्या का ?” संजय म्हणाला.

“अरे त्या भानगडीत पडू नकोस बाबा,” शिरीष म्हणाला. परवा सोमनाथ म्हणत होता की ऑपरेशन नंतरही त्याला रात्रीत चार वेळा बाथरूमला जायला लागतं. बाकीच्यांची परिस्थिती काही फारशी वेगळी नसणार. अशी तीन चार माणसं एका खोलीत राहिली तर रात्रभर बाथरूम समोर लाइनच लागेल.”

“ठीक आहे, मग डबल ऑक्युपन्सीच्या वर काही जात नाही. पण शिरीष, ॲडव्हान्सचं काय? पाच हजाराचा रेट आहे त्या खोल्यांचा. वीस टक्के ॲडव्हान्स मागतायत”. संजयचा प्रश्न.

“वीस टक्के का ? म्हणजे सुमारे पंधरा हजार. असं कर, तूर्त तूच भरून टाक. नंतर सगळं वसुल करू आपण. नाही तरी होस्ट ग्रुप ला अप फ्रंट खिशातून काही पैसे काढावेच लागणार आहेत. तुला काही अडचण नाही ना ? हिशोब मात्र ठेव बरोबर.” शिरीषचा सोपा उपाय.

“पंधरा हजारासाठी मला कसली अडचण ? डोन्ट वरी”. संजयने आश्वासन दिले आणि त्याप्रमाणे रिसॉर्टला ॲडव्हान्स रक्कम भरून पंचवीस डबल रूम तीस-एकतीस मार्च साठी बुक करून टाकल्या.

थोड्या वेळाने शिरीषचा परत फोन आला, “अरे संजय, लॉनवर खूप ऊन लागेल नाही? जरा छान कम्फर्टेबल जागा पाहिजे आरामात गप्पा मारायला”.

या विषयावर थोडी चर्चा झाली आणि मग शिरीष च्या सांगण्यावरून संजयने आणखी पाच हजार रुपये भरून रिसॉर्टची कॉन्फरन्स रूमही एका दिवसासाठी बुक करुन टाकली.

रिसॉर्ट बुकिंग तर असं पूर्ण झालं.

शिरीषने रवीला फोन लावला.

“रवी, आपल्या बाहेर गावच्या मित्रमंडळीना फोन झाले का ?” शिरीष ने विचारले.

“केले मी सगळ्यांना फोन. सोलापूरची सहा कपल्स तयार आहेत. त्या सगळ्यांना तळमजल्यावरच्या खोल्याच हव्यात. जिना चढायला नको म्हणतायत. कोल्हापूरहून दोघांचा होकार आलाय. पुण्याचे लोक विचार करतो म्हणतायत. आपल्या मुंबईच्या वर्गमित्र मैत्रिणीनाही फोन करून आणि व्हाट्सअपवर कळवलंय. नक्की होकार अजून कुणाचाच नाही. अशी सध्या तरी परिस्थिती आहे.” रवीने अहवाल दिला आणि पुढे म्हणाला, “आणि हो, शिरीष, मला जरा दहा दिवसांसाठी मेहेसाण्याला जाणं भाग आहे. माझ्या मेहुणीकडे कार्य आहे. मिसेसला जावं लागतंय बहिणीच्या मदतीला आणि तिच्या बरोबर मलाही जाणं भाग आहे. तेव्हा पुढचा फॉलो अप मी तिकडून आल्यावरच करीन.”

शिरीष जरा हताशच झाला, कारण वर्गबंधू- भगिनींमधे रवीच एक मोठा दुवा होता, सर्वांशी संबंध ठेवून होता आणि साहजिकच सगळेच त्याला मानत होते. आता रवी नाही म्हणजे फॉलो अप कॅम्पेनला मोठीच खीळ बसणार हे शिरीषने जाणले.

ठाण्याहून काटकरचा फोन आला. “अरे शिरीष, मुंबई ग्रुप कडून सर्वांना काहीतरी भेटवस्तू द्यावी लागणार. काय खर्च होईल तो वाटून घेऊ आपण. मी तयार आहे ताबडतोब कॉन्ट्रिब्यूट करायला. पैसे कसे आणि कोणाला पाठवायचे ते सांग म्हणजे झालं”.

“बरोबर आहे तुझं. काहीतरी भेटवस्तू द्यायला पाहिजे, यजमान ग्रुप कडून,” शिरीष म्हणाला, “तूर्त आम्ही घालतो पैसे. कसं शेअर करायचं ते बघुया नंतर”.

शिरीष ला आठवलं की गोरेगावला एक आठवणवस्तू आणि भेटवस्तू बनवायचं छोटं वर्कशॉप आहे. संजयच्या घरापासून फार लांब नसणार ते. दोघांनी फोनवरून चर्चा केली.

संजय एकदोनदा त्या वर्कशॉप मधे जाऊन आला. रेडी ऑन-गोईंग प्रॉडक्टस् मधून दोन सिलेक्ट केले. थोडे अ‍ॅडव्हान्स पैसेही दिले.

संजय ने शिरीष ला फोन केला. "अरे शिरीष हे भेटवस्तू वगैरे सर्व व्यवस्थित झालंय पण आपल्या जाण्या येण्याची काय सोय ? आपापल्या गाड्या काढण्यात काही मजा नाही. एखादी बस करून गाणी बिणी गात मजेत जायला पाहिजे. सम्मेलन इथपासूनच सुरु करायचं"

"कल्पना फारच छान संजय", शिरीष म्हणाला. "बघ एखादी वीस सीटर ट्रॅव्हलर मिळते का".

संजयला वीस सीटर एअरकंडीशन्ड ट्रॅव्हलर मिळाली. पाच हजार रुपये अ‍ॅडव्हान्सही दिले.

शिरीषने अशोकला फोन केला. "अरे अशोक," शिरीष म्हणाला. आपल्या वर्गमैत्रिणींकडून काही कळलं का ? किती जणींचे होकार आलेत ?"

"माझ्याकडे मंदा देशपांडे चा फोन नंबर आहे. तिला सांगितलं होतं मी, मुंबईच्या ग्रुप शी संपर्क साधायला. काल परत फोन केला होता मी. सगळ्याजणी विचार करतायत असं म्हणाली ती." अशोक ने माहिती पुरवली.

"आणि पुण्याच्या वर्गमैत्रिणींकडून काही कळलं का ?" शिरीषचा पुढचा प्रश्न.

"पुण्याहून तारा, स्नेहा, मालू, सुलोचना यांचा होकार आलाय, ही कपल्स; आणि रजनी, विशाखा, नम्रता या एकेकट्या आहेत, त्याही तयार आहेत". अशोकचं उत्तर.

"अरे वा, चांगली प्रगती आहे. या सगळ्या होकारांमुळे पन्नासच्या वरही संख्या जाऊ शकेल. मग आपल्याला नोंदणी बंद करावी लागेल. आणि हो, अशोक, मीना जोगला विचारलंस नं". शिरीषचा पुढचा प्रश्न.

"तिचाच जरा प्रॉब्लेम आहे." अशोक म्हणाला "ती म्हणाली की तिला यायचं आहे पण तिच्या नातीच्या डिलिव्हरीची तारीख त्याच्या सुमारास आहे. त्यामुळे तिला बहुतेक यायला जमणार नाही."

"कपाळ माझं, सगळंच मुसळ केरात, अशोकराव." शिरीष जवळ जवळ ओरडलाच. "अरे मीना जोग तर या सगळया वर्गमैत्रिणींचा केंद्र बिंदू आहे. ती येत नाही असं कळलं तर कोणीही वर्गमैत्रिणी होकार देणार नाहीत. मोठी पंचाईतच आहे".

शिरीषची भविष्यवाणी खरी ठरली. दोनच दिवसात पुण्याच्या, मुंबईच्या, सोलापूर- कोल्हापुरच्या सगळया मैत्रिणीनी खेद व्यक्त करून नकार कळवला.

ठाण्याहुन काटकरने आणि मुलुंडहुन साठेने शिरीषला फोन केले. जर आयत्या वेळी होकाराचा नकार झाला, समजा, काही अपरिहार्य कारणांमुळे, तर चालेल नं, याबद्दल चाचपणी होती.

गाडी अगदीच घसरगुंडीला लागली होती. शिरीष रवी येण्याची वाट पहात होता. पण रवी मेहेसाण्याजवळच्या ज्या कुठल्या गावात जाऊन बसला होता तिथे त्याला फोनही लागत नव्हता. एकदा तुटक तुटक संभाषणातून शिरीषला एवढंच कळलं की परतण्याची तारीख आणखी दहा दिवसांनी लांबली आहे.

शिरीषने अशोकला फोन लावला. "अशोक, अरे सगळी गोळाबेरीज झाल्यावर आता सम्मेलनाला येणाऱ्यांची संख्या काय आहे ?"

"शिरीष, मुंबईतले आपण चार कपल्स आणि दोन एकेकटे असे दहा जण, सोलापूरचे सहा जण आणि पुण्याचे दोघं, असे अठराजण आहोत. त्यातल्या पुणेकरांचं अजुन डळमळीतच आहे." अशोकने माहिती दिली.

"अशोक, आपलं बुकिंग पन्नास जणांचं आहे. अठरा काय, सोळा काय, अरे कसं चालेल?" शिरीषने प्रश्न उभा केला.

दोघांकडेही उत्तर नव्हतं.

"ठीक आहे, काहीतरी ॲडजस्ट करू आणि अठराजणं तर अठराजणं. करुया धमाल". शिरीष धीरोदात्तपणे म्हणाला.

चार दिवसांनी सोलापूर ग्रुप चा फोन आला. "सॉरी, आम्ही नाही येऊन शकत. व्हेरी व्हेरी सॉरी".

शिरीष, अशोक, संजय अगदीच हिरमुसले झाले. रवीचा तर पत्ताच नव्हता आणि बाकी मुंबई ग्रुप कडून काहीच रिस्पॉन्स येत नव्हता. जणू कोणी त्या गावचंच नव्हतं.

शिरीषला समजेना, काही उत्तरच मिळालं नाही, वर्गणी बद्दल कोणी चकार शब्द उच्चारला नाही, कामं करायला कोणी पुढाकार घेतला नाही तर कुठल्या भंरवशावर पुढे जायचं !

शिरीषने संजयला फोन केला. "संजय, हे सम्मेलन आता कॅन्सल झाल्यात जमा आहे. काय झालं काय गड्या, इतर ठिकाणांच्या सम्मेलनाला तर धावून धावून जमले होते, मग आपलं मुंबईचं सम्मेलन कसं उड्डाण घ्यायच्या आधीच खाली आपटलं? बरं. आता झालं ते झालं. फारसे पैसे नाही न अडकवलेस ! दिलेला ॲडव्हान्स परत मिळवायला जरा त्रास पडतो कधी कधी, पण शेवटी मिळतो परत."

संजयला अगदी विचारावंसं वाटलं, हे "शेवटी" किती दिवसांनी येतं? पण तो गप्प बसला.

संजयने फोन बंद केला आणि या सम्मेलनरूपी वादळात मान कितपत अडकली आहे याचा आढावा घ्यायला सुरुवात केली.

हॉटेलला पंचवीस डबल रुम साठी दिलेले ॲडव्हान्स पैसे, कॉन्फरन्स रूमचं बुकिंग, बसवाल्याला, भेटवस्तू वर्कशॉप वाल्याला दिलेले ॲडव्हान्स पैसे, सगळेच परत मिळवायला जोरदार पाठपुरावा करायला पाहिजे होता. कशी सुरुवात करावी,

काय पवित्रा घ्यावा याचा तो विचार करू लागला. पैसे परत मिळवण्यासाठी दमदाटी करावी लागेल, की गोडीगुलाबीने काम होईल याचाही त्याला अंदाज करता येईना.

संजय कोचावरच हातात डोके धरून बसला.

बाहेर चकचकीत ऊन होतं, बाहेर बागेत आनंदाने फुलं डोलत होती , पक्षी गोड आवाजात चिवचिव होते. पण संजयच्या मनात काळोख पसरला होता. डोलणाऱ्या फुलांच्या जागी काटेरी निवडुंग दिसत होते. आणि पक्षांचा चिवचिवाट कर्णकर्कश वाटत होता.

संजयच्या फ्लॅटचं दार वाजलं. समोरच्या फ्लॅटमधला विकास आत आला. "काका जरा टाईम्स देता का, आज मंगळवार नं, ट्रॅव्हल अॅन्ड टुरिजमची पुरवणी आली असेल पेपरबरोबर, बघायची होती जरा." विकास म्हणाला.

"का रे बाबा, कुठे टूरवर जायचा विचार आहे की काय तुझा आणि आरतीचा"? संजय म्हणाला, "पण अरे सुट्टीचा सीझन तर अजून चालू नाही झाला."

"अहो काका सुट्टीचा सीझन कसला घेऊन बसलात?" विकास म्हणाला. "अहो माझीच सुट्टी होण्याची वेळ आली आहे."

विकास थोडं थांबून सांगू लागला, "अहो काका, आमच्या कंपनीचे फ्रेंच कोलॅबोरेटर आहेत नं, त्यांचं डेलिगेशन येतंय मुंबईत मार्चच्या शेवटी शेवटी आणि त्यांच्याबरोबर आमच्या लोकांचा एक मेळावा करायचा आहे लोणावळा खंडाळा अशा शांत जागी. त्यांच्या टीमला, आमच्या लोकांना एक रात्र रहायला निदान पंचवीस रूम पाहिजेत, मीटिंग साठी कॉन्फरन्स रूमची सोय पाहिजे, पण कुठल्याही रिसॉर्टला बुकिंगच मिळत नाही. सगळी फुल्लआहेत. आणि जरी बुकिंग मिळालं तरी इथून जाण्या येण्यासाठी वीस एक लोकांच्या वाहतुकीची सोय करायची आहे पण अजून बसची सोय झाली नाही. सगळ्यांना काहीतरी भेटवस्तू द्यायला पाहिजे. कुठे कुठे धावू समजत नाही. "

a

विकास हताश होऊन बोलत होता. पण जसा जसा विकास बोलत होता, तसा तसा संजयच्या मनातला काळोख दूर होत होता. बागेत निवडुंगाच्या जागी संजयला परत फुलं डोलताना दिसायला लागली होती. पक्षी गातांना ऐकू येऊ लागले होते.

विकासच्या जवळ जाऊन त्याचा हात आपल्या हातात घेत संजय म्हणाला, “विकास, अरे घाबरतोस काय, हा तुझा काका इथे बसलाय नं. निश्चिंत रहा तुझी सगळी कामं झालीच असं समज.”

...शाम काकांची गोष्ट संपली. प्रोफेसर जोगळेकर अगदी मन लावून गोष्ट ऐकत होते. गोष्ट संपल्यावर थोडा वेळ प्रोफेसर जोगळेकर विचार करत बसले होते. मग काहीतरी निश्चय झाल्याप्रमाणे ते उठले, शाम काकांचा हात धरून त्यांनी जोर जोरात हलवला आणि थॅंक यू, थॅंक यू , थॅंक यू म्हणत ते लगबगीने निघून गेले.

बाहेर निघून जाणाऱ्या जोगळेकरांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून श्याम काका मिशीतल्या मिशीत हसत राहिले.

---X---

a

# ६

# मदनबाणाचे कुंपण

संध्याकाळचा सुमारे साडे सात चा सुमार होता. शाम काकाना आज ओरिओ क्लब मध्ये यायला थोडा ऊशीरच झाला होता खरा, पण तेवढ्यात ते आलेच. बार रूम मध्ये त्यांच्या नेहमीच्या टेबलकडे ते गेले. मंत्रालयातले दोन डेप्युटी सेक्रेटरी तिथे बसले होते, त्यांना ते जॉइन झाले.

“अरे, वाईन घेताय वाटतं !” त्यांच्या ग्लासकडे पाहून शाम काका उद्गारले.

“हो काका, नवा ब्रॅंड आहे , नीलेश वाईन्स. आमच्या नीलेश काटकरानी काढलाय. नवीन आहेत वाईन व्यवसायात, पण नाव कमावतील लवकरच.” डेप्युटी सेक्रेटरी काळे म्हणाले.

“नीलेश काटकर ? नाव ऐकल्यासारखं वाटतंय.” शाम काका म्हणाले. “अरे हो, नीलेश काटकर म्हणजे आपला गारमेंट मॅन. गारमेंट व्यवसायातून निवृत्त झाल्यावर तो वाईन व्यवसायात शिरला, नाही का!”

शाम काकांना खुद्कन हसू आलं.

“तुम्ही ओळखता नीलेश काटकरांना ? आणि हसलात का असे छद्मीपणे काका ? आम्हाला तरी सांगा त्यामागे काही गोष्ट असेल तर.” डेप्युटी सेक्रेटरी काळे म्हणाले.

“सांगतो, सांगतो, नीलेश काटकरांच्या वाईन व्यवसायातल्या प्रवेशाची गोष्ट तुम्हाला सांगतो”. शाम काका म्हणाले.

शाम काका गोष्ट सांगतायत हे कानावर पडताच बाजूलाच उभ्या असलेल्या दोन ऑफिसरनी खुर्च्या ओढल्या आणि तेही जॉइन झाले.

a

कर्तव्य बुद्धीने डेप्युटी सेक्रेटरी काळेनी शाम काकांसाठीही वाईन मागवली. वाईनचा घोट घेऊन शाम काकांनी प्रशस्तीपूर्वक मान हलवली.

“ऐका रे.” शाम काका म्हणाले. “गोष्टीची सुरुवात ऑस्ट्रेलियात होतेय बरका. रमेश आणि रीनाच्या घरी, छोट्या बंटीच्या वाढ दिवसाच्या प्रसंगी. होईल उलगडा, ऐका.”

“हॅपी बर्थडे डिअर बंटी....हॅपी बर्थडे टू यू”. टाळया, म्युझिक, बर्थडे साँग, बच्चेकंपनीचा कलकलाट, चेहरा कौतुकाने ओतप्रोत भरलेले उत्साही पोरसवदा आईवडील आणि त्यांचे त्याच वयोगटाचे चार - पाच जवळचे मित्र मैत्रिणी. .... जे काही चार वर्षाच्या छोटुकल्याच्या वाढदिवसाला अपेक्षित असतं, ते सर्व होतं.

ऑस्ट्रेलियात, सिडनीमध्ये रमेश-रीनाच्या छोट्या बंटीचा वाढदिवस जोरात साजरा होत होता.

सर्वांनी टाळया वाजवल्या. केक कापला गेला, भरवला गेला. बच्चेकंपनी केककडे आशेने पहात होती.

बंटीची आई रीना आणि तिच्या मैत्रिणींनी मुलांना नीट बसवलं. एकीने केकचे एकसारखे चौकोनी काप केले. मुलाना केक, चिप्स, कुकीजने भरलेल्या बशा देण्यात त्या सगळया बिझी झाल्या. तिकडे रमेश, म्हणजे बंटीचे बाबा, पुरुष मंडळींची सरबराई करण्यात बिझी झाले.

अशा त्या बिझी वातावरणात नीलेश आणि मालती कुठेच फिट होईनात. साठीच्या वयोगटाचं दुसरं कोणीच तिथे नव्हतं. फारसे म्हातारे नसतानाही या घोळक्यात त्याना फारच वयोवृद्ध वाटायला लागलं.

रीनाचं लक्ष गेलं. "अरे, काका, काकू बसाना तुम्ही इथे सोफ्यावर. दोन मिनिटं आरामात बसा. तुमच्या बशा आणतेच मी."

बशा भरता भरता तिला शंका आली. "पूनम, तुझ्या मम्मी पपांना गोड चालतं नं?" आपल्या मैत्रिणीला रीनाने विचारलं, आणि होकार मिळाल्यावर दोन भरलेल्या बशा तिच्या हातात दिल्या.

पूनमने नीलेश आणि मालतीच्या हातात बशा दिल्या. "मम्मी, पपा, सावकाश होऊ द्या हं. मी काहीतरी कोल्ड्रिंक घेऊन येते. बर्फ नको नं?" आस्थेने तिने विचारलं.

नीलेश आणि मालती जरा संकोचलेच. एवढ्या वडिलकीच्या मानपानाची त्याना सवय नव्हती, असं म्हटलं तरी चालेल. भारतामध्ये त्यांच्या स्वतःच्या घरात आणि जवळच्या नातेवाईकांच्या घरात, आताशा कोणी तरुण मंडळी राहिलीच नव्हती. सगळेच पंख पसरून जगभर पसरलेले. आणि मग, घरातल्या आणि जवळच्या नात्यातल्या अतिजेष्ठ आई, बाबा, काका-काकू, मामा-मामीची काळजी घेणारी, नीलेश -मालतीच्या साठीतल्या वयोगटातील माणसं तरुण वर्गातच मोडायची.

आतासुध्दा पूनम आणि सिध्देशनी निकडीनी बोलावलं म्हणून नीलेश आणि मालती इथे ऑस्ट्रेलियात, सिडनीला आले होते खरे, पण तिकडे पार्ल्याला घरी आई बाबांची नीट सोय लावल्या नंतरच. सिध्देशला दोन महिने कामानिमित्त बरंच टूरिंग लागलं होतं आणि पूनमलाही कॉन्फरन्सेस होत्या. घराकडे बघायला, स्वैपाकपाणी करायला, आल्सेशियन बॉबीकडे बघायला दोन महिने त्याना मम्मी पपा सिडनीला हवे होते. पण जेव्हा नीलेशने आपल्या बहिणीला, सीमा ताईला फोन करुन दोन महिन्यांसाठी पार्ल्याला आई बाबांसोबत रहाण्यासाठी येण्याबद्दल विचारलं, तेव्हा सीमा ताई आणि नानासाहेबांनी अगदी अनिच्छेनेच एक

महिन्यापुरतंच पार्ल्याला येऊन रहायचं कबूल केलं होतं. फक्त एक महिना. दोन महिने नाही.

इकडे सिडनीला पूनम-सिध्देशच्या घरी, बॉबी कुत्र्या कडे बघायचं, त्याला फिरायला न्यायचं, ही नीलेशची कामं. त्यामुळे त्याला दोन महिने सिडनीला राहायलाच पाहिजे होतं. मग असं ठरलं की मालतीने एक महिन्यानंतर परत इंडियाला जायचं, सीमाताई आणि नानासाहेबांना आई बाबांची देखभाल करण्याच्या कर्तव्यातून मुक्त करण्यासाठी, आणि इकडे सिडनीला राहून उरलेला महिना नीलेशने मॅनेज करायचं.

नीलेश आणि मालतीची ही सिडनीची तिसरी भेट होती. जवळपासची बहुतेक सगळी प्रेक्षणीय ठिकाणं आधीच पाहुन झाली होती. त्यामुळे दिवसाभरात जरी वेळ मोकळा मिळाला, तरी कुठे फिरायची इच्छा होत नव्हती. त्यातून आठवडाभर पूनम आणि सिध्देश फार बिझी असायचे किंवा घरातच नसायचे, आणि वीकेंडलाच म्हणजे फक्त शनिवार रविवारी, आजच्या कार्यक्रमासारखं मित्रमंडळीकडे किवा नातेवाईकांकडे, छोट्यामोठ्या कार्यक्रमांना जाणं शक्य व्हायचं.

"श्यामला नाही आली अजून, उशीर होईल असं म्हणाली होती", रीना आणि पूनम एकमेकीशी बोलत होत्या.

बेल वाजली. श्यामला, नीरज आले. बरोबर एक साठीतल्या बाई होत्या. सगळ्यांनी त्याना "हॅलो" केलं. नीलेश, मालतीशी रीनाने ओळख करून दिली. "हे पूनम चे मम्मी पपा, मुंबईला असतात. ही माझी अतिशय जवळची मैत्रीण श्यामला, हा नीरज आणि या श्यामला च्या मम्मी, स्मिता काकी, या मेलबोर्न ला असतात. बंटीला ब्लेसिंग द्यायला मुद्दाम आल्यात."

स्मिता काकी नीलेशशी हस्तांदोलन करत म्हणाल्या "हाय नीलेश, सो हॅप्पी टु मीट यू अगेन, हॅलो मालती." आणि मग, मागेच उभ्या असलेल्या श्यामला - पूनमला उद्देशून म्हणाल्या, "मी आणि नीलेश क्लासमेटस्, पार्ल्याच्या प्रबोधन हायस्कूलचे. दोन वर्षांपूर्वी क्लास रियुनिअनला कित्येक वर्षानंतर भेटलो होतो."

मालतीलाही आठवलं.

"दोन वर्षांपूर्वीच्या नीलेशच्या क्लास रियुनियनला सगळयांना मिठ्या मारणारी, आपल्या भोवती घोळका जमवून मोठ्याने खिदळणारी, ही बया इथे कुठे उपटली !" मालतीच्या हसऱ्या चेहऱ्याच्या पाठीमागे एक विचार

मालतीने नीलेशकडे पाहिलं.

नीलेशच्या आता पर्यंत निर्विकार असलेल्या चेहऱ्यावर जिवंतपणा आला होता. शाळेतल्या म्हणा, की अन्य कुठल्या, रम्य आठवणी बहुतेक त्याच्या डोळयांच्या पटलावर उमटायला लागल्या असाव्यात.

स्मिताने जाऊन बंटीबाळाला कवेत घेतलं, त्याचं प्रेझेंट हातात दिलं आणि मग आपली बशी घेऊन ती नीलेश आणि मालती जवळ आली.

"मग काय नीलेश, किती दिवस मुक्काम इथे, की कायमचे राहायलाच आलात ऑस्ट्रेलियाला?" स्मिताने विचारलं. बशी हातात सावरत तिथेच ती अवघडून उभी राहिली. मालती नाईलाजास्तव शिष्टाचार म्हणून उठली, स्मिताला बसायला जागा दिली आणि काही मदत पाहिजे का ते बघायला आत गेली.

किचन टेबलावर पूनम आणि रीनाच्या बरोबरीच्या तरुण पोरींचा ग्रुप बसला होता. हॉल मधे त्यांचे नवरे म्हणजे तरुण पोरं बसली होती. बंटी आणि त्याचं मित्रमंडळ गेम रूममधे खेळत होतं. हास्य विनोद, आरडाओरडीला सगळीकडे ऊत आला होता. मालतीकडे कोणीही लक्ष दिलं नाही. शेवटी एकदा कारण नसताना बाथरुममधे जाऊन, पाच दहा मिनिटानी मालती नीलेश जवळ परत आली.

a

इथेही हास्यविनोदाला ऊत आला होता. जुन्या आठवणी निघाल्या असाव्यात. दोघंही खिदळत होते.

मालतीला आलेली पाहून स्मिता म्हणाली, "ये, ये मालती. नीलेश म्हणतोय तुला दोन आठवड्यात परत जावंच लागणार आहे. टू बॅड. आत्ता तर खरा सीजन सुरू झालाय. आणि हो, इथे बालमोरल बीचवरच्या स्पोर्टस् सेंटर मधे एक सिनियर सिटिझनसाठी वॉटर स्पोर्टस् चा नवा विभाग निघाला आहे. फार छान आहे. उद्या जाऊया का आपण तिकडे? आणि तिथे जवळच "बॉटम ऑफ द हार्बर" रेस्टॉरंट आहे. तिथे नंतर छानपैकी लंच घेता येईल. तिथले क्रम्बड् कालामारी विथ चिप्स आणि सी फूड चाउडर अगदी तोंडात विरघळतात. नीलेशची हरकत दिसत नाही, तुलाही जमेल नं मालती ?"

"नाही" म्हणायचं मालतीच्या जिभेवर आलं होतं. पण, "आपण नाही सांगितलं तर नीलेश एकटाच जाईल नाचत नाचत या टवळीबरोबर," असा काहीसा विचार तिच्या मनात आला आणि मग तोंडावर उसनं हसू आणून मालतीनेही स्मिताच्या प्लॅनला होकार दिला.

गाडीतून घरी परतताना पूनम आणि सिध्देश पार्टीबद्दल गप्पा मारत होते, नीलेश आपल्या विचारातच गुंग होता, मालतीचं मन विषण्ण झालं होतं. निरुपयोगी वस्तू म्हणून सर्वांनीच दुर्लक्षित केल्यासारखं तिला वाटत होतं आणि म्हणुनच की काय, तिचं मन एका अनामिक धास्तीने धडधडत होतं.

मालतीने डोळे मिटून घेतले आणि मनातल्या मनात गणेश स्तोत्राचं पारायण सुरु केलं.

दुसरा दिवस उजाडला. सकाळी अकरा वाजता स्मिता गाडी घेऊन आली. पूनम आणि सिध्देश तर सकाळीच कामावर निघुन गेले होते. मालतीचं स्वैपाकपाणी उरकलं होतं. बॉबीसाठी खाणं ठेवून नीलेश आणि मालती बाहेर पडले. चॅटस् वुड

मधल्या त्यांच्या घरापासून बालमोरल बीच वॉटर फ्रन्टला पोहोचायला अर्धा तास लागला. गाडी पार्क करून स्मिताने तिकिटं काढली.

सगळ्याच वॉटर स्पोर्टस् राइडस् जेष्ठ नागरिकांसाठी खूप सुरक्षित केल्या होत्या. पण मुळातच पाण्याची आवड नसल्याने मालतीने एका राइडच्या पुढे भाग घेतला नाही. नीलेशला स्विमिंगची, स्पोर्टस् ची पूर्वी पासून आवड होती त्यामुळे तो खुशीत होता, आणि साथीदार स्मिता !

मालती आपली शेडमधे मांडलेल्या आरामखुर्चीत ज्यूसचे घुटके घेत बसली आणि वारंवार कपाळावर येणाऱ्या आठ्याना प्रयत्न पूर्वक हाकलत राहिली.

लंचसाठी बॉटम ऑफ द हार्बर रेस्टॉरंटकडे मंडळी वळली. ऑर्डर दिल्यावर गप्पा मारता मारता स्मिताने विचारलं , "नीलेश , काय करतोस हल्ली? अजुन नोकरी चालू आहे की रिटायर झालायस ?"

"अगं, नॅशनल गारमेंटस् मधे जनरल मॅनेजर होतो मी. गेल्याच वर्षी रिटायर झालो." नीलेश म्हणाला, "सध्या काहीच करत नाही मी. मालतीचा रघुदादा नाशिकला वाईन इस्टेट खरेदी करतोय. ते डील पुरं झालं की तिथे पार्टनरशिपमधे वाईनरी टाकायचा आमचा विचार आहे. व्हाइट वाइन, रेड वाइन. कॅबर्नी सुव्हिनॉन, माझं पेट प्रॉजेक्ट."

"अरे वा, स्मिता म्हणाली. कधी होतंय इस्टेटीचं डील ?" स्मिताने विचारलं.

"ते काय सांगता येतंय ! उद्या होईल नाहीतर सहा महिनेही लागतील." नीलेश म्हणाला. "बरं, तू काय करतेस मेलबोर्न ला?"

"मी? माझी फॅक्टरी आहे वुलन गारमेंटची." स्मिता म्हणाली, "उमेश तीन वर्षांपूर्वी अचानक गेला. त्याच्या सहा महिने आधी ही फॅक्टरी त्याने सुरु केली होती. मी सुरुवातीपासूनच उमेश बरोबर फॅक्टरीचं काम बघायची. त्यामुळे मी नेटाने फॅक्टरी चालू ठेवलीय. तसं चाललंय बरं, पण मला आता वाढवायची आहे ."

a

“फार छान, व्हेरी कमेंडेबल”. नीलेश म्हणाला.

“एक प्रॉब्लेम आहे नीलेश.” स्मिता म्हणाली.”फॅक्टरी वाढवायची म्हणजे मालाचा खप वाढायला पाहिजे. आणि तेच अवघड जातंय. नवीन मार्केटस् शोधायची. घाऊक विक्रीच्या डिस्काउंटबद्दल बोलणी करायची, सगळंच अवघड.”

“तुला प्रोफेशनल मदत पाहिजे स्मिता “. नीलेश म्हणाला.

“नीलेश, तुला गारमेंट मार्केटिंगचा चांगला अनुभव आहे नं, मग तुझीच मदत मिळाली तर सगळयात उत्तम. पुढचा महिनाभर तू आहेस नं ऑस्ट्रेलियात, मग दोन दिवसांसाठी मेलबोर्नला एक ट्रिप तुला सहज मारता येईल. तिथे आमच्या मार्केटिंग टीमला तुझ्याकडुन मार्गदर्शन मिळालं तर खूप फायदा होईल आमचा. इमारतीचा पाया भक्कम होऊन जाईल. मग इमारत जशी वर येत जाईल तसं पुढचं मार्गदर्शन”. स्मिता म्हणाली.

फुड डिलिव्हरी काउंटरवरून कॉल आला. आपल्या ऑर्डर केलेल्या पदार्थांचे ट्रे आणण्यासाठी स्मिता आणि नीलेश काउंटर कडे गेले. मालती टेबलवरच बसून राहिली.

जेवणाचे ट्रे आले.

क्रम्बड् कालामारी, ग्रिल्ड प्रॉन स्क्यूअर्स विथ गार्लिक सॉस, क्रॅब मीट चाउडर, सगळंच अप्रतिम आणि त्याबरोबर भरपूर फ्राइड चिप्स आणि फ्राइड ओनिअन रिंगस्. चवीने सावकाश जेवण चाललं होतं. सोबतीला थंड बिअर. नीलेश अगदी खुश झाला.

जेवणाचा समाचार घेता घेता स्मिता बोलत होती. तिच्या फॅक्टरी बद्दल, वुलन गारमेंट च्या वेगवेगळया प्रॉडक्टस् बद्दल. पुढच्या महत्वाकांक्षां बद्दल.

“नीलेश तुला बागकामाची आवड आहे नं ? माझ्या बागेत मी ग्रॅविलिया, कांगारू पॉ, अशा इथल्या स्थानिक फुलांचे ताटवे लावले आहेत. कुंपणाला

जस्मिनम साम्बाक, मदनबाण. आणि बरं का, मदनबाणाचे काही वेगळे ताटवेही लावले आहेत मी, गजरे करायला. छान झाली आहे बाग आता.” स्मिता बोलत होती.

नीलेश ऐकत होता. विचार करत होता.

मालती ऐकत होती. तिला एकंदर काही बरोबर वाटत नव्हतं. आता पर्यंत स्मिताची बऱ्यापैकी पारख मालतीने केली होतीआणि तिला मनोमन वाटत होतं की कोणत्याही निमित्तानं नीलेशने मेलबोर्नला स्मिताकडे एकट्याने वारंवार जाणे योग्य नव्हते, आणि मालती हजारो मैल दूर मुंबईत असताना तर नाहीच नाही. फॅक्टरी बघायला नको, बगीचा बघायला नको, की मार्गदर्शन करायला नको.

नीलेश तर मन लावून स्मिताचे बोलणे ऐकत होता. त्यामुळे त्याच्याबरोबर या विषयावर काही बोलणे म्हणजे वादाला तोंड फोडण्यासारखे झाले असते.

मालतीने बराच विचार केला. ही लढाई एकटीने लढणं तिला अवघड वाटू लागलं. कुमक मागवायला लागणार.

दुसऱ्या दिवशी नीलेश आंघोळीला गेला असताना मालतीने इंडिया कॉल लावला. अंधेरीला तिच्या रघुदादाला तिने फोन केला.

“दादा, मी येतेय पुढच्या आठवड्यात,” मालती म्हणाली.

“हो मालती , वाट पहातोय आम्ही. आणि नीलेशचं काय, तो महिनाभर पुढे राहतोय की काय?” दादा ने विचारलं.

“असा प्लॅन आहे खरा.” मालती म्हणाली. “पण दादा, जर ते वाईन प्लँटेशनचं डील झालं, तर नीलेशला लगेच तिकडे यावं लागेल नं”?

“हं, ते तर खरंच. डील या आठवड्यात नक्की होणार आहे आणि पुढच्या आठवड्यात काम सुरू करायला हवं. पण पूनम-सिध्देशला नीलेश तिकडे सिडनीला पाहिजे नं! मी कसंतरी इकडचं बघुन घेइन.” दादा म्हणाला.

मालतीने चान्स पकडला.

“नाही दादा, नीलेशला ताबडतोब बोलावून घेच तू. त्याला वाईनरीमधे खूप इंटरेस्ट आहे. इकडे पूनम सिध्देश करतील काहीतरी. बॉबीला ट्रेनिंग स्कूलला पाठवायचं आहेच, नाही तरी. आणि खरं सांगू का दादा, तुमच्या शेजारच्या देशपांड्यांसारखी केस आहे.”

भाऊ बहीणीचं सांकेतिक भाषेत बोलणं झालं. आता रघुदादाच्या डोक्यात लख्खं प्रकाश पडला.

“हो हो, मला नीलेशने इथे ताबडतोब यायला हवं. माझ्या इतर व्यापांतून वाइनरीकडे बघायला मला वेळ नाही मिळणार आणि एवढा खर्च फुकट जाईल. मी बोलतो नीलेशशी संध्याकाळी. तू नको काळजी करु.” दादा म्हणाला.

दादाच्या हातात आपल्या सौभाग्याचं रक्षण देऊन मालती निश्चिंत झाली.

संध्याकाळी दादाचा फोन आला. नीलेश, मालती, पूनम, सिध्देश सगळेच घरी होते. दादा सगळ्यांशी बोलला. वाईनरीचं स्वप्न साकार होण्याच्या उंबरठ्यावर उभं असल्याचं ऐकून नीलेशलाही मुंबईला जाण्याची ओढ लागली.

मालतीला हायसं वाटलं. गनिमाविरूध्द मोर्चेबांधणी तर छानच झाली होती. गनिमाचा डाव हाणून पाडला होता.

दोन आठवड्यानंतर मालती आणि नीलेश बरोबरच मुंबईला परत गेले. जाण्यापूर्वी नीलेशने स्मिताला एकदा फोन केला होता. समजावायला, बहुतेक.

मुंबईला पोहोचल्याबरोबर रघुदादाने नीलेशला कामाला लावलं. रघुदादा आणि नीलेश ताबडतोब नाशिकला गेले. वाईन प्लँटेशन तयार होतं. मशिनरी उभारली गेली. वाईन प्रोसेसची चर्चा करायला तज्ञांना बोलावलं. विक्रीची किंमत ठरवणे. किरकोळ विक्रेते पकडणे, एक ना दोन, हजारो कामं. नीलेशने सेल्समन

लोकांची टीम तयार केली होती आणि जिथे लागेल तिथे तो व्हिडिओ कॉन्फरन्सचा वापर करत असे. वाइनरीची घडी हळू हळू बसत होती.

तिकडे ऑस्ट्रेलियामधे पूनम आणि सिध्देशचं छानच चाललं होतं. सिध्देशला प्रमोशनही मिळालं होतं. मधुन मधुन दोघंही विचारायचे, की मम्मी पपा तुम्ही केव्हां येणार. एकदा वाइनरीचं सगळं सुरळीत झालं की मग ऑस्ट्रेलियाची ट्रीप करायलाच लागणार होती.

ऑस्ट्रेलियाच्या ट्रिपचं नाव काढलं तरी मालतीला अंगावर शहारे यायचे. कधी मध्यरात्री जाग आली, तरी अनामिक भीति तिला अस्वस्थ करायची. पण मुलांचे हालही तिला जाणवत होते. आज ना उद्या दोघांना सिडनीला जावंच लागणार होतं. आणि सिडनी पासून मेलबोर्न काही तसं लांब नव्हतं. संकटस्थळ. हॉट स्पॉट.

शेवटी मालतीने ठरवलं, कायमचा सोक्षमोक्ष लावायला हवा होता. संकटापासून दूर पळण्यात अर्थ नव्हता. त्याला सामोरे जायलाच हवे होते. या ऑस्ट्रेलियन चक्रव्यूहात घुसायचं आणि विजय मिळवून बाहेर यायचं

मालतीने थोडा विचार केला. तिच्या रघूदादाला तिने फोन केला.

“दादा, तुझा तो मित्र होता नं, गोडबोले म्हणून,” मालतीने सुरुवात केली.

“कोण, चिकण्या गोडबोले? त्याचं काय ?” दादाने विचारलं

“त्याचं रेडिमेड कपड्यांचं दुकान होतं नं रे, क्रॉफर्ड मार्केट मधे”? मालतीने जरा चाचरतच विचारलं.

“हो आहे नं दुकान. चांगलं मोक्याच्या ठिकाणी आहे. पण चिकण्याची का एकदम आठवण झाली?” दादा ने विचारले.

“त्याचं असं आहे दादा, तिकडे ऑस्ट्रेलियामधे आपल्या एका नातेवाईकाची वुलन गारमेंट, स्वेटर वगैरे बनवण्याची छोटी फॅक्टरी आहे. ते लोक

a

भारतात एन्ट्री करू पहातायत. तेव्हा म्हटलं गोडबोलेंनी त्यांची एजन्सी घेतली तर काम होईल त्यांचं".

रघुदादाने जरा विचार केला. "तसं पाहिलं तर माझ्या शब्दाखातर चिकण्या घेईलही त्यांची एजन्सी. पण आहेत कोण हे लोक? जरा मला डीटेल कळायला पाहिजे". दादा म्हणाला.

मालतीचं उसनं अवसान एकदम गळून गेलं आणि फोनवरच ती हुंदके द्यायला लागली. दादाला लक्षात आलं की काहीतरी मोठा प्रॉब्लेम आहे. रघुदादाने मालतीला चुचकारुन शांत केलं आणि हळू हळू प्रकरण समजावून घेतलं. दादाने थोडा विचार केला.

"मालती मी टाकीन शब्द, तू म्हणतेस म्हणून. आणि माझी खात्री आहे की चिकण्या ट्रायल बेसिसवर घेईलही एजन्सी, पण एक प्रॉब्लेम आहे. चिकण्या आहे बॅचलर. लग्न बिग्न त्याने काही केलं नाही. वय आहे साठीच्या आसपास पण माणूस मोठा रसिक. पार्टी-पिकनिकची, बाग-बगिच्याची, फार आवड. आणि लेडिजच्या बाबतीत जरा बिनभरवशाचा आहे. तेव्हा या फॅक्टरीवाल्या मॅडमना जरा संभाळून रहायला लागेल." दादा म्हणाला.

"बाग-बगीचा", "पार्टी- पिकनिक" हे शब्द मालतीच्या मनात खोलवर घुमत गेले, आशेची एक ठिणगी उडवून गेले.

मालती मनात म्हणाली, "अरे दादा, तू टाक तरी शब्द, कोणाला कोणापासून सांभाळून रहायला पाहिजे हे काळच ठरवेल!"

आणि नंतर नियतीने अधोरेखित केल्याप्रमाणे घटना घडत गेल्या.

दादाने चिकण्या गोडबोलेकडे शब्द टाकला.

गोडबोलेंनी सुरुवातीला आढेवेढे घेतले, पण दादाने आग्रह धरल्यावर सप्लायरशी बोलायचं कबूल केलं.

गोडबोलेनी ऑस्ट्रेलियाला फोन लावला. ते स्मिताशी फोनवर बोलले.

गोडबोलेंची नंतर स्मिताबरोबर व्हिडिओ कॉन्फरन्स झाली.

गोडबोलेंनी ट्रायल बेसिसवर वुलन गारमेंटच्या किरकोळ विक्रीची एजन्सी घेतली.

गोडबोलेंनी या ऑस्ट्रेलियन मालाच्या विक्रीमधे जातीने इंटरेस्ट घेतला.

गोडबोलेंच्या स्मिताशी अडीअडचणी निवारण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्स होत राहिल्या.

गोडबोलेंनी स्वेटरची आणखी एक कन्साइनमेंट मागवली.

गोडबोलेनी फॅक्टरी बघायला मेलबोर्नची व्हिजिट केली.

गोडबोलेंनी परत आल्यावर आपल्या पवईच्या घरापुढच्या बागेत मदनबाणाची रोपं लावली.

गोडबोलेंनी मदनबाणाचं कुंपण केलं.

आणि गोडबोले नंतर दर तीन महिन्यांनी फॅक्टरी बघायला मेलबोर्न ची व्हिजिट करायला लागले.

आणि इकडे… इकडे मालतीला रात्री शांत झोप यायला लागली.

शाम काकांनी गोष्ट संपवली.

“वा:, वाईन सुंदरच आहे. निलेश काटकरांचे एक वैशिष्ट्य आहे, करेल ते परफेक्ट करील. फक्त त्या करेक्ट मार्गाला त्याला कोणीतरी लावून द्यायला पाहिजे”. शाम काका हसत हसत म्हणाले.

———X——-

a

# उपसंहार

शामकाका रोज संध्याकाळी क्लब मधे येतच राहणार, आपले नेहमीचे टेबल पकडून इतर मेंबर्सशी सुखसंवाद साधण्याचा, जीवनातले टक्के टोणपे खाणाऱ्या, आयुष्यात येणाऱ्या छोट्या मोठ्या समस्यानी गांगरून गेलेल्या, निग्रहाने पुढे जात राहणाऱ्या महत्वाकांक्षी तरुणाना गोष्टींच्या फुलोऱ्याच्या रूपाने मार्गदर्शन करण्याचा आणि त्याबदल्यात मिळालेल्या फ्री ड्रिंकचा आनंदाने आस्वाद घेण्याचा शामकाकांचा प्रघात चालूच राहणार.

शामकाका आणि त्यांचा श्रोतृगण हा काही ओरिओ क्लबमधेच दिसणारा देखावा नाही. शाम काकांसारखे अनुभवांची पोतडी पोटाशी बाळगून असणारे, आपल्या अनुभवांचे, ज्ञानाचे पसायदान इतराना मुक्तहस्ते देण्यास आतूर असलेले महाभाग ठिकठिकाणी विखुरलेल्या मंडळांमधे, मेसिंग क्लब्जमधे, सोशल क्लब्जमधे आपल्याला दिसतील. देणाऱ्याकडे देण्यासाठी खूप असते, घेणाऱ्याला घेण्यासारखे खूप असते . परंतू, ज्ञान देणारा आणि घेणारा यांमधे योग्य समन्वय साधला जाणे महत्वाचे आहे. क्लास रूम तंत्राने उपदेश किंवा मार्गदर्शन देण्यापेक्षा गोष्टीरूपाने सप्रमाण केलेले मार्गदर्शन अधिक परिणामकारक ठरते. मात्र देणाऱ्याच्या व घेणाऱ्याच्या वयामधील अंतर, सामाजिक विभिन्नता, जगाकडे जीवनाकडे व नैतिक मूल्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन या सर्वांचा समन्वय नैसिर्गिकपणे साधला जाण्यानेच खेळीमेळीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

शामकाकांचे किस्से ही एक परंपरा आहे आणि ती अशीच मजेत चालणार आहे, पुढे जात राहणार आहे.

a

श्री सुधीर कारखानीस यांची या पूर्वीची दोन पुस्तके. क्लिक करताच उघडतील.



a

## ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.

## श्री. सुधीर कारखानीस यांचे हे ई साहित्यवरील तिसरे पुस्तक.

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच दोन कथासंग्रहही आहेत. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण

वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(४), यशवंत कदम(७), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस(३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) श्रीराम काळे (२) शैलेश पुरोहित(४) बी बी देसाई(२), श्रीनिवास शारंगपाणी(३)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।